प्रवासयात्रावर्णन

यमुनाबाई गोखले.

१९२६.

किं. १२ आणे

प्रवासयात्रावर्णन.

लेखक

यमुनाबाई गोखले.

१९२६.

कि. १२ आणे.

प्रवासयात्रावर्णन.

लेखक

यमुनाबाई गोखले.

१९२६.

किं. १२ आणे.

प्रकाशकः—यमुनाबाई गोखले,
पो. निंबाळ, जि. विजापूर.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु प्रेस, ९०७ शनवार पुणें.

प्रस्तावना.

पुढील पुस्तक काळजीपूर्वक वाचलें असतां, असें आढळून येईल कीं, या पुस्तकाच्या ग्रंथकर्त्री ती. गं. यमुनाबाई गोखले यांनीं हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व तीर्थें पादाक्रांत केलीं आहेत. तीर्थास जाणें म्हणजे एक मोठा पुण्यमार्ग आहे असें बऱ्याच काळपर्यंत लोकांस वाटत होतें. तथापि "जेथें तेथें धोंडा पाणी। उगाच वणवण हिंडोनि काय होतें" ह्या रामदासांच्या उक्तिप्रमाणें देव सांपडण्यास तीर्थास जाण्याचें कारण नसून "ठायींच बैसोनि करा एकचित्त" ह्या तुकारामांच्या उक्तिप्रमाणें देव आपल्या आंतच शोधिला असतां तो बाहेरही दिसेल. हें जरी खरें आहे तथापि तीर्थयात्रेस गेल्यापासून नानाप्रकारचे देश, नानाप्रकारच्या भाषा, नानाप्रकारचे लोक पाहण्यांत येऊन विश्वाच्या जगड्व्याळ स्वरूपाची थोडी बहुत तरी कल्पना होते. 'कूपमंडूक' न्यायानें आपल्या जातीचे, आपल्या कुलाचे, किंबहुना आपल्या धर्मकल्पनांचेसुद्धां संकुचितत्व आपल्या ध्यानांत येऊन आपली दृष्टि विशाल होते. शिवाय ती. यमुनाबाई गोखले ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें संसाराचें दुःख विसरण्यास तीर्थयात्रेची थोडी बहुत तरी मदत होते. एकाच व्यक्तीकडून इतक्या तीर्थयात्रा कशा झाल्या अशा प्रकारचा अचंबाही हें पुस्तक वाचून वाटल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या पुस्तकाच्या ग्रंथकर्त्री मोठ्या चाणाक्ष असून त्यांचें भाषेवरील प्रभुत्व ही थोड्या बहुत रीतीनें पुढील पुस्तकावरून कळून येण्याजोगें आहे. हें पुस्तक लिहिण्याचें कामीं त्यांस रा. शंकरराव धर्माधिकारी यांची व इतर मंडळीची जी मदत झाली त्याबद्दल त्यांचे आभार त्यांस युक्त आहेत. अशा प्रकारचे पुस्तक मुलामुलींच्या नजरेखालीं गेल्यास, अगर ह्या पुस्तकाचा मुलामुलींच्या अभ्यासक्रमामध्यें समावेश झाल्यास, त्यांची दृष्टि विशाल होईल यांत संशय नाहीं. पुस्तकाची भाषा चटकदार आहे, व वर्णनही परिमित आहे, या कारणानें पुस्तकवाचनाची उमेद शेवटपर्यंत अबाधित राहील यांत संशय

नाहीं. ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास ग्रंथकर्त्रीस कांहीं कांहीं गोष्टी थोड्या बहुत विस्तारानें लिहिण्यास सांपडतील अशी त्यांची उमेद आहे. हा त्यांचा मनोदय सफल होवो अशी इच्छा प्रदर्शित करून ही प्रस्तावना पुरी करतों.

पुणें
६।१।२६

रा. द. रानडे.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

प्रवासयात्रावर्णन.

१. आरंभीं.

'दुःखमयोऽयं प्रपंचः' या म्हणीचा प्रत्यय व्यवहारांत वागणाऱ्या प्रत्येक मनुष्यास घटकोघटकीं येतो. परंतु मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, त्याला कितीही दुःखें सोसावीं लागलीं तरी भावी सुखाकडे नजर देऊन तो तीं सोशीतच असतो. बरें, भावी सुख तरी निदान त्याला सोसाव्या लागणाऱ्या दुःखापेक्षां अधीक असेल म्हणावें तर तसें मुळींच कधीं प्रत्ययास येत नाहीं! उलट थोडेसें कोठें सूख होऊं लागलें तर त्यांतही कितीतरी अडचणी उपस्थित होतात! प्रपंचामध्यें सर्व गोष्टींची अनुकूलता असेल तर कांहीं तरी सुख मिळेल ही आशा! परंतु एक आहे तर दुसरें नाहीं, दांत आहेत तर चणे नाहींत, आणि चणे आहेत तर दांत नाहींत अशी परिस्थिति असली म्हणजे मग सुखाचें नांवही घ्यावयास नको. कित्येक वेळेस तर अशीही परिस्थिति असते कीं, दांतही आहेत व चणेही आहेत; पण सूख म्हणून बिलकूल लागत नाहीं. दुःखमय प्रपंचांत थोडें तरी अपवादात्मक निर्भेळ सूख कसें बरें असूं शकेल? दांत व चणे जेथें आहेत तेथें पचनशक्ति तरी अलबत कमी असतेच. सारांश काय "सुख पाहतां जवा पाडें। दुःख पर्वता येवढें" हेंच खरें.

आयुष्यांतील प्रथमचे दिवस दुःखांत जाऊन नंतर सुखाचे दिवस आले म्हणजे मनुष्यास पूर्वीं जे कांहीं कष्ट झाले असतील त्यांचें सार्थक झालें असें वाटूं लागतें. परंतु संसारांतील प्रथमचे दिवस सुखांत जाऊन नंतर जर दुःखाचे प्रसंग वारंवार येऊं लागले, तर त्यावेळीं सुखास लांचावलेल्या मनुष्याची जी कांहीं कष्टतर अवस्था होते त्याचें यथार्थ वर्णन त्या प्रसंगांत पडलेल्यांसच फक्त करितां येईल. उदाहरणार्थ, नवराबायकोचें

एक कुटुंब घेऊं. पूर्ववयांत संपत्तिसुखाचा व संसारसुखाचा यथेच्छ उपभोग घेतल्यावर उतारवयांत लहान लहान चार पोरें मागें ठेऊन बायको अगर नवरा स्वर्गवासी झाला तर त्यावेळीं त्या नवऱ्याची अथवा त्या बायकोची किती केविलवाणी अवस्था होते, याचा अनुभव बऱ्याचजणांला असेल. अशा वेळीं त्या बिचाऱ्यांना पुरे पुरे हा संसार असें होऊन जातें.

माझीही स्थिति जवळ जवळ अशीच झाली म्हणाना ! संसारांमध्यें समजूं लागल्यापासून पूर्ववयांतील सर्व दिवस सुखाचे जाऊन शेवटीं उतार वयांत पतिनिधनापासून दुःखपरंपरेस प्रारंभ झाला. संसारांतील मुख्य आधारस्तंभच अशारीतीनें कोसळल्यावर संसाररुपी दुःखानें भरलेलें घर अंगावर पडलें तर नवल काय ? पति स्वर्गवासी झाल्यावर बायकोची किती शोचनीय अवस्था होते याचें प्रत्यंतर मला हळूंहळूं येऊं लागलें. त्यांतून स्त्री भोळी अथवा थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे व्यवहारशून्य असली तर तिचे आप्त तिच्याजवळ असलेली चीजवस्त उपटण्याकरितां तिला हातोहात कसें फसवावें याच विवंचनेंत असतात आणि वेळ आली म्हणजे तिला गोड गोड थापा देऊन आणि बिचारीच्या डोळ्यांत हळूंच माती फेंकून तिचें सर्वस्व बुचाडतात. अशारितीनें बिचारीची ' ऊर्ध्वाय दिशे ब्रह्मणे नमः ' अवस्था होऊन टीचभर पोटाच्या खळगीसाठीं अब्रू गुंडाळून ठेऊन तिला दारोंदार फिरावें लागतें.

बरें, तिचे आप्त वगैरे कोणी असल्यास त्यांच्याजवळ राहून काबाडकष्ट करून अब्रूनें दिवस काढावे असें तिच्या मनांत आलें तर मरें मरेतों कष्ट करूनही आप्तांची बडदास्त ठेविण्यांत जर तिच्या हातून यत्किंचित् चूक झाली तर त्यांच्या नासक्या कुसक्या शब्दांचा यथेच्छ भडिमार बिचारीला मुकाट्यानें सहन करावा लागतो. दुर्दैव बिचारीचें कीं एक पति वारला म्हणजे बेवारश्याप्रमाणें तिची अवस्था होऊन वाटेल त्यांनीं वाटेल तशी तिची हेटाळणी करावी, मन मानेल तशी तिची मानखंडणा करावी आणि वाटेल तितके तिचे हाल करावे ! दुर्दैवापुढें कोणाचा इलाज आहे ?

असो. याप्रमाणें संकटपरंपरा सुरूं झाली म्हणजे मनुष्यास आपल्या जीवाचाही मग वीट येतो. आणि असें झालें म्हणजेच मग त्यास देव

आठवूं लागतो. मनुष्यास सुखाचे दिवस आले म्हणजे त्यास देव मुळींच आठवेनासा होतो. आणि तेंच दुःखाचे पर्वतच्या पर्वत कोसळूं लागले म्हणजे आपोआप परमेश्वराचें स्मरण त्यास होऊं लागतें. म्हणूनच वाटतें परमेश्वर मुनुष्यांस सुखांतून ओढून काढून मुद्दाम दुःखसागरांत लोटून देतो तो !

२. यात्रेस जाण्याचे अगोदर.

असो. दुःखांत सुख मानावयास मला परमेश्वरानें त्यांतल्यात्यांत थोडी-तरी सवड ठेविली होती. जी काय थोडीबहुत पुंजी जवळ होती तिच्या साह्यानें आपण आतां यात्रेला जावें असें वारंवार माझ्या मनांत येऊं लागलें. यात्रेला गेल्यानें कांहीं दिवस तरी पुण्य क्षेत्रांचें दर्शन व पवित्र तीर्थांचीं स्नानें घडून मनाला थोडा तरी विरंगुळा वाटेल असें वाटूं लागलें. त्याप्रमाणें तीर्थयात्रेला जाण्याचा निश्चय तर झाला. परंतु आपण पडलों बायको माणूस. तेव्हां बरोबर कोणीतरी पुरुष मंडळी असल्याशिवाय यात्रेचा प्रवास कसा पार पडेल याविषयीं मला मोठी काळजी पडली. परंतु त्याविषयीं देवाला काळजी ! नागपुरांतल्या नागपुरांतच माझ्याबरोबर येण्यास दोन तीन बायका तयार झाल्या. परंतु पुरुष मनुष्य कोणी बरोबर असल्यास फार बरें होईल असें वाटून आम्हीं आणखी कांहीं दिवस वाट पाहण्याचें ठरविलें. परंतु दहा बारा दिवस झाले तरी कोणी येण्याचें चिन्ह दिसेना; म्हणून आम्हीं त्रिवर्ग बायका बायकाच प्रवासास जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें आम्हीं एका शुभ दिवशीं बैलगाडींतून रामटेकास जाण्यास निघालों.

३. रामटेक.

नागपुराहून रामटेक फारसें कांहीं लांब नाहीं. आम्हीं त्याच दिवशीं सायंकाळीं रामटेकास जाऊन पोंचलों. रामटेक हें गांव एका डोंगराच्या पायथ्याशीं आहे. गांवांत अंबाळा या नांवाचा एक लहानसा तलाव आहे. त्यास अंबाळा तीर्थ असें म्हणतात. याचा आकार चोकोनी असून चारी बाजूंस चार घांट बांधिलेले आहेत. या घाटांवर महादेवाचीं लहान लहान

देवळें असून गांवालगतच असलेल्या डोंगरावर रामसीता, लक्ष्मण व महादेव यांचींही देवळें आहेत. यात्रेकरू वर सांगितलेल्या अंबाळा नांवाच्या तीर्थांत स्नान करून सोंवळ्यानें गडावर जातात. जातांना वाटेंत एकंदर तीन मोठे दरवाजे लागतात. पहिल्या दरवाज्याजवळ डाव्या बाजूस वराहदेवतेची मूर्ति आहे. दुसऱ्याजवळ वसिष्ठाची एक व दशरथाची एक अशा दोन मूर्ती आहेत. आणि तिसरा दरवाजा ओलांडून गेल्याबरोबर आंतील बाजूस सुमारें पुरुषभर उंचीची मारुतिरायाची एक दगडी मूर्ति आहे. तिसऱ्या दरवाज्यांतून आंत गेल्याबरोबर समोर प्रथम लक्ष्मणाचें देऊळ लागतें. आणि थोड्याशा अंतरावर रामाच्या देवळापाठीमागें महादेवाचें एक देवालय आहे व त्याच्या नजीकच एक टेंकडी आहे. तिला राम झरोका असें म्हणतात. या टेंकडीवर चढून सभोंवार पाहिलें म्हणजे डोंगरासभोंवतीं असलेलीं पांच लहान लहान तळीं दृष्टीस पडतात. या स्थानास रामटेक हें नांव पडण्याचें कारण असें कीं, पूर्वीं सीतालक्ष्मणासह रामवनवासांत असल्यावेळीं, काशीस जात असतांनां या डोंगरावर कांहीं दिवस विश्रांतिकरितां राहिले होते. म्हणून या स्थानास रामटेक असें नांव पडलें आहे. डोंगरावरून खालीं उतरल्यावर उजव्या बाजूस एका झाडींत किराताचें एक लहानसें देऊळ लागतें.

४. नागार्जुनाचा डोंगर.

रामटेकाच्या डोंगराजवळच नागार्जुनाचा डोंगर आहे. येथें नागाची एक मूर्ति आहे. ज्यांचीं मुलें जगत नाहींत असे लोक येथें येऊन नागबळी नारायणबळी करितात. रामटेकास दोन एक दिवस मुक्काम करून आम्हीं प्रयागास जाण्याकरितां निघालों. वाटेंत भुसावळ येथें उतरून तापी नदीचें स्नान केलें व पुन्हां गाडींत बसलों.

५ प्रयाग.

आम्हीं प्रयागास पोंचतों न पोंचतों तोंच पंड्यांची एकच लाट उसळली. जो तो पंड्या आमचीं सामानाचीं बोचकीं बेलाशक आपल्या ताब्यांत घेऊन 'आमच्या घरीं चला' 'आमच्या घरीं चला ' असें म्हणून गर्दी

करूं लागला. पंड्यांच्या ह्या धागडधिंग्यानें आम्हीं अगदीं भांबावून गेलों. आम्हांला अशी भीती पडली कीं अशा गर्दीत जर या लोकांनीं आमचीं सामानाचीं बोचकीं लांबविलीं तर आम्हांसारख्या बायकामाणसांनीं येथें काय करावयाचें ? काय करावें तें कोणासच कांहीं सुचेना. पंड्ये तर बोचक्यांचीं एकसारखी ओढाताण करूं लागले. इतक्यांत मला एक युक्ती सुचली. त्याबरोबर मीं ओरडूनच त्या पंड्यांस सांगितलें कीं, "एः खबरदार आमच्या बोचक्यांस कोणी हात लावील तर ! ठेवा तीं सर्व बोचकीं खालीं. आम्हीं आगाऊच येथील कृष्णंभट या नांवाच्या एका पंड्यास पन्नास रुपयांची मनीऑर्डर केली आहे. तुमच्यापैकीं जो कोणी तो इसम असेल त्यानेंच हीं सर्व गाठोडीं उचलावीं. इतरांनीं गडबड करण्याचें कारण नाहीं." माझें याप्रमाणें बोलणें ऐकतांच जो तो पंड्या एकमेकाकडे पाहून मागचा पाय काढूं लागला. याप्रमाणें थोडक्याच वेळांत आमच्याभोंवतीं जमलेली पंड्यांची गर्दी नाहींशी झाल्यावर आम्हीं एक टांगा ठरविला व मथुरानाथ पाठक या नांवाच्या एका पंड्याच्या घरीं जाऊन उतरलों. येथें गंगा, यमुना व सरस्वती या तीन नद्यांचा संगम झाला आहे म्हणून या क्षेत्रास प्रयाग असें नांव पडलें आहे. आणि जेथें या नद्यांचा संगम झाला आहे त्या स्थानास त्रिवेणीसंगम असें नांव आहे. या ठिकाणीं मकरसंक्रमणांमध्यें यात्रा भरते. येथील भव्य वाळवंटांत हजारों यात्रेकरू जमतात. त्यांच्याकरितां सरकारनें झोंपड्या बांधून व्यवस्था केलेली असते. कमेटीनें कंदील व मैला नेण्याचीही सोय केल्यामुळें, यात्रेकरूंची ही यात्रा विशेष आयास न होतां पार पडते. येथें तात्पुरते खाण्याचे सर्व जिन्नस विकत मिळतात. ही यात्रा एक महिनाभर असते. येथें मकरामध्यें एक महिनाभर राहिलें म्हणजे त्यास कल्पवास असें म्हणतात व काशींत नऊ महिने वास केला म्हणजे त्यास गर्भवास असें म्हणतात. येथील वाळवंटांतील वाळू पांढरी शुभ्र असून इतकी मऊ असते कीं आपण जणूं काय परांच्या गादीवरच बसलों आहों असें त्यावर बसल्यावेळीं वाटतें. प्रयागावर प्रत्येक यात्रेकरूनें ध्वज लावण्याचा रिवाज असल्यामुळें हजारों पताका वाळवंटावर फडकत असलेल्या दृष्टीस पडतात. पांढरी शुभ्र व रेशमाप्रमाणें मऊ अशी ती वाळू, हजारों यात्रे-

करूनीं गजबजणाऱ्या त्या झोंपड्या, कोणी स्नानाला जात आहेत, तर कोणी स्नानाहून देवाचीं स्तोत्रें म्हणत परत येत आहेत, कोणी 'चला लौकर स्नानाला' असें म्हणून दुसऱ्यांस गडबड करीत आहेत, कोणी स्त्रिया भक्तिपर गाणीं म्हणत आहेत, हजारों पताका फड्फड् करून जमलेल्या सर्व यात्रेकरूंचीं पातकेंच जणूं काय झाडून टाकीत आहेत, कोणी नदींत बुचकळ्या मारीत आहेत तर कोणी स्नान आटोपून घरीं जाण्याच्या तयारींत आहेत, अशा एक कीं दोन हजारों गोष्टीनीं गजबजणाऱ्या त्या प्रयागाचा देखावा काय वर्णावा! त्रिवेणीवर वेणीदान करण्याचा प्रघात आहे. तो असाः—नवराबायकोस पीतवस्त्र नेसवितात, स्त्रीस हिरव्या बांगड्या लेववितात. नंतर उभयतांस फुलांच्या मंडोळ्या बांधितात. नंतर पुण्याहवाचन झाल्यावर वाद्यांच्या गजरांत त्या जोडप्यास नौकेमध्यें बसवून जेथें तीन नद्यांचा संगम झाला आहे त्या ठिकाणीं नेतात. वांजत्रीही त्याच नौकेंत बसून त्यांच्याबरोबर जातात. मध्यभागीं गेल्यावर पती आपल्या पत्नीची सोन्याचें फूल घालून तीन बोटें वेणी घालतो व फुलासहित तेवढीच वेणी कापून ती गंगेस अर्पण करितो. परंतु आश्चर्य हें कीं, पाण्यापेक्षां केंस हलके असूनही ती कापलेली वेणी पाण्यांत बुडून तळाशीं जाते. आम्हीं ज्यावेळीं येथें आलों त्यावेळीं एक तेलंगी दांपत्य तेथें आलें होतें. त्यांतील पुरुषास वरील प्रकार म्हणजे निवळ थोतांड आहे असें वाटलें. तेल लावून केंस ओले केले असल्यामुळें पाण्यांत सहज बुडतात, त्यांत आश्चर्य कसलें? निवळ फसवेगिरीचा हा धंदा आहे दुसरें काय? असें तो तेथील पंड्यांसमक्ष म्हणाला. झालें! तेलंग्याचें याप्रमाणें भाषण ऐकतांच तेथील सर्व पंड्यांचें पित्त खवळलें. ते म्हणाले, वरील प्रकार जर खोटा असेल तर आपण पैज लावूं. व तेलंग्यानेंही पण लाविला पाहिजे. याप्रमाणें त्यांनीं शंभर शंभर रुपयांची पैज लाविली. त्या तेलंग्याची शेंडी चांगली एक हातभर लांब होती. पंड्यांनीं त्या तेलंग्यास आपल्या केसांस तेल लावून तीन बोटें वेणी घालण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर एका पंड्यानें त्याची तीन बोटें शेंडी कापून ती संगमांत टाकिली. परंतु शेंडीचे केंस तळाशीं न जातां आजूबाजूस विखरून जाऊन ताबडतोब ओघाबरोबर वाहून गेले. परंतु तेवढ्यानें त्या तेलंग्याची खात्री होईना

म्हणून रागारागानें आणखी सहा बोटें शेंडी कापून त्यानें पाण्यांत टाकिली. तरी पुन्हां तच. कँस कांहीं बुडाले नाहींत. बिचाऱ्याचें तोंड केविलवाणें झालें. पण करतो काय बिचारा! पणाप्रमाणें त्यास शंभर रुपयांस मुकावें लागून वर चार मंडळींत फजितीही करून घ्यावी लागली. असो. जें आज हजारों वर्षांपासून सतत चालत आलेलें आहे व जें नेहमीं हजारों लोकांच्या डोळ्यांसमक्ष घडत आहे आहे त्याविषयीं सहसा शंका घेणें हें धाष्टर्याचें आहे.

येथील किल्यामध्यें एक फार जुना वटवृक्ष आहे. हा किल्ला नदीच्या कांठावरच बांधिलेला आहे. या जुनाट वटवृक्षाचा बुडखाच फक्त येथें आहे, आणि काशी व गया याठिकाणीं अनुक्रमें याचा मध्यभाग व शेंडा आहे. आम्हीं प्रयागविधि आटोपून किल्यांतील वृक्ष पाहण्यास गेलों. हा वृक्ष किल्यांतील तळघरांत आहे. पूर्वीं या तळघरांत उतरतांना मशाली घेऊन जावें लागत असे. परंतु इंग्रज लोकांची वस्ती याठिकाणीं झाल्यापासून त्यांनीं तळघरांत मुबलक उजेड यावा म्हणून ठिकठिकाणीं लोखंडी जाळ्या करून बसविलेल्या आहेत; यामुळें तळघरांतील सर्व भाग स्वच्छ दिसतो. वटवृक्षाच्या बुडख्याजवळ पुरातन काळच्या ऋषींच्या मोठमोठ्या दगडीमूर्ती ठेवल्या आहेत. हल्लीं आपणांस तळघराचा जेवढा भाग दिसतो तेवढाच तो नसून त्याच्याही खालीं आणखी एक तळघर आहे. इंग्रज लोकांनीं किल्ला आपल्या ताब्यांत घेतल्यावर हें तळघर खालून मध्यभागापर्यंत बांधवून बंद करून खालीं असलेल्या ऋषींच्या मूर्ती वरच्या भागांत आणून ठेवल्या आहेत. बंद असलेला तळघराचा भाग ज्यांस पाहावयाचा असेल त्यांनीं तीनशें रुपये देऊन तो पाहण्यास जावें असा त्यानीं निर्बंध घातला आहे; यामुळें गरीब यात्रेकरूंस तो खालचा भाग दृष्टीस न पडतां वरचाच भाग काय तो फक्त पाहण्यास मिळतो. मोठमोठे श्रीमंत लोक व राजेरजवाडे मात्र हें तळघर पाहण्यास जातात.

प्रयागापासून मैल दीड मैल अंतरावर वासुकी, भारद्वाज व सोमनाथ यांची देवालयें आहेत. प्रयागास आम्हीं आठ दिवस मुक्काम करून नंतर काशीस जाण्यास निघालों.

६. काशी.

आगगाडींतून आम्हीं काशीस जाऊन पोंचतों न पोंचतों तोंच पुन्हां प्रयागाप्रमाणें येथेंही पंड्ये लोकांची गर्दी! जो तो पंड्या, ‘ चला आमचेकडे, आम्हीं तुमची यात्रा थोडक्या पैशांत करून देऊं’ असें म्हणून प्रत्येक यात्रेकरूस भंडावूं लागला. येथील पंड्ये प्रयागामधील पंड्यांपेक्षां इतके लबाड व थापेबाज असतात कीं कांहीं पुसूं नये! जसे मुंबईतील सोदे व पुण्यांतील भामटे प्रसिद्ध आहेत, त्याप्रमाणेंच येथील पंड्येही थापाडे आहेत असें पुढें दिलेल्या आमच्या अनुभवावरून म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. आम्हीं गाडींतून प्लॅटफॉर्मवर उतरतांक्षणींच कांहीं पंड्ये आमचेभोंवतीं जमले व ‘माई, आपण आमचेकडे चला, आम्हीं तुमची चांगली सोय लावून देऊं, आणि येथील यात्रेचा कार्यक्रमही थोडक्यांत करून देऊं’ असें म्हणूं लागले. तेव्हां त्यांस आम्हीं सांगितलें कीं, येथील बाबूभट गोडसे या नांवाच्या पंड्याच्या घरीं आम्हांस उतरावयाचें आहे, तेव्हां उगीच गडबड करून आम्हांस त्रास न देतां तुम्हीं मुकाट्यानें आपले दुसरीकडे जा कसे. आमचें हें बोलणें ऐकल्याबरोबर त्यांतील एकदोन पंड्ये पुढें येऊन आंबट तोंड करून म्हणाले कीं, ‘ माई आपण म्हणतां तें सर्व खरें, पण आम्हांस सांगण्यास फार वाईट वाटतें कीं, बाबूभट गोडसे हे सपुत्र पांच सहा महिन्यापूर्वींच निवर्तले. तेव्हां आपण आतां त्यांच्या घरीं जाऊन घोंटाळ्यांत पडण्यापेक्षां आमच्या घरींच चलावें हें उत्तम.’ यावर इतर पंड्येही म्हणाले कीं, ‘ माई, हे सांगतात तें अगदीं खरें आहे. तुम्हीं आपलें यांच्या म्हणण्याप्रमाणेंच करावें असें आम्हांसही वाटतें.’ त्या सिद्धसाधकांचें अशाप्रकारचें तें फसवेगिरीचें बोलणें ऐकून मला कांहीं केल्या हसूं आवरेना. मी त्या पंड्यांस म्हटलें, ‘ अहो, सुमारें एक महिन्यापूर्वींच जर आमचा व बाबूभट गोडसे यांचा पत्रव्यवहार झालेला आहे, तर ते पांच सहा महिन्यापूर्वींच नितर्वले या तुमच्या बोलण्यावर आम्हीं कितपत विश्वास ठेवावा? तुम्हांस त्याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास त्यांचें पत्र सुद्धां तुम्हांस दाखवितें. इतकें म्हणून मी पत्र शोधण्यांत

गुंतलें आहे तों ती संधी साधून आमच्यासभोंवतीं जमलेल्या सर्व पंड्यांनीं हळूच मागचा पाय काढला. अशा लोकांच्या फसवेगिरीला बळी पडून गरीब व भोळ्या यात्रेकरूंचें किती नुकसान झालें असेल व प्रत्यहीं होत असेल परमेश्वर जाणे ! असो, याप्रमाणें ती ब्याद एकदांची निघून गेल्यावर पुन्हां एखाद्या अशाच टोळीच्या तावडींत आपण सांपडूं कीं काय अशी भीति वाटून आम्हीं मग तेथें फार वेळ राहिलों नाहीं. स्टेशनाबाहेर आल्यावर एक गाडी ठरवून त्यांत आम्हीं बसलों व गाडीवाल्यास बाबूभट गोडसे यांच्या घरचा पत्ता सांगून तिकडे गाडी हांकण्यास त्यास फर्माविलें. गाडींत बसल्यावर आम्हीं आतां त्या त्रासदायक पंड्यांच्या हातून खचीत सुटलों असें वाटून आम्हांस थोडें बरें वाटलें व शांत चित्तानें इकडची तिकडची शोभा पहात पहात जाऊं लागलों. इतक्यांत एक पंड्या त्या गाडीवानास विचारून गाडीच्या पाठीमागें येऊन बसला. आम्हीं त्याबद्दल बरीच कुरकुर केली पण व्यर्थ. शेवटीं त्यांतल्यात्यांतच कसें तरी समाधान मानून घेण्याशिवाय आम्हांस दुसरा इलाज नव्हता. असो. याप्रमाणें कसेंतरी करून एकदांचें बाबूभट गोडसे यांच्या घरीं जाऊन आम्हीं पोंचलों. इतक्यांत आमच्या शेजारीं इतका वेळ बसलेला तो पंड्या आम्हांस न कळत घरांत जाऊन बाबूभटांना आम्हीं आल्याची वर्दी देऊन त्यांच्याजवळ, ' महाराज ये देखो हम् तुमारे घरकू यात्रेलोक लायाहै, हमकूं आप एक रुपिया देना चाहिये ' असें म्हणून एक रुपया मागूं लागला. तेव्हां बाबूभट आपल्याकडे कोण आलें आहे हें पाहण्यास बाहेर आले, व आम्हांस पाहिल्यावर त्या पंड्याकडे बोट दाखवून, ' यानें तुम्हांस आमच्या घरीं आणिलें आहे काय? ' असें आम्हांस विचारिलें. आम्हीं अर्थातच नकारार्थीं उत्तर दिल्यामुळें त्या पंड्यांस तोंड खालीं घालून हात हालवीत मुकाट्यानें परत जावें लागलें. सारांश काय, अशा प्रकारें येथील पंडे लोक यात्रेकरूंस फार भंडावून सोडतात.

काशींत गेलें म्हणजे यात्रेकरू पहिल्या दिवशीं क्षेत्रउपवास करून नंतर दुसरे दिवसापासून पंचतीर्थ श्राद्धांस प्रारंभ करितात. पंचतीर्थ श्राद्धें म्हणजे येथील पांच घाटांवर प्रत्येकीं एक एक अशीं पांच श्राद्धें करावीं लागतात. हीं श्राद्धें कोणी नांवेंतून त्या त्या घांटावर जाऊन एका दिवसांत संपवि-

तात, तर कोणी रस्त्यानें पायीं जाऊन प्रत्येक दिवशीं एक एक याप्रमाणें करितात. हीं पंचतीर्थश्राद्धें संपल्यावर पिशाचमोचनी या नांवाच्या येथील एका घाटावर एक श्राद्ध करावें लागतें. या घाटावर महादेवाचें एक देऊळ आहे व त्याच्या शेजारीं जवळच एका कोनाड्यांत पिशाचाचा एक दगडी मुखवटा करून बसविलेला आहे. या पिशाचमोचनी घाटावर श्राद्ध केलें म्हणजे आपळे जे जे पूर्वज पिशाचयोनीप्रत गेले असतील ते ते सर्व मुक्त होतात. या पिशाचाच्या डोक्यावर एक पाऊल दृष्टीस पडतें. तें विष्णूचें पाऊल आहे. त्याविषयीं असें सांगतात कीं, येथें पिशाचमोचनी घाटावर श्राद्ध केलें म्हणजे श्राद्ध करणाऱ्या यात्रेकरूच्या पिशाचयोनीस गेलेल्या पूर्वजांस विष्णू मुक्त करितो हें दर्शविण्याकरितां विष्णूनें आपलें पाऊल तेथें उमटविलें आहे. पिशाचमोचनी श्राद्ध झाल्यावर हस्तश्राद्ध करून यात्रेकरू पंचक्रोशीस निघतात. म्हणजे पांच तीर्थांवर पुन्हां पांच श्राद्धें करावीं लागतात. त्यांचा क्रम येणेंप्रमाणें:—प्रथम दिवशीं यात्रेकरू मनकर्णिकेंत स्नान करून साक्षीविनायक व विश्वेश्वर यांचें दर्शन घेतल्यावर पुन्हां मनकर्णिकेंत स्नान करून मौनवृत्तीनें मनांत शिवस्मरण करीत 'अशी' या नांवाच्या घाटावर जातात, व पुन्हां तेथें स्नान करून श्राद्ध केल्यावर कर्दमेश्वरास जाऊन तेथें श्राद्ध केल्यावर त्या दिवशीं पहिला मुक्काम तेथेंच करितात. येथें शंकराचें एक देऊळ आहे. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्नान करून कर्दमेश्वराचें पूजन झाल्यावर सोंवळ्यानें तसेंच भीमचंडीस जातात. येथें भीमचंडीची एक मूर्ति आहे. येथील कुंडावर स्नान करून श्राद्ध करितात. या तीर्थावर एक चमत्कार पहावयास सांपडतो. तो असा कीं, रजस्वला होणाऱ्या स्त्रियांस येथें आल्यावेळीं पाळी नसतांनाही हटकून रजोदर्शन प्राप्त होतें. म्हणून स्त्रिया या तीर्थास येण्यास निघते वेळीं, सव्वा पैशाची पिंजर भीमचंडीस वाहण्याचा नवस करितात. कारण, असें केलें म्हणजे वरीलप्रमाणें कांहीं अडथळे न येतां त्यांची ही यात्रा पार पडते. त्या दिवशीं यात्रेकरू दुसरा मुक्काम तेथेंच करितात. याप्रमाणें चारी मुक्कामास श्राद्धें करून व प्रत्येक ठिकाणीं एकेक दिवस राहून पांचवें श्राद्ध करण्यास मनकर्णिकेस परत येत असतां वाटेंत जव्या गणपतीस जातात. या ठिकाणीं जव विकत मिळतात म्हणून जव्या गणपती असें त्याचें नांव पडलें आहे. जव घेऊन मन-

कर्णिकेस येत असतांना वाटेंत श्रीविष्णूचें एक देऊळ लागतें, तेथपर्यंत मूकवृत्तीनें 'विष्णवे नमः' म्हणत ते जव पेरीत यावें लागतें. याप्रमाणें विष्णूचें दर्शन घेतल्यावर पुन्हां वाटेनें जव पेरीत व 'नमःशिवाय' असें म्हणत साक्षीविनायकाचें दर्शन घेऊन शेवटीं मनकर्णिका घाटावर आल्यानंतर स्नान करून पांचवें श्राद्ध करितात व नंतर पुन्हां विश्वेश्वर, काळभैरव, अन्नपूर्णा व दंडपाणी या देवतांचीं दर्शनें करून आपापल्या मुक्कामास जातात.

एणेंप्रमाणें पंचतीर्थ, पंचक्रोशी आदिकरून सर्व तीर्थें झाल्यावर यथाशक्ति ब्राह्मणभोजन व काळाष्टक घालावें लागतें. काळाष्टक म्हणजे काळभैरवाच्या नांवानें आठ ब्राह्मण जेवावयास बोलवावयाचें असतात. काशीस गेलें म्हणजे पंचतीर्थावर पांच, पंचक्रोशीवर पांच, पिशाचमोचनीवर एक व हस्तश्राद्ध याप्रमाणें एकंदर बारा श्राद्धें करावीं लागतात. येथें मनकर्णिकेंत स्नान करण्यास फार महत्व आहे. यात्रेकरू बिल्वपत्रांच्या लाखोल्या देवळांतील पिंडीवर न वाहतां येथेंच मनकर्णिकेंत वाहतात, व मजा अशी कीं, वाहिलेला सर्व बेल तरंगून इकडे तिकडे विखरून न जातां तो सांबाच्या पिंडीवर वाहिल्याप्रमाणें एकत्र होऊन तळाशीं जाऊन बसतो. काशीविश्वेश्वराची शेजारती मोठी पाहण्यासारखी असते. त्यावेळीं चांदीच्या घागरींतून पिंडीस पंचामृताचा अभिषेक होतो. अभिषेक झाल्यावर पिंडी पुसतेवेळीं तीवर ' श्रीराम ' अशीं अक्षरें लिहिलेलीं दिसतात. अभिषेक झाल्यावर पिंडीस केशरमिश्रित गंध लावितात. नंतर सुंदर सुंदर व सुवासिक फुलें घालून गुंफलेले हार, बिल्वपत्रें वगैरे वाहिल्यावर आरतीस प्रारंभ होतो. त्यावेळीं तेरा स्वामी एकसारखा मंत्रघोष करीत असतात. एक भला मोठा डमरूही त्यावेळीं वाजवितात. त्यावेळीं आरतीचा तो थाट पाहून मन फार सुप्रसन्न होतें. या शेजारतीचा रोजचा खर्च नव्वद रुपयांचा असतो व तो सर्व नाटकोटच्या राजाकडून होतो. विश्वेश्वराच्या दर्शनास निघालें म्हणजे अभिमुक्तेश्वर, ज्ञानवापी, मुक्तिमंडप, काळभैरव, ढुंढिराज व दंडपाणी वगैरे देवतांचीं दर्शनें वाटेनें घडतात. मनकर्णिका घाटाजवळच थोड्या उंचीवर व्यंकटेशाचें एक देऊळ आहे. व्यंकटेशाची मूर्ति फार रमणीय आहे. येथून जवळच बिंदुमाधवाचें देऊळ आहे. त्याच्या जवळच नयनमनोहर

व उंचच उंच असे मनोरे आहेत. ते फार प्राचीन काळीं बांधलेले आहेत असें सागतात. या मनोऱ्यावर चढून खालीं दृष्टी फेंकली म्हणजे सर्व काशक्षेत्र त्रिशूळाकार दिसतें व खालचीं सर्व माणसें तर एक हातभर उंचीचीं आहेत असें भासूं लागतें. बिंदुमाधवानजीक खालच्या बाजूस शेंदीडशें पायऱ्या उतरून गेलें म्हणजे गंगेचा घाट लागतो. या घाटापासून जवळच श्रीमंत अहिल्याबाई होळकर यांचा घाट आहे. या घाटावर व गंगेच्या घाटांवर प्रत्यहीं पक्ष्यांकरितां विपुल धान्य इतस्ततःपसरून ठेवि-तात. तें धान्य खाण्याकरितां नानातऱ्हेचे लहानमोठे पक्षी तेथें येतात. त्यांचे ते थवेच्या थवे पाहून मनास घटकाभर मौज वाटते.

गंगेच्या पलीकडील तीरावर व्यासकाशी आहे. येथें व्यासलिंगाचें देऊळ असून त्याची रचना फार सुंदर आहे. फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपासून तहत पौर्णिमेपर्यंत व्यासलिंगाचें दर्शनमाहात्म्य फार असतें. त्यावेळीं काशींतील सर्व लोक तेथें दर्शन घेण्यास जातात. व्यासलिंगाच्या देव-ळाच्या डावे बाजूस जवळच काश्मीरी पाषाणाची अन्नपूर्णेची एक मूर्ति आहे. येथील किल्ला भव्य असून पाहण्यालायक आहे. काशीक्षेत्रासभोंवतीं एकंदर आठ भैरव आहेत. त्यांपैकीं काळभैरवाचें माहात्म्य फार आहे.

काशीमध्यें महारवड्यांत गऊबाईचें एक देऊळ आहे. काशींत असे-पर्यंत प्रत्येक यात्रेकरूस तिजपुढें दररोज एक एक कवडी ठेवावी लागते. त्याविषयीं अशी हकीकत सांगतात कीं, गऊबाई या नांवाची एक ब्राह्मण विधवा पूर्वीं येथें होती. तिला सोंवळ्या ओंवळ्याची फार चाड असे. ती प्रत्येक दिवशीं स्नानास घांटांवर जात असे. पण घांटांवर नेहमीं आतो-नात गर्दी असल्यामुळें, स्नान करून घराकडे परत जात असतां तिला वरचेवर शिवाशिव होई. शिवाशिव झाली म्हणजे तिनें पुन्हा घांटावर परत यावें आणि स्नान करून पुन्हां घराकडे जाण्यास निघावें, तों पुन्हां शिवाशिव झाली कीं आणखी घाटावर यावें आणि पुन्हां स्नान करावें. याप्रमाणें तिचा क्रम संध्याकाळपर्यंत चाले. इकडे अन्नपूर्णादेवीचा असा नित्यक्रम असे कीं, काशीक्षेत्रांतील सर्व लोक जेविल्याशिवाय आपण जेवावयाचें नाहीं. तेव्हां या नियमास अनुसरून उपरिनिर्दिष्ट गऊबाई जेविल्याशिवाय तिला जेवितां येत नसे. व गऊबाईचा कार्यक्रम तर संध्या-

काळपर्यंत वरील प्रमाणें चालत असल्यामुळें, बिचारी अन्नपूर्णा देवी कांहीं दिवसांनीं हलके हलके रोडावूं लागली. आपली प्रियपत्नी दिवसेंदिवस रोडावत चालली आहे हें पाहून शंकरांनीं एके दिवशीं अन्नपूर्णेस त्याचें कारण विचारिलें. त्यावेळीं अन्नपूर्णेनें गऊबाईची हकीकत त्यांस निवेदन केली. तेव्हां शंकरांनीं गऊबाईस बोलावून आणून, " तूं आजपासून महारवड्यांत जाऊन रहा " असें तीस सांगितलें. तेव्हां गऊबाई म्हणाली, " इतके दिवस शुद्धाचरणानें वागून मीं तुमचें पूजन केलें तें सर्व व्यर्थच गेलें म्हणावयाचें ? " यावर शंकरांनीं तिची समजूत घालून, ' तूं महारड्यांत जाऊन जरी राहिलीस तरी तुझें माहात्म वाढेल, व प्रत्येक दिवशीं काशींत असेपर्यंत प्रत्येक यात्रेकरूनें एक एक कवडी तुला देऊन तुझें दर्शन घेतल्याशिवाय त्याची काशींतील सर्व यात्रा परिपूर्ण होणार नाहीं, " असा तिला वर दिला- काशीमध्यें सुमारें एक महिनाभर मुक्काम करून आम्हीं गयेस गेलों.

७. गया.

गयेमध्यें फल्गू या नांवाची नदी आहे. खालीं पाणी व वर वाळू अशा विचित्र तऱ्हेनें ती वाहात असते. वाळवंटांत सुमारें वीत दीड वीत उकरलें म्हणजे पाणी लागतें; आणि कांहीं वेळानें त्यांत मासेही खेळतांना दिसूं लागतात. तें पाहून आम्हांस मोठें नवल वाटलें. फल्गू नदी अशा आश्चर्यकारक रीतीनें कां वाहते या विषयीं अशी कथा सांगतात कीं, पूर्वीं सीता व लक्ष्मण यांच्यासह राम वनवासास गेले असतां पाठीमागें पुत्रवियोगदुःखानें दशरथ राजानें प्राण सोडले. तें वर्तमान कळविण्याकरितां भरत ज्यावेळीं रामाकडे गेला त्यावेळीं राम या फल्गू नदीवर आश्रम करून राहिले होते. पितृनिधनदुःखाचा ओसर झाल्यावर सर्व मंडळीसह रामचंद्रांनीं पित्याची और्ध्वदेहिक क्रिया येथें फल्गू नदीवर केली. त्यावेळीं सीतेनें दशरथास पिंड दिले नाहींत असें या फल्गू नदीनें रामास खोटेंच सांगितलें म्हणून सीतेस राग येऊन तिनें, ' आजपासून तूं उलटी वाहशील ' असा तिला शाप दिला. ही नदी उलटी वाहण्याचें

कारण हें असें आहे. येथील विष्णुपदावर एक लक्ष तुळसी व एक सोन्याचें तुळसीपत्रही करून वहावें लागतें. फल्गू नदीवर श्राद्धं करून आम्हीं अक्षयवटास गेलों.

८. अक्षयवट.

अक्षयवटावरही एक श्राद्ध करावें लागतें. या ठिकाणीं पुराणप्रसिद्ध असा एक पुराणा वटवृक्ष आहे. या वृक्षाचा बुडखा प्रयागाचे ठिकाणीं आहे, मध्यभाग काशींत आहे, व शेंडा येथें आहे. या वृक्षाचा घेर या स्थळीं सुमारें तीस चाळीस हात आहे. या ठिकाणीं या वृक्षाचा शेंडा इतका अखूड आहे कीं त्यासभोंवतीं प्रदक्षिणा घालतांना यात्रेकरूस वांकूनच जावें लागतें. या ठिकाणीं हा वटवृक्ष मातीच्या कुंडींत घालून वाढविलेल्या एका फुलतरूच्या सुंदर गुच्छाप्रमाणें सुबक दिसतो. हा वटवृक्ष फार प्राचीनकाळचा आहे म्हणून यास "अक्षयवटवृक्ष" अशी संज्ञा पडली आहे. या ठिकाणीं बहुतेक वस्ती हिंदुस्थानी बोलणाऱ्या लोकांचीच आहे. या स्थळीं एक दिवस मुक्काम करून पुढें आम्हीं हरिद्वारास गेलों.

९. हरिद्वार.

हरिद्वारास कृष्णंभट नावांच्या एका दक्षिणी ब्राह्मणाच्या घरीं आम्हीं उतरलों होतों. "गंगाद्वारे, कुशावर्ते, बिल्वतीर्थे नीलपर्वते। स्नात्वा च कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते" या श्लोकाप्रमाणें यात्रेकरू प्रथम गंगाद्वारावर तीर्थविधी करितात. नंतर कुशावर्त व बिल्व या तीर्थांत स्नानें करून नीलधारेचें स्नान करावयास जातात. हें नीलधारा तीर्थ हरिद्वारापासून दोन मैलांवर असलेल्या नील नामक एका पर्वतावर आहे. नीलधारातीर्थ म्हणजे त्या पर्वतांतून वाहणारी एक लहानशी नदी आहे. ह्या नदींत व पर्वतावर जिकडे तिकडे बाणच बाण सांपतात. यात्रेकरू ह्या नदींत स्नान केल्यावर परत येऊन कनखल तीर्थांत स्नान करितात. येथें दक्षप्रजापतीचें एक देऊळ असून त्याच्यापुढें एक कुंड आहे. त्यास दक्षप्रजापतीचें यज्ञकुंड असें म्हणतात. या कुंडाविषयीं अशी कथा आहे कीं, पूर्वीं दक्षप्रजापतीनें एक मोठा यज्ञ केला होता. त्या यज्ञास त्यानें

सर्व मोठमोठ्या ऋषींस, सर्व देवांस, व मोठमोठ्या राजेलोकांस निमंत्रण केलें होतें. परंतु शंकरपार्वतीस मुळींच बोलाविलें नाहीं. तर उलट त्यानें 'भूत पिशाचांचा राजा, अंगास चिताभस्म लावतो, 'गोसाव्याप्रमाणें राहतो, वगैरे कटु वाक्प्रहरांनीं शंकरांची निंदाच केली. इकडे पार्वतीस आपला पिता यज्ञ करीत आहे असें समजल्याबरोबर ती शंकरांकडे जाऊन यज्ञास जाण्याबद्दल त्यांची अनुमती विचारूं लागली. तेव्हां शंकर म्हणाले, ' ज्यास आपल्याविषयीं आदर नाहीं व जो आपली उलट निंदाच करितो अशा तुझ्या बापाच्या यज्ञास तूं निमंत्रण नसतांनाही जर गमन करशील तर तुझा तेथें बिलकूल मान राहणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तुझी तेथें निंदा होऊन तुला अपमानही सहन करावा लागेल. याकरितां तूं तेथें न जावें हें बरें' " परंतु शंकरांच्या या भाषणानें पार्वतीचें समाधान न होतां तिनें जाण्याचा हट्टच घेतला. तेव्हां नाइलाज होऊन शंकरांनीं तिच्या जाण्यास अनुमति दिली. त्याबरोबर मोठ्या आनंदानें पार्वती आपल्या पित्याच्या घरीं गेली. परंतु शंकरांनीं सांगितल्याप्रमाणें तिला तेथें कोणी विचारिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर ' एका गोसावड्याची बायको आगंतुकपणा करून आली आहे ' अशा अपमानस्पद शब्दांनीं दक्षप्रजापतीनें तिची अवहेलनाच केली. प्रत्यक्ष बापाच्या तोंडानें असे निंदाव्यंजक शब्द ऐकून पार्वतीस मेल्यापेक्षांहि मेलें होऊन आपल्या बापाविषयींचा तिचा आदर पार नाहींसा झाला व त्याच्याविषयीं तिचे मनांत तिरस्कार मात्र उत्पन्न झाला. व त्या संतापाच्या भरांत अशा बापापासून उत्पन्न झालेला आपला देह त्यापुढें धारण करण्याची तिला लाज वाटून तिनें यज्ञाकरितां पेटलेल्या कुंडांत उडी घेऊन स्वतःस भस्म करून टाकिलें. पुढें शंकरास तें वर्तमान समजतांच त्यांनीं दक्षप्रजापतीची चांगलीच खोड जिरविली वगैरे कथा पुराणांत वर्णन केलेली आहे. पार्वतीनें ज्या कुंडांत उडी घेतली तेंच हें कुंड होय.

हरिद्वाराहून जवळच असलेल्या एका पर्वतावर मायादेवीचें एक देऊळ आहे. तिला चंडिकादेवी असेंही म्हणतात. हा पर्वत चढण्यास फार अवघड आहे. या पर्वतावरून कांहीं त्रास न होतां परत येतां आलें तर गंगोत्रीचा पुढील अवघड प्रवास आपल्या हांतून पुरा होईल अशी आशा

वाटूं लागते. नाहींतर येथूनच पुढील प्रवासास रामराम ठोकावा लागतो. हरिद्वारास चार दिवस मुक्काम करून पुढें उत्तरकाशीच्या प्रवासास आम्हीं आरंभ केला. हरिद्वार सोडतेवेळीं पुढील प्रवासास अत्यंत उपयुक्त असे जिन्नस पुढें लिहिल्याप्रमाणें येथूनच बरोबर न्यावे लागतात. पुढें डोंगरांतून, खोऱ्यांतून प्रवास करीत असतां पाण्यांतूनही कित्येक वेळां जाण्याचा प्रसंग येतो. त्या प्रांतांतील पाण्यांत जळवा फार असल्यामुळें, अशा प्रसंगीं पायांत कांहीं नसलें तर त्या जळवांपासून पायास फार उपद्रव होतो. तो होऊं नये म्हणून सुतळीचा तळ असलेले कींनतानचे पायमोजे बरोबर घ्यावे लागतात. पर्वतांवरून जात असतां बर्फ पडत असल्यावेळीं डोक्यास त्यापासून त्रास होऊं नये म्हणून लोंकरीच्या कानटोप्याही बरोबर असाव्या लागतात. पुढें कोणत्याही ठिकाणीं डाळ, तांदूळ, मसाला, तिखट, मीठ, लोणचें वगैरे आपल्या इकडे मिळणारे सर्व आवश्यक जिन्नस मिळण्याची सोय नसल्यामुळें, हे सर्व जिन्नस हरिद्वारांतूनच बरोबर न्यावे लागतात. पर्वत चढून जातांना व उतरतांना काठीशिवाय चालत नसल्यामुळें, एक काठीही बरोबर घ्यावी लागते. ह्या काठ्या येथें विकत मिळतात. पुढील प्रवासास आरंभ करावयाच्या वेळीं हरिद्वारापासून जवळच असलेल्या एका डोंगरांत भीमगोडा या नांवाचें विहीरवजा लहानसें एक तीर्थ आहे. त्यांत बरोबर न्यावयाच्या काठीस स्नान घालावें लागतें. नंतर त्या काठीस शिरणीचा नैवेद्य दाखवून 'गरुडभगवान्' असें तिचें नांव ठेवितात. या काठीस पुढें प्रत्येक दिवशीं सव्वा पैशाचा नैवेद्य दाखवावा लागतो. ही काठी बरोबर असली म्हणजे गंगोत्रीचा सर्व अवघड प्रवास सुखरूपपणें पार पडतो. ठिकठिकाणीं ज्याप्रमाणें प्रवासोपयोगी साधनें मिळतात त्याप्रमाणें येथेंही आहेत. गरीब लोक सामान नेण्याकरितां करंड्या करितात व आपण सर्व प्रवास पायींच आटोपतात. जे श्रीमंत असतात ते सामाना करितां व आपल्याकरितां झंपान करितात. झंपान म्हणजे एक प्रकारची डोली असते. तिजमध्यें पाय सोडून बसण्याची सोय केलेली असते. हीं झंपानें व करंड्या येथील भिल्ल लोक वाहून नेतात. हे भिल्ल लोक पिंडानें फार सशक्त असून गोरेपान असतात. या लोकांची सर्व वस्त्रें मुख्यत्वेंकरून कांबळ्यांचीं केलेलीं असतात. यांचें नेसतें वस्त्रही कांबळ्या-

चेंच असतें. कारण या बाजूस कापसाचें पीक मुळींच नसल्यामुळें, व दुसरीकडूनही कापूस येथें आणण्याची व्यवस्था नसल्यामुळें, या भिल्ल लोकांस या ठिकाणीं मुबलक मिळणाऱ्या बकऱ्यांच्या लोंकरीच्या वस्त्रांवरच आपली गरज भागवून घ्यावी लागते. त्यांचीं वस्त्रें फाटलीं तर तीं शिवण्यास दोरे व सुया येथें मिळण्याचा पूर्ण अभाव असल्यामुळें, हे लोक प्रतिवर्षी येणाऱ्या यात्रेकरूजवळूनच सुया व दोरे मागून घेतात. म्हणून यात्रेकरू लोक हरिद्वाराहून निघते वेळींच मुंबईबंडलचा दोरा व मोठ्या सुयाबरोबर नेतात. असो. वर नमूद केलेल्या सर्व जिनसांचा संग्रह करून, 'गरूड भगवान् कीं जय' अशी गर्जना करून आम्हीं पुढील प्रवासास निघालों.

१०. लक्ष्मणझुला.

जातांना वाटेंत लक्ष्मणझुला या नांवाचा एक पूल लागतो. या पुलाजवळच रामलक्ष्मणांच्या सुंदर मूर्ती आहेत.

११. हृषीकेश.

आमचा पहिला मुक्काम हृषीकेश मुक्कामीं झाला. या ठिकाणीं चतुर्भुज हृषीकेशाचें देऊळ आहे.

१२. हृषीकेशाहून जातांना वाटेंत.

येथून पुढें जातांना गगनचुंबित वृक्षादिकांनीं गजबजलेलें एक भलें मोठें जंगल लागतें. परंतु आपल्याकडील जंगलासारखीं या बाजूंचीं हिमालयांतील जंगलें हिंस्त्र पशुपक्ष्यादिकांनीं गजबजलेलीं नसतात; इतकेंच नव्हे तर कांटेरी झाडेंझुडपेंही फारच क्वचित ठिकाणीं आढळतात. उलटपक्षीं येथें नानातऱ्हेच्या लहानमोठ्या नाजुक वेली, आपल्या इकडे पाहण्याससुद्धां दुर्मिळ अशीं नानाप्रकारचीं सुंदर सुंदर फुलें, लतागुच्छांनीं वेष्टिलेले नानातऱ्हेचे वन्य फुलतरू वगैरे दृष्टिमनोहर देखावा पाहून मनास कल्पनातीत आमोद होतो, आणि आपण इंद्राच्या नंदनवनांत काय आहों असें वाटूं लागतें. त्या सुंदर सुंदर व सुकुमार वन्य

पाहून तर शाकुंतल नाटकांतील " दूरीकृताःखलु गुणैः उद्यानलता वनलताभिः " या श्लोकार्धाची आठवण झाल्याखेरीज राहात नाहीं. असो. इकडील जंगलांमध्यें मुख्यत्वेंकरून देवद्वाराचे वृक्ष फार आहेत. हें जंगल तुडवून आम्हीं पुढें गेल्यावर चढण्याउतरण्यास अतिशय बिकट असे पर्वत आम्हांस लागले. ह्या पर्वतावर चढत असतांना असे बिकट पर्वत ओलांडूनें हा प्रवास आमचे हांतून पुरा होणें केवळ अशक्य आहे असें क्षणोक्षणीं आम्हांस वाटत होतें. परंतु परमेश्वरकृपेनें तसल्या बिकट पर्वतांतूनही आम्हीं शिवकोटीस जाऊन पोंचलों.

१३. शिवकोटी.

सकृद्दर्शनीं शिवकोटी हें क्षेत्र असावें असें आमच्या वाचकांस वाटण्याचा संभव आहे. पण शिवकोटी हें क्षेत्र नसून हृषीकेशाहून सत्यनारायणास जातांना वाटेंत यात्रेकरू लोकांना विश्रांति घेण्यासाठीं बांधलेली एक चट्टी आहे. हें तिन्ही बाजूंनीं दगडी असून त्यावर एक देवद्वारी सोट आडवा टाकिलेला असतो. आणि त्यावर येथें विपुल मिळणाऱ्या तमालपत्रांच्या डाहळ्या टाकून तें आच्छादलेलें असतें. हरिद्वारापासून बद्रिनारायणास जाईपर्यंत अशा अनेक चट्या वाटेंत लागतात. शिवकोटीस एक दिवस विश्रांति घेऊन आम्हीं पुढें निघालों.

१४. चाळीस नदी.

वाटेंत चाळीस या नांवाची एक नदी लागते. ही नदी गंगोत्रीचा प्रवास करतांना चाळीस वेळां वाटेंत लागते. म्हणून या नदीस चाळीस असें नांव पडलें आहे.

१५. सत्यनारायण.

या चाळीस नदीचें स्नान करून आम्हीं सत्यनारायणास गेलों. या ठिकाणीं सत्यनारायणाची एक भव्य मूर्ति आहे. मूर्तीचें पूजन करून त्या दिवशीं आम्हीं तेथेंच विश्रांति घेतली.

१६. डेहरादून.

नंतर दुसरे दिवशीं तेथून निघून पुढें डेहरादून या नांवाच्या एका शहरीं आम्हीं जाऊन पोंचलों. हरिद्वाराहून डेहरादूनपर्यंत रेल्वेचा एक फांटा आहे. डेहरादून हें मोठें पाहण्यासारिखें शहर आहे. येथें एक कॉलेज आहे. प्रसिद्ध नानक पंथाची गादीही येथेंच आहे. हवेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीनें हें शहर फार वाखाणण्यासारिखें आहे. या ठिकाणीं एकच दिवस मुक्काम करून आम्हीं उत्तरकाशीस गेलों.

१७. उत्तरकाशी.

वाचकांस उत्तरकाशी हें काशीप्रमाणेंच एक मोठें शहर असावें, असें वाटणें साहजीक आहे. पण उत्तरकाशीस एका लहानशा खेड्याचीसुद्धां उपमा देतां यावयाची नाहीं. या ठिकाणीं अवघीं १०।१२ घरें असतील नसतील एवढेंच. येथें उत्तरकाशी या नांवाची एक नदी वाहते. या नदीच्या तीरावरच एक महादेवाचें देऊळ आहे. या ठिकाणीं नदीवर तीर्थविधि करावा लागतो. उत्तरकाशीहून गंगोत्री, जम्नोत्री व बद्रिनारायण या तीन ठिकाणांस जाण्याकरितां तीन रस्ते फुटलेले आहेत. उत्तरकाशीस एक दिवस राहून दुसऱ्या दिवशीं मोठ्या पहांटेस जंबोत्रीचा पहाड चढण्यास आम्हीं सुरवात केली.

१८. जंबोत्रीचा पहाड.

इतका वेळपर्यंत आम्हांस वाटत होतें कीं आतांपर्यंत चढून आलेल्या बिकट पर्वतापेक्षां आणखी बिकट पर्वत असणें शक्यच नाहीं. परंतु आता जंबोत्रीचा पहाड पहावा तो कांहीं विलक्षणच! आतां मात्र आमचें धैर्य हळू हळू विगलित होऊं लागलें. हो! एकेक मोठा अवघड व भयंकर पहाड पुढें तरी चांगला रस्ता लागेल या आशेवर मोठ्या हिंमतीनें कसाबसा चढून जावा, तर पुढें चांगला रस्ता येण्याऐवजीं पूर्वींपेक्षांही चढण्यास अतिशय कठीण असा एकेक बिकट पर्वत येऊं लागला! असें जर ... लागलें तर मनुष्यानें धीर तरी कोठवर धरावा? एकेक वृक्ष तर आक

टेकलेला ! वेळीं आम्हांस पुढील म्हणींची आठवण झाल्याखेरीज राहिली नाहीं. 'जिभेला हाड नाहीं,' 'तळहाताला केंस नाहींत,' 'घोड्याला स्तन नाहींत,' सशाला शिंग नाहीं,' व आकाशाला खांब नाहीं.' आकाशाला खांब नाहीं हें खरें; पण या पर्वतावरील ते गगनाचा ठाव पहाणारे वृक्ष पाहून वरील शेवटल्या म्हणीस बाध येतो कीं काय असें आम्हांस वाटलें. त्या पर्वतावरील रस्ता तरी किती अरुंद ! कोठें कोठें तर एक वीत दीड वीत रुंद असेल कीं नाहीं याची शंकाच ! या असल्या भयाण पर्वतांवरून जीव कसा अगदीं मुठींत धरून जावें लागतें. केव्हां पाय घसरून आपला कडेलोट होतो याची क्षणोक्षणीं धास्ती वाटत असते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जीवाची आशा सोडूनच या पर्वतावरील प्रवासास तयार व्हावें लागतें. म्हणून कांहीं धाडशी यात्रेकरूखेरीज जम्नोत्रीस जाणारे लोक फारच क्वचित आढळतात. आमच्याबरोबर एक मास्तर आले होते. त्यानीं तर हे मोठमोठाले भीषण पर्वत पाहून पुढील जंम्नोत्रीची यात्रा आपल्या हांतून होणें शक्य नाहीं म्हणून धास्तीच घेतली. आम्हीं त्यांस पुढें येण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. पण शेवटपर्यंत त्यांनीं 'शक्य नाहीं,' या चतुर्थाक्षरी मंत्राचा जप कांहीं केल्या सोडला नाहीं. तेव्हां मोठ्या नाइलाजानें जंम्नोत्रीहून आम्हीं परत येईपर्यंत त्यांस तेथेंच वाट पाहण्यास सांगून आम्हीं आमचें घोडें पुढें दामटलें. जंम्नोत्रीस जाऊन पोंचेपर्यंत वाटेंत सहा सहा, सात सात मैलांवर चट्या लागतात. चट्टीच्या बाह्यरंगाचें वर्णन मागें एका प्रसंगीं आलेलेंच आहे. आतां त्याच्या अंतरंगाचें थोडेसें वर्णन करूं. या चट्टीच्या आंतील बाजूस एक दुकान असतें. ह्या दुकानाचाही मालक चट्टीवालाच असतो. या दुकानांत मिळणारे जिन्नस म्हटलें म्हणजे कुट्टूच्या बियांचें पीठ, लाल तांदूळ, गव्हाचें पीठ, व क्वचित्प्रसंगीं उडदाची डाळ हे होत. या ठिकाणीं दुकानाचा मालक सांगेल तो भाव मान्य करावा लागतो. कारण पर्वतांवरील अवघड चढउतार करून दमल्याभागलेल्या उतारूंची 'अडल्या नारायणाप्रमाणें' अवस्था होत असल्यामुळें, निमूटपणें दुकानवाला सांगेल तो भाव मान्य करावा लागतो. बरें, त्याचा माल न घ्यावा तर तो चट्टीचा मालक असल्यामुळें, आपल्या चट्टींत माल

न घेणाऱ्या यात्रेकरूस उतरण्याची मनाई करितो. बरें, चट्टीच्या बाहेर रहावें म्हटलें तर रात्रीच्या व पहांटेच्यासमयीं सोसाट्याचा गार वारा एकसारखा वहात असल्यामुळें, व बर्फही पडत असल्यामुळें, त्या प्रसंगीं त्या दुकानदाराशीं हुज्जत घालीत बसण्यापेक्षां 'बाबा वाक्यं प्रमाणं' असें म्हणून तो सांगेल तें निरुपायानें मान्य करावें लागतें. असो. अशारीतीनें ठिकठिकाणच्या चट्ट्यांतून मुक्काम करीत करीत उत्तरकाशी सोडल्यापासून सुमारें दहा बारा दिवसांनीं आम्हीं जंबोत्रीजवळील एका पठारावर जाऊन पोंचलों.

१९. जंबोत्रीचें प्रथमदर्शन.

येथून जंबोत्री दिसूं लागते. हेंच जंबोत्रीचें प्रथम दर्शन होय. साध्य करून घ्यावयाच्या कामांत जेवढीं विघ्नें अधीक, तेवढें त्या कामाचें महत्वही पण अधीक वाटूं लागतें. आणि शेवटीं अशा विघ्नांनां न जुमानतां आपण तें काम हस्तगत करून घेतलें म्हणजे त्यावेळीं जो कांहीं आपणांला आनंद होतो तो कांहीं विचारूंच नये! आपण आतां कृतकृत्य झालों असें वाटूं लागतें. आम्हांसही इतक्या अवघड व भयाण पर्वतांमधून सुखरूपपणें येथवर येऊन इष्टकार्याची सिद्धी आतां लवकरच प्राप्त होणार म्हणून वरील प्रमाणेंच वाटूं लागलें. आतां फक्त एक उतरण काय ती उतरावयाची राहिली होती. ती उतरून गेलें कीं, जंबोत्रीच्या परमरमणीय स्थानांत आमचा प्रवेश होणार होता. एकच उतरण, पण ती किती बिकट! खोल तरी किती कांहीं पुसूंच नये. जरा पाय घसरला कीं पाताळाचा व स्वर्गाचा ठाव एकदमच दिसावयाचा! कसें उतरावें याविषयीं सर्वांस मोठी चिंता पडली.

२०. जंबोत्रीस पोहोंचण्याचे अगोदर.

नंतर कांहीं वेळानें आमच्यांपैकीं जे कोणी तरुण व सशक्त होते ते धिटाईनें पुढें होऊन म्हणाले, "आम्हीं पुढें होतों व आम्ही जर नीटपणें उतरूं शकलों तर तुम्ही मागून या." असें म्हणून ते उतरण्याच्या बेतासही लागले. पण मीं त्यांस म्हणालें कीं "तुम्हीं अद्याप तरुण

आहां, व पुरुषासारिखे पुरुष आहांत. तुमचा इतर लोकांस व घरांतील माणसांस पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. मीच पुढें होतें. माझें काय होईल तें होवो; तुम्हीं नंतर माझ्यामागून या." असें म्हणून परमेश्वराचें चिंतन करून मीं उतरण्यास पुढें झालें. ही उतरण उतरत असतांना पुढचें पाऊल कसें व कोठें टाकावें याची विवंचना पडे. ही उतरण उतरण्यास आम्हांस सुमारें दीड तास लागला. शेवटीं एकदांचें आम्हीं जंबोत्रीस जाऊन पोचलों. त्यावेळीं आम्हांस जो काय आनंद झाला आहे तो लेखणीनें वर्णन करतां येणें शक्य नाहीं !

२१. जंबोत्री.

येथें फक्त एकदोनच पंड्ये असतात. यापेक्षां अधीक मनुष्यवस्ती येथें असत नाहीं. हे पंड्ये लोकच चट्टींत बसून सामानसुमान देतात, व यात्रेकरूंचे विधीही चालवितात. येथें स्नानाकरितां एक उष्णोदकाचें कुंड आहे. या ठिकाणीं दोन प्रवाह उंच डोंगरावरून खालीं वाहात येतांना दृष्टीस पडतात. त्या दोन प्रवाहैपैकीं एक प्रवाह हिरव्या रंगाचा असून एका तो जांभुळाच्या वनांतून येतो, व दुसऱ्या बाजूनेंही एक प्रवाह येतो त्या प्रवाहाचें पाणी उष्ण असून त्यांतून एकसारख्या वाफा निघत असतात. एका बाजूस सुंदर, स्वच्छ व हिरव्या रंगाचा प्रवाह, आणि दुसऱ्या बाजूस वाफा निघत असलेला प्रवाह असा देखावा पाहून मनाला फार आनंद होतो. या दोन प्रवाहांचा वेग पाहून असें वाटतें कीं, जणूं काय या दोघांमध्यें इच्छित स्थलीं जाऊन पोंचण्याबद्दल चढाओढच लागलेली आहे ! हिरव्या पाण्याचा प्रवाह जांभुळाच्या वनांतून येतो म्हणून त्यास जंबोत्री (जम्नोत्री, जमुना, यमुना) असें म्हणतात. या प्रवाहांचीं उगमस्थानें शोधून काढण्याचा कांहीं पाश्चात्य शोधकांनीं प्रयत्न केला होता म्हणतात. परंतु सर्व बचावाचीं साधनें जवळ असतांही ते शोधक या प्रयत्नांतच मरण पावले असें सांगतात. ' नदीचें मूळ व ऋषीचें कूळ ' कोणी शोधूं नये असें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. असो डोंगरांतून वाहात येत असतांना या दोन्ही प्रवाहांमध्यें सुमारें एक फर्लांगभर अंतर आहे. परंतु जंबोत्रीजवळ

हें अंतर अवघें १०।१२ फुटांचेंच आहे. या ठिकाणीं यात्रेकरू प्रवाह ओलांडून दोन्ही प्रवाहांमधील जागेंत जातात, व तेथें एकदां थंड प्रवाहाचें व एकदां उष्ण प्रवाहाचें स्नान करितात. उष्ण प्रवाह ओलांडून जाण्याकरितां लांकडांचीं मोठमोठीं ओंडकीं टाकून एक पूल तयार केलेला आहे. या प्रवाहांतून जरी वाफा निघतांना दिसतात तरी जेथें पूल बांधिलेला आहे येथें पाणी तितकें उष्ण नाहीं.

येथील यात्रेचा क्रम असा आहे कीं, प्रथम उष्णकुंडांत स्नान केल्यावर दोन्ही प्रवाहांमधील जागेंत जाऊन दोन्ही प्रवाहांचें स्नान करावें लागतें. हीं सर्व स्नानें आटोपल्यानंतर यमुनेच्या देवालयांत जाऊन दर्शन घेतात. यमुनेचें देवालय सुमारें सात आठ फूट उंच असून सरासरीं सहा फूट लांब व पांच फूट रुंद आहे. येथें स्नानास फार महत्व आहे. देवालयांत सुमारें तीन एक फूट उंचीची यमुनेची मूर्ति आहे. ती स्वयंभू असून काळ्या पाषाणाची आहे.

आम्हीं सर्वांनीं स्नानें आटोपून यमुनेचें दर्शन घेतल्यावर गोरखडिब्बी या नांवाच्या कुंडाकडे कूच केलें. गोरखडिब्बी असें या कुंडास नांव पडण्याचें कारण कांहीं समजत नाहीं. तथापि गोरखनाथांनीं येथें तपश्चर्या करून हें कुंड निर्माण केलें असावें असें सांगतात. हें कुंड अगदीं लहान म्हणजे सुमारें दोन चौरस फूट आहे. यांतील पाणी अतिशय उष्ण असून आंतून सारख्या उकळ्या येत असतात. कुंडापासून थोडें दूर उभें राहून कुंडांतील पाण्याकडे पाहिलें म्हणजे पाणी खालीं झुळझुळ वहात असावें असें वाटतें. परंतु कांठावर उभें राहून पाहिलें तर पाणी स्थिर असून आंतून उकळ्या येत असतांना दिसतात. येथें स्वयंपाक करण्यास चूल, लांकडें वगैरेची मुळींच जरूर पडत नाहीं. कारण परमेश्वरानें येथें यात्रेकरूं करितांच जणूं काय हें कुंड निर्माण करून स्वयंपाकपाण्याची सोय करून ठेविली आहे! येथील स्वयंपाक करण्याची रीत अशी आहे कीं, एका फडक्यांत तांदूळ घेऊन ते थोडेसे सैल बांधून तें गांठोडें कुंडांतील उष्ण पाण्यांत सोडावें. कुडांतील पाणी अतिशय उष्ण असल्यामुळें, दोन तीन मिनिटांच्या अवधींतच ते तांदूळ शिजून गांठोडी वर येते. ती वर काढल्यावर सोडून कांठावरील गुळगुळीत फरशीवर ठेवावी. कांठावरील

जमीनही इतकी उष्ण असते कीं लवकरच भातांतील सर्व पाणी सुकून जाऊन भात अगदीं मोकळा होतो. याप्रमाणें भात तयार झाल्यानंतर गव्हाच्या रोट्या करून त्या कुंडांत टाकाव्या. एक दोन मिनिटांतच त्या कढईत टाकलेल्या पुऱ्याप्रमाणें वर तरंगू लागतात. त्या चिमट्यानें नंतर वर काढून घ्याव्या. अशा प्रकारें पाकसिद्धता करण्याची येथील रीत आहे. या कुंडांत शिजलेलें अन्न प्रसाद म्हणून यात्रेकरू बरोबर नेतात. आम्हीं या ठिकाणीं दोन दिवस मुक्काम केला. कोणीही यात्रेकरू येथें सहसा तीन दिवसांवर राहात नाहीं.

२२. पुन्हां उत्तरकाशी.

नंतर कुंडांत शिजलेलें अन्न प्रसाद म्हणून बरोबर घेऊन आम्हीं परत निघालों, व दरकूच दरमजल करीत आम्हीं परत उत्तरकाशीस आलों. उत्तरकाशीमध्यें एक दिवस राहून नंतर गंगोत्रीचा मार्ग आक्रमण करण्यास आम्हीं सुरवात केली. उत्तरकाशीहून निघाल्यापासून तिसऱ्या दिवशीं आम्हीं भट्यारी या नांवाच्या गांवीं जाऊन पोंचलों.

२३. भट्यारी.

या प्रदेशांत गांवें अशीं फारच थोडीं आहेत. सरासरीं २०।२५ घरें असलीं म्हणजे तें एक साधारण गांव झालें.

२४. भट्यारीहून पुढें.

भट्यारीहून आम्हीं निघालों तों सकाळीं नऊ वाजण्याच्या सुमारास एका बैराग्याच्या मठीपाशीं आलों. आमच्या वाटेपासून सुमारें वीस यार्डांचें अंतरावर एका डोंगराच्या कपारींत एक बैरागी बसलेला होता. त्यानें मोठमोठ्यानें " माई इधर आव " " माई इधर आव " अशा हांका मारून आम्हांस आपल्याजवळ बोलाविलें. त्याची ती हांक ऐकून मी एकटीच त्याच्याजवळ गेलें. जवळ गेल्यावर त्यानें मला विचारिलें " माई, तुमारा संकल्प यथाशास्त्र यात्रा करनेका होगा, तो हमारी बात सुनो. " मी होकारार्थी मान हालविल्यावर त्यानें मला सांगितलें कीं, " माई तूं दक्षिणी आहेस. हा प्रवास फार दगदगीचा आहे. रस्त्यानें खाण्यापिण्याची हयगय केल्यास फार त्रास होऊन आजार देखील उद्भव-

तात, व पुष्कळ लोक प्राणासही मुकतात. याकरितां ज्या ज्या वेळीं तुला थकवा आला आहे असें वाटेल त्या त्या वेळीं थोडा विसांवा घेऊन बरोबर आणिलेंलें कांहीं खाल्यानंतर पुढील रस्ता गांठ. तसेंच रोज कमींत कमी एक छटाक (५तोळे) तूप खात जा. " त्यावर मी त्या बैराग्यास म्हणालें कीं, " इकडचें तूप घाणेरडें असतें, तें माझ्यानें खाववणार नाहीं. " यावर तो म्हणाला " घाणेरडें असलें तर पिठांत घालून किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेनें तें पोटांत जाईल असें तुला केलें पाहिजे. त्याखेरीज तुझी धडगत लागणार नाहीं. " त्याच्या उपदेशाप्रमाणें मी पुढें वागलें म्हणून मला खरोखरीच कांहीं त्रास झाला नाहीं. सबंध प्रवासांत एकाही दिवशीं माझें कपाळ दुखलें नाहीं कीं ताप येऊन मी आजारीही पडलें नाहीं. त्याचदिवशीं आम्हीं एका चट्टीवर उतरलों असतां, तेथेंच दुसऱ्या एका बाजूस उतरलेल्या यात्रेकरूंचा संवाद आमच्या कानीं आला. ते बिचारे जंत्रोत्रीच्या प्रसादाकरितां हळहळत होते. " जंत्रोत्रीचें दर्शन नाहीं तर नाहीं निदान तेथील प्रसाद जरी मिळाला तरी फार बरें होईल " असें ते आपापसांत म्हणत होते. त्यांचा तो संवाद ऐकून मला त्यांच्याविषयीं वाईट वाटून आपल्या जवळचा जंत्रोत्रीचा प्रसाद त्या सुमारें १००।१२५ यात्रेकरूनां वांटून टाकण्याचा मीं निश्चय केला. एकदां वाटलें कीं, त्यांतील थोडासा प्रसाद आपल्या घरीं न्यावा. पण नंतर असाही विचार मनांत आला कीं आपण इतक्या आस्थेनें व भक्तीनें नेलेल्या प्रसादाची तेथें विटंबना झाली तर ! त्यापेक्षां तो घरी न नेतां येथेंच या लोकांना वाटून टाकावा हें उत्तम. याप्रमाणें विचार मनांत आल्याबरोबर प्रसाद घरीं नेण्याचा बेत रहित करून त्याबद्दल हळहळत असलेल्या त्या यात्रेकरूंस तो मी वांटून टाकिला. त्या लोकांस तो प्रसाद अशा अनपेक्षित रीतीनें मिळाल्यामुळें फार आनंद झाला व त्यांनीं तो मोठ्या भक्तीनें ग्रहण केला. त्यांचा तो आनंद पाहून माझ्याही मनाला फार समाधान वाटलें; आणि प्रसाद भाविकांचे हातीं पडून करणीं लागला याबद्दल फार आनंद झाला.

२५. रामघाट.

हा मुक्काम सोडल्यानंतर नऊ कोस एकसारखा चढउतार ओलांडून जावा लागतो. हा कष्टमय प्रवास संपवून आम्हीं रामघाट या नांवाच्या शहरीं गेलों. रामघाटापासून पुढें सुद्धां रस्त्यानें फार चढउतार लागतात. कोठें कोठें सपाट रस्ताही लागतो.

२६. रामघाटाहून पुढें.

येथील वनश्रीची शोभा अपूर्व आहे ! हा प्रदेश म्हणजे निसर्गदेवतेचा एक रमणीय बगीचाच आहे असें वाटतें. देशावर कधीं न पाहिलेलीं नानातऱ्हेचीं सुंदर सुंदर फुलें व लता, टेंकड्यांवरून मोठ्या वेगानें खालीं धांवत जाणारे ते पाण्याचे शुभ्र प्रवाह, वगैरे मनोहर देखावा पाहून निसर्गदेवतेच्या रमणीयत्वाचें फार कौतुक वाटलें.

२७. गंगनेरचट्टी.

या प्रदेशांत मुख्यत्वेंकरून देवद्वाराचीं झाडें विपुल आहेत. इकडे प्रवास करतांना चोर चिलटांची मुळींच भीति नाहीं. मार्गानें प्रवास करतांना जर आपली एखादी वस्तू आपल्यास नकळत पडली तर परत येतांना आपणांस ती खात्रानें सांपडते. यावरून पुराणांतरीं वर्णन केलेल्या सत्ययुगाची आठवण होते. पुढें मार्गांत आम्हांस गंगनेरी या नांवाची एक चट्टी लागली. चट्टीपासून थोड्याच अंतरावर एक नदी वाहते. नदीच्या पैलतीरावर पाराशर ऋषींची एक मूर्ति आहे.

२८. कप्पर घाटास जातांना.

नदींत स्नान करून मूर्तीची पूजा केल्यानंतर आम्हीं पुढचा मार्ग धरला. रात्रीच्यावेळीं चट्टीवर मुक्काम केल्यावर यात्रेकरू मोठमोठीं ओंडकीं पेटवून त्यासभोंवतीं आपापल्या भाषेंत भक्तिपर भजनें म्हणून देवाला आळवीत बसतात. तो त्यांचा भजनानंद केवळ अवर्णनीय असतो ! वाटेंत सती अहिल्याबाई होळकर यांचीं सदावर्तें आहेत. या सदावर्तांतून गरीब यात्रेकरूस शिधा व आटा देण्याची व्यवस्था केलेली असते.

वाटेंत एके ठिकाणीं दोन पर्वतशिखरावरून एक जाड तार आंवळून बांधिलेली आहे. या तारेवर तारेचेंच एक शिंकें अडकविलेलें असतें. पलीकडे जाण्यास दुसरा रस्ता नसल्यामुळें, या शिंक्यांत बसूनच पलीकडील पर्वतशिखरावर जावें लागतें. मध्यंतरीं नदी ओलांडून जाण्याचाही प्रसंग वारंवार येतो. अशा वेळीं लांकडी पुलांवरून जावें लागतें. ह्या लांकडी पुलांस सांगे असें म्हणतात. यांची रचना अशी असते कीं नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर लांब लांब देवदारी सोट टाकून त्यांवर गवत अथवा तुरकाठ्या आंथरलेल्या असतात. उभ्यानें या पुलांवरून चालत जाण्याची सोयच नसते. कारण जर कां एखादा पाय घसरला तर ' नद्यस्तृप्यन्तु ' होण्याचीच पाळी ! या करितां या सांग्यांवरून हळू हळू रांगत जाणें भाग पडतें. एका पर्वतशिखरावरून दुसऱ्या पर्वतशिखरापर्यंत तारांना तणावा देऊन एक अरुंदसा पूल तयार केलेला असतो. ह्या पुलांस हिंदुस्थानी भाषेंत झुला असें म्हणतात अशा प्रकारचे झुले आणखी तीन चार ठिकाणीं लागतात.

वर वर्णन केल्याप्रमाणें शिंकीं, सांगे, व झुले यांवरून मार्ग आक्रमीत आम्हीं सुमारें पंधरा वीस फूट रुंदीच्या एका नदीच्या प्रवाहाजवळ जाऊन पोंहोंचलों. या प्रवाहांत जवळ जवळ पंधरा वीस भिल्ल हातांनीं एकमेकांस धरून उभे होते. या लोकांस एक पैसा दिला म्हणजे ते यात्रेकरूंस अलीकडील कांठावरून पलीकडे नेऊन पोंचवितात. वास्तविक पाहतां जेथें ते भिल्ल उभे होते तेथें पाणी कांहीं फारसें खोल नव्हतें. जेमतेम गुडघ्या इतकें असेल नसेल एवढेंच. सकृद्दर्शनीं इतक्या सखल प्रवाहांतून नेण्याबद्दल लोक पैसे कां देतात याचें आम्हांस फार आश्चर्य वाटलें. परंतु आमच्या समक्षच जेव्हां तेथें पुढीलप्रमाणें एक गोष्ट घडून आली तेव्हां पैसे देऊन कां जावें लागतें याचा आम्हांस बरोबर उलगडा झाला. तो प्रकार असाः—एक सशक्त बैरागी पैसा देण्याचें नाकारून पाण्यांत उतरला. तोंच तो प्रवाहाच्या वेगातिशयामुळें प्रवाहांत सांपडून वाहात जाऊं लागला. तितक्यांत त्या भिल्लांनीं त्वरा करून त्यास वर काढिलें म्हणून बरें झालें. नाहींतर बिचाऱ्यावर निरर्थक प्राणास मुकण्याचा प्रसंग आला होता.

पुढें वाट चालतां चालतां मार्गांत कप्परघाट या नांवाचा एक उंचच उंच पर्वत ओलांडून जावें लागतें. वाट अतिशय अरुंद असून घसरडी आहे. एका बाजूस अतिशय खोल दरी असून दुसऱ्या बाजूस उंचच उंच असा एक कडा आहे. यामुळें डोंगर चढतांना खालीं किंवा वर पाहिलें असतां पाय घसरून कड्यावरून पडूं कीं काय असें वाटून भीतीनें छातींत धडकीच भरते ! व ही यात्रा आपल्या हांतून आतां पुरी होईल कीं नाहीं याबद्दल शंका वाटूं लागते. पण यावेळीं " मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिम् । यत्कृपा तमहं वन्दे परमानंदमाधवम् " या श्लोकाची आम्हांस आठवण झाली व श्लोकांत वर्णन केलेल्या परमानंद माधवाच्या कृपेवरच सर्व भार टाकून घाट उल्लंघून 'सुखी झाल झरारी ' या नांवाच्या चट्टींत जाऊन आम्हीं उतरलों.

२९. सुखी झाल झरारी.

या चट्टींत सात दिवसांच्या शिधासामुग्रीची तयारी करून घ्यावी लागते. कारण पुढें गंगोत्रीपर्यंत कोठेंही शिधा मिळण्याची सोय नाहीं.

३०. भैरवघाट.

सुखी झाल झरारीहून पुढें जात असतां, भैरवघाट या नांवाचा एक उंच डोंगर चढून जावा लागतो. हा डोंगर कप्परघाटाइतकाच अवघड आहे. चढतांना आतोनात श्रम होतात.

३१. चिंध्याभैरव.

हा घांट कसाबसा ओलांडून गेल्यावर एक देऊळ लागतें. त्यास चिंध्याभैरवाचें देऊळ असें म्हणतात येथें यात्रेकरू आपल्या जवळचा एखादा कपडा अथवा एखादी चिंधी देवाला अर्पण करितात.

३२. गंगोत्रीचें प्रथम दर्शन.

भैरवघाटाच्या माथ्यावरून गंगोत्री दिसूं लागते. हेंच गंगोत्रीचें प्रथम-दर्शन होय.

३३. गंगोत्री.

गंगोत्रीस आचार्य स्वामींचें एक देऊळ आहे. स्वामींचें दर्शन घेऊन नंतर 'बारा सूर्य' या नांवाच्या तीर्थावर स्नान करावें लागतें. बारा सूर्य तीर्थांचें स्नान केल्यानंतर गंगास्नान आटोपून आम्हीं गंगेच्या दर्शनास निघालों. गंगेचें पाणी इतकें थंड असतें कीं स्नान केल्यावर सर्व शरिरास तात्काल बधिरता येते. पाण्यास ओढही पण विलक्षण असते. आमच्या डोळ्यांदेखत एक बाई तोल जाऊन गंगेंत पडली, व हां हां म्हणतां प्रवाहाच्या सपाट्यांत सांपडून पार वाहून गेली. स्नान केल्यानंतर सर्व अंग इतकें गारठून जातें कीं पुरतें वस्त्र नेसतां नेसतां अगदीं पुरेवाट होऊन जाते. म्हणून वस्त्रांतर करतेवेळीं कोरडें वस्त्र अंगासभोंवतीं गुंडाळून कांहीं वेळ स्वस्थ बसावें लागतें. नंतर कांहीं वेळानें अंगांत उष्णता आल्यावर सबंध वस्त्र नेसण्याची शक्ती येते. गंगास्नान करून गंगेच्या देवालयाकडे जातांना वाटेंत "भगीरथशिला" या नांवाचा एक मोठा पाषाण दृष्टीस पडतो. या पाषाणावर भगीरथ राजानें पूर्वीं तपश्चर्या केली होती असें सांगतात. या शिलेवर पिंडदान केल्यानें मृत मनुष्यास मुक्ति मिळते असें वर्णन आहे. या ठिकाणीं तीर्थविधि करितात. तो सर्व आटोपून आम्हीं गंगेच्या दर्शनास गेलों. देवालय लहानसेंच असून त्याच्या शिखरावर सोन्याचा कळस आहे. देवालयांत गेल्यावर गंगादेवीची मूर्ति पाहून मनाला फार आनंद वाटतो. गंगेच्या उजव्या बाजूस जान्हवी आणि सरस्वती यांच्या मूर्तीं आहेत व डाव्या बाजूस भगीरथयमुनेची एक व शंकराचार्यांची एक अशा दोन मूर्तीं आहेत. येथें यात्रेकरू तीन अथवा पांच दिवस मुक्काम करून जातांना गिंड्यांतून गंगोदक भरून घेऊन जातात.

३४. पुन्हां भट्यारी.

वर सांगितल्याप्रमाणें सर्व यथाविधि आटोपून आम्हीं परत येण्यास निघालों. गेलेल्याच मार्गानें पुन्हां भटयारीपर्यंत परत यावें लागतें. या ठिकाणीं श्रीनगरच्या राजानें गंगेवर कर बसविला आहे.

३५. कठोरास जातांना.

भटयारीहून पुढें बदरीकेदारास जाण्याला रस्ता आहे. गंगोत्रीस किंवा केदारास जातांना वाटेंत गंगा व जान्हवी यांचा संगम लागतो. या ठिकाणीं लाल सांगा या नांवाचा एक झुलता पूल आहे. या पुलाची लांबी सुमारें दीड एक मैल आहे. हा पूल लोखंडी तारांचा केलेला असून त्यास इतर पुलांप्रमाणें चालत जाण्यास खालीं फळ्यांची व्यवस्था केलेली नाहीं. शिडीच्या पायऱ्याप्रमाणें लोखंडी रूळाचे तुकडे दीड दीड फुटाचे अंतरावर बसविलेले आहेत. या पुलाखालून बऱ्याच खोल दरींतून गंगा अतिशय वेगानें वाहात असते. पुलावरून जातांना दोन्ही बाजूच्य कठडयांना घट्ट धरून खालीं न पाहतां फार सावधगिरीनें जावें लागतें. खालीं पाहिलें म्हणजे दरीच्या खोलीमुळें, व पाण्याच्या वेगातिशयामुळें, मस्तक फिरूं लागतें. याकरितां वर पाहून व कठडे घट्ट धरून एक एक पाऊल मोठ्या सावधगिरीनें पुढें टाकावें लागतें. आम्हीं परत येतांना या पुलावरून पलीकडे जाण्याकरितां जेव्हां आलों तेव्हां हा पूल नादुरुस्त झाला होता, म्हणून पुलाच्या अलीकडे यात्रा तुंबून राहिली होती. या वेळीं एक तात्पुरता दोरांचा पूल तयार केला होता. परंतु या पुलास फारसें वजन सहन होण्यासारखें नसल्यामुळें एका वेळीं फक्त दोनच माणसें सोडीत असत. आम्हीं त्या दिवशीं या पुलावरून जाण्याकरितां फार खटपट केली. पण व्यर्थ! आम्हांस तेथेंच थांबावें लागलें. दुसऱ्या दिवशीं सकाळपासूनच एकसारखा मुसळधार पाऊस सुरू होऊन सायंकाळपर्यंत सारखा झोडपत राहिला. त्यामुळें तर आमची फारच तारांबळ उडून अतीशय त्रास झाला. सर्व अंग अगदीं गारठून गेलें. नंतर तिसरे दिवशीं कोठें आम्हांस जावयास जागा मिळाली. आमच्या मंडळीपैकीं एका बाईस तर या पुलावरून जाण्याची इतकी भीति वाटली कीं, सरतेशेवटीं तिचे डोळे बांधून तिला जबरदस्तीनें पलीकडे घेऊन जावें लागलें. भटयारीहून श्रीबदरीकेदारास जाण्याला रस्ता आहे. भटयारीस आम्हीं एक दिवस विश्रांति घेऊन नंतर श्रीबदरीकेदारास जावयास निघालों.

३६. कठोर.

भटयारीहून निघून आम्हीं थेट कठोर या नांवाच्या गांवीं येऊन पोहोंचलों. तेथें एक रात्र राहून दुसरे दिवशीं बुढ्याकेदरास गेलों.

३७. बुढ्ढाकेदार.

या ठिकाणीं बुढ्याकेदाराचें देऊळ आहे. देवळांत एका भव्य शिळेवर पांच पांडव व द्रौपदी यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

३८. ग्रामाभिल्लीण.

येथून पुढें आम्हीं " ग्रामभिल्लीण " या नांवाच्या एका लहानशा गांवीं मुक्काम केला. या गांवाला जातांना वाटेंत एक अरण्य लागतें. या अरण्याबद्दल असें सांगतात कीं, एकदां शंकर व पार्वती पण लावून सोंगट्या खेळत बसलीं असतां पार्वतीनें शंकरांचें सर्वस्व हिरावून घेतल्यामुळें शंकरांस राग येऊन ते या अरण्यांत येऊन राहिले. त्यांस वश करून, घेण्याकरितां पार्वती भिल्लिणीच्या वेषानें येथें आली होती, म्हणून या अरण्याजवळ असलेल्या गांवास ग्रामभिल्लीण असें नांव पडलें आहे.

३९. पोळ्याची दांडी.

येथून नंतर आम्हीं मार्ग आक्रमण करीत असतां पोळ्याची दांडी या नांवाचा एक उंचच उंच व दुर्गम पर्वत लागला. हा पर्वत सदोदित बर्फाच्छादित असतो. हा पर्वत मोठ्या कष्टानें ओलांडून आम्हीं त्रिजोगी नारायणांस जाऊन पोचलों.

४०. त्रिजोगीनारायण.

येथें नारायणाची एक मूर्ति असून त्या मूर्तीच्या बेंबींतून गंगेचे पाझर निघत असलेले दृष्टीस पडतात. या ठिकाणीं एक अग्निकुंड आहे. त्यांत श्रीशंकर व पार्वती यांच्या विवाहाच्या वेळीं लाजाहोम झाला होता असें म्हणतात. या कुंडांत अग्नि नेहमीं प्रदीप्त असतो. यात्रेकरूही कुंडांत

एक एक लांकूड टाकतात. हा अग्नि फार पुरातन काळचा म्हणजे तीन युगांपूर्वींचा आहे, म्हणून या ठिकाणास त्रियुगी (त्रिजोगी) नारायण अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. या ठिकाणीं तीर्थांचीं पांच कुंडें आहेत. त्यांपैकीं तीन कुंडांतील पाण्यानें स्नान करून चौथ्या कुंडांवर दान व पांचव्यावर तर्पण आणि पिंडदान वगैरे करावें लागतें. याठिकाणीं यथासांग सर्व विधि आटोपून पंड्याच्या हातावर आपल्या शक्तीप्रमाणें दक्षिणा ठेवून त्याचे तोंडून " यात्रा सफळ झाली " असें ऐकून आम्हीं पुढें चालूं लागलों. त्रिजोगीनारायणमधील होमकुंडांतील भस्म भूतबाधा वगैरेचा नाश करितें या भावनेनें यात्रेकरू तें बरोबर नेतात. आम्हींही तें आपल्याबरोबर घेतलें.

४१. मुरकुंड्या गणपती.

त्रिजोगीनारायण सोडल्यानंतर आम्हीं मुरकुंडया गणपतीस जाऊन पोंचलों. मुरकुंडया गणपती असें नांव पडण्याचें कारण असें कीं, या गणपतीस उत्तमांग नसून फक्त धडच तेवढें आहे. या धडास चार हात आहेत. याबद्दल केदारखंडांत कथा आहे. ती अशीः—पूर्वीं भारतीय युद्धसमाप्तीनंतर गोत्रजहत्येच्या पातकाचें क्षालन व्हावें म्हणून भीमार्जुनांची जोडी शंकराचें दर्शन घेण्याकरितां गेली. त्यावेळीं त्यांना येतांना पाहून शंकराच्या मनांत त्यांस दर्शन देण्याचें नसल्यामुळें शंकरांनीं तेथून यःपलाय कर करण्यास सुरवात केली. तें पाहून शंकरांनीं आपल्यास दर्शन द्यावें या इच्छेनें भीमार्जुन शंकराच्या पाठीमागून पळूं लागले. तेंव्हां पुढें शंकर व मागें भीमार्जुन असा पाठलाग सुरू झाला. या वेळीं आदिमाया पार्वती गजाननास द्वारपालाचें काम सांगून आपण स्नान करीत होती. आज्ञेप्रमाणें गणपती पहारा करीत असतां शंकर पळत पळत येऊन जेथें गणपती पहारा करीत बसला होता तेथून आंत जाऊं लागले. परंतु आंत कोणासही न सोडण्याविषयीं पार्वतीची सक्त ताकीद असल्यामुळें, गणपतीनें त्यांस प्रतिबंध केला. तेव्हां शंकरास कोप येऊन त्यांनीं त्याचें शीर उडविलें.

४२. गौरीकुंड.

मुरकुंड्या गणपतीहून पुढें आम्हीं ' गौरीकुंड ' या नांवाच्या तीर्थाजवळ गेलों. या ठिकाणीं एक उष्ण पाण्याचें व एक थंड पाण्याचें अशीं दोन कुंडें आहेत. उष्ण पाण्याच्या कुंडाबद्दल अशी कथा सांगतात कीं, शंकरांचा पाठलाग करीत असतां भीम व अर्जुन पार्वती जेथें थंड पाण्यानें स्नान करीत होती तेंथें गेले, व शंकर कोठें लपून बसले आहेत असें तिला विचारूं लागले. तेव्हां पार्वतीनें त्यांस शेजारच्या डोंगरांत लपले आहेत असें सांगितलें. या माहितीबद्दल उपकार वाटून पार्वतीकरितां जमिनींत एक बाण मारून अर्जुनानें एक उष्ण पाण्याचें कुंड निर्माण केलें. तेंच हें उष्णोदककुंड होय. या ठिकाणीं श्रीशंकराचें एक स्वयंभू लिंग आहे.

४३. गौरीकुंडाहून पुढें.

येथून पुढें आम्हीं वाट चालत असतां आम्हांस एक गुहा लागली. त्या गुहेमध्यें काय असावें हें पाहण्याची जिज्ञासा होऊन आम्हीं त्या गुहेजवळ जाऊन पाहूं लागलों तों गुहेच्या प्रवेशद्वारावर लहान लहान वेलीं अशा तऱ्हेनें वाढलेल्या दिसल्या कीं जणूं काय एकाद्या कुशल चित्रकारानें आपलें कौशल्यसर्वस्व खर्च करून निसर्गापेक्षां आपण श्रेष्ठ आहों हें दर्शविण्याकरितां नानातऱ्हेच्या वेलींचें एकत्र गुंफन करून एक मनोमय चिकाचा पडदा तयार केला आहे, असें आम्हांस वाटलें. या प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर चांगली पांच सहा मंडळी व्यवस्थित रीतीनें बसूं शकतील येवढी प्रशस्त जागा आम्हांस दिसली. परंतु तेथें आम्हांस कोणीही दिसलें नाहीं. पण आश्चर्य हें कीं, ती जागा कोणीतरी व्यवस्थित रीतीनें मुद्दाम साफसूफ केली आहे असें दिसत होतें. असो. आम्हीं येथेंच कांहीं वेळ विश्रांति घेऊन नंतर पुढील मुक्काम गांठण्याकरितां हळूंहळूं वाट चालूं लागलों. जातां जातां वाटेंत आम्हांस पूर्वींप्रमाणेंच पुन्हां एक गुंफा लागली. हीसुद्धां पूर्वींप्रमाणेंच रिकामी असेल असें वाटून ती पाहण्याच्या उद्देशानें आम्हीं तिच्या तोंडाजवळ जाऊन आंत पाहूं लागलों, तों एक बैरागी आसनस्थ होऊन ध्यानामध्यें निमग्न झाला

आहे असें आम्हांस दिसलें. हिमालयांतील गुहांमध्यें कोठें कोठें ध्यानस्थ बसलेले पुरातन काळचे ऋषी लोक अद्यापिही दृष्टीस पडतात असें पूर्वीं एकदां आमच्या कानीं आल्यामुळें. त्यापैकींच हा कोणीतरी एक महान् ऋषी असावा असें आम्हांस वाटलें, व त्यानें आमच्याबरोबर कांहीं चार शब्द बोलून आम्हांस धन्य करावें या इच्छेनें आम्हीं त्यास कोणत्याही प्रकारचें त्रास न होईल अशा बेतानें आंत जाऊन एके ठिकाणीं व्यवस्थित रितीनें बसलों. कांहीं वेळ गेल्यानंतर आम्हीं साहजिक रीत्या त्या ऋषीचें निरीक्षण करूं लागलों असतां त्याची शरीरयष्टि फारशी कांहीं जर्जरीत झालेली आम्हांस दिसली नाहीं. परंतु थोडे अधीक बारकाईनें पाहिल्यावर त्याच्या पापणीचें केंस मात्र शुभ्र झाले असल्याचें आम्हांस दिसलें. परंतु यावरून तो ऋषी किती पुरातन काळचा असावा याचें आम्हांस अनुमान काढता आलें नाहीं. तो आतां डोळे उघडील मग उघडील व चार शब्द बोलून आम्हांस धन्य करील या आशेनें आम्हीं पुष्कळ वेळ वाट पाहिली. पण व्यर्थ ! मेरुपर्वतासारखा स्थिर राहून ध्यानांत निमग्न असलेला तो ऋषी आमच्यासारख्या पापी लोकांकरितां आपलें ब्रह्मानंदसुख टाकून आपले डोळे थोडेच उघडणार होता ! आम्हांस मात्र दिवसाउजेडीं पुढील प्रवास गांठला पाहिजे याविषयीं मनाला हुरहुर लागल्यामुळें मोठ्या निराशेनें त्या पुण्यमय गुहेंतून बाहेर पडावें लागलें. असो.

४४. भीमगोडा.

येथून पुढें भीमगोड्यास जातांना अतीशय थंड अशी हवा लागते व बर्फही पडतें. वाट अतीशय बिकट असून इतकी अरुंद आहे कीं, त्या रस्त्यानें एकदम दोन माणसें जाण्याची मारामार पडते. या सर्व प्रवासांत परस्परविरुद्ध बाजूनें प्रवास करणारी मंडळी एकत्र भेटली असतां पहिल्यांनीं " गंगामाता की जय " असा घोष केल्यावर दुसरे " बद्री विसाल कीं जय " असें म्हणतात. पुन्हां पहिल्यांनीं " केदार नाथ कीं जय " अशी गर्जना केल्यावर दुसरे " साधू संतन कीं जय " असें म्हणून दोघेही आपापल्या मार्गानें जातात.

आम्हीं डोंगर चढण्यास सकाळींच प्रारंभ केला. त्यावेळेस थंडी म्हणजे मी म्हणत होती ! ठिकठिकाणीं बर्फही सपाटून पडलें होतें. चढतांना तर इतकी थंडी वाजत होती कीं बरोबर आणिलेल्या घाबळ्या आम्हीं यावेळीं अंगास अगदीं लपेटून घेतल्या. हातांत काठी धरल्याशिवाय चालतांच येणें शक्य नसल्यामुळें, मोठ्या मुष्किलीनें एक हात तेवढा उघडा ठेविला होता. याप्रमाणें आम्हीं सुमारें एक फर्लांगभर वर चढून जातों न जातों तोंच चढण्याच्या श्रमानें उष्णता वाढून अंगांतून एकसारख्या घामाच्या धारा वाहूं लागल्या. पूर्वीं लपेटून घेतलेलें पांघरूण यावेळीं काढून टाकून द्यावें असें वाटूं लागलें. व त्याप्रमाणें लागलींच आम्हीं केलेंही. पुढें तर ती उष्णता इतकी वाढत चालली कीं, तेथें पडलेलें बर्फ काठीनें फोडून खाण्यास आम्हीं सुरवात केली. अशा वेळीं आम्हांस मेव्याप्रमाणें बर्फ खातांना पाहून इकडील मंडळीस खरोखर फार आश्चर्य वाटलें असतें.

सपाट जागेवर थोडासा जरी प्रवास करावयाचा असला तरी सुद्धां थोडें फार ओझें घेऊन संवय नसलेल्यांना थोडेसें ओझेंही जड वाटूं लागतें. मग आम्हीं तर येथें अत्यंत अवघड असा डोंगर चढत होतों. चढतांना अतीशय उष्मा होत असल्यामुळें, अंगावरून काढिलेल्या घाबळ्यासुद्धां आतां आम्हास जड वाटूं लागल्या. तेव्हां आमच्याबरोबर आमचें ओझें वाहून नेणाऱ्या पहाडी लोकांजवळ त्या आम्हीं देऊन पुढील मार्ग आक्रमूं लागलों. निघतांना जेवढें ओझें द्यावें तेवढेंच ओझें पुढील मुक्कामापर्यंत न्यावयाचें, मध्यंतरीं अधीक ओझें घ्यावयाचें नाहीं असा त्या पहाडी लोकांचा करार असतो. तरी पण आम्हीं त्यांस प्रेमानें वागवीत असल्यामुळें मध्यंतरीं त्यांचेजवळ कांहीं कमी अधीक ओझें आम्हीं दिलें तर ते केव्हांही कुरकुर करीत नसत. आमच्या मंडळींत सुमारें साठ एक वर्षांची म्हातारी होती. तिचा स्वभाव बराच तिरसट असल्यामुळें तिचा व ओझें नेणाऱ्या भिल्लांचा वारंवार खटका उडत असे. ती गम्मत वाचकाकरितां येथें देणें गैरवाजवी होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामास जातेवेळीं वाटेंत विश्रांति घेण्याकरितां म्हणून आम्हीं केव्हां केव्हां थोडा वेळ बसत असूं. त्यावेळीं कांहीं तरी खाऊन

पाणी द्यावें म्हणून बरोबर आणिलेल्या सामानांतून लाडू काढून आम्हीं खावयास बसलों म्हणजे त्यांतील थोडासा लाडवाचाचूर आम्हीं त्या पहाड्यांच्या हातावर ठेवीत असूं. आमच्याप्रमाणें ते पहाडी लोक त्या म्हतारीकडेही मागावयास जात. बाईचा स्वभाव स्वभातःच म्हणा किंवा म्हातारपण होऊं लागलें होतें म्हणून म्हणा, थोडासा तिरसट बनला होता. ते बिचारे ओझेवाले आपणांस कांहीं तरी खावयास मिळेल या आशेनें त्या बाईजवळ गेले कीं तिनें संतापून म्हणावें "मेल्यानों, तुमच्या डोंबलावर इतके रुपये ओतले तरी पुन्हां माझ्याजवळ खावयास मागतां याची तुम्हांस लाज नाहीं वाटत ?" याप्रमाणें तिनें त्यांना धुडकावून लाविलें म्हणजे बिचारे मुकाट्यानें आपल्या जागीं जात. परंतु याचा वचपा मात्र काढल्याखेरीज ते सहसा राहत नसत. जातांना वाटेंत तिच्या सामानाची ते आदळआपट करून तिचें थोडेसें नुकसानही करीत. आमच्याप्रमाणें तीही आपली घाबळी त्यांचेजवळ द्यावयास जाई. परंतु "वाटेंत अधीक घेण्याचा कांहीं आमचा करार नाहीं" असें म्हणून तिची घाबळी घेण्याचें ते साफ नाकारीत. अशा एक कीं दोन, पुष्कळ प्रकारें आम्हांस तिची गम्मत पाहावयास सांपडे. आमचें ओझें घेतांना पाहून त्या पहाड्यांस ती म्हणे "मेल्यांनो, त्यांनीं तुम्हांला रुपये दिले आहेत, आणि मी काय चिंचोके मोजले आहेत ?" परंतु आपल्याच तिरसट स्वभावामुळें हे लोक आपल्याविरुद्ध जातात हें कांहीं त्या बिचारीच्या कधीं ध्यानांत येत नसे. तिरसट व मत्सरी लोकांचा हाच तर एक विशेष असतो. जरी आपल्या हांतून दुसऱ्यांचा प्रमाद घडला तरी त्यांच्यापासून आपला फायदाच झाला पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते, आणि तसें घडून न आलें म्हणजे त्यांच्यावरच ते एकसारखें चडफडत असतात. अपकार सोसून उपकार न करणारेच मूर्ख, दुसरें काय ? असो.

४५. बद्रिकेदार.

याप्रमाणें प्रवास करून आम्हीं बद्रिकेदारास जाऊन पोंचलों. तेथें गेल्यावर प्रथम देवालयांत जाऊन बद्रिकेदाराचें धूळदर्शन घेतलें व नंतर तेथील मंदाकिनीक्षीर नांवाच्या संगमावर आम्हीं स्नानाकरितां

गेलों. नदीचें पाणी शुभ्र असून त्यास अतीशय ओढ आहे. गंगोत्रींतील गंगेच्या पाण्याप्रमाणें मंदाकिनीचें पाणी अतीशय गार असून त्यास ओढही पण विलक्षण आहे. पाण्यांतून स्नान करून आलें म्हणजे सर्वांग अतिशय गारठून जातें. व वस्त्रांतर करण्याचीसुद्धां मारामार पडते. तेथील पंडये लोक शेगडया पेटवून कांठावर बसलेले असतात. सशक्त लोकांना पाण्यांतून स्नान करून वर आल्यावर कोरडें वस्त्र अंगाभोंवतीं गुंडाळून थोडा वेळ बसलें म्हणजे अंगांत उष्णता येऊन वस्त्र नेसण्याची शक्ति तरी येते. पण साधारण अशक्त व नाजूक प्रकृतीच्या मनुष्यास स्नान झाल्यावर तेथें असलेल्या शेगडयांवर चांगलें शेकावें लागतें. पांच दहा मिनिटें अशा रीतीनें शेकल्यावर मग कोठें त्यांच्या अंगांतील बधिरता थोडी थोडी नाहींशी होऊं लागते ! येथील स्नान फार पुण्यकारक असून प्राचीनकाळीं येथें स्नान करून वर आलेल्यावर आकाशांतून पुष्पवृष्टि होत असे असें म्हणतात. स्नान आटोपल्यावर आम्हीं बद्रिकेदाराचें दर्शन घ्यावयास गेलों बद्रिकेदारास सोन्याचें बिल्वदळ व शुभ्रवस्त्र वाहून मेव्याचा नैवेद्य दाखवावा लागतो. पूजेस लागणाऱ्या तीन्ही वस्तू येथें मिळत नसल्यामुळें, त्या हरिद्वाराहून निघतेळींच बरोबर घ्याव्या लागतात. पूजा झाल्यावर मूर्तीस आलिंगन देण्याचा येथील रिवाज आहे. बद्रिकेदार असें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, भारतीय युद्धसमाप्तीनंतर गोत्रजांच्या वधाचें पातक नाहींसें व्हावें म्हणून अर्जुन व भीम हे दोघे श्रीकृष्णाकडे गेले व त्यास आपली इच्छा कळवून उपाय सांगण्याबद्दल प्रार्थना केली. भगवद्भक्त गोपालकृष्णांनीं तुम्हीं शंकराच्या चरणांचें पूजन करा म्हणजे तुमचें सर्व पातक नाहींसें होईल असें सांगितल्यावरून ते दोघे हिमालयाकडे जावयास निघाले. शंकरांस हें वर्तमान समजतांच त्यांनीं लपून बसण्याची क्लृप्ति केली. परंतु पार्वतीनें सांगितल्यावरून भीम व अर्जुन यांनीं त्यांस कसें शोधून काढिलें हें वर्णन मागें आलेंच आहे. भीम व अर्जुन आपल्यास आतां सोडीत नाहींत असें पाहिल्यावर त्यांना फसवून आपला कार्यभाग साधावा या उद्देशानें शंकरांनीं स्वतः एका रेड्याचें रूप घेऊन आपल्या मायेनें आणखी कित्येक रेडे उत्पन्न केले. अशा वेळीं खरा शंकर कोणता हें समजण्याची भीमार्जुनांस मोठी पंचाईत पडली. त्यावेळीं

त्यांनीं पुन्हां श्रीकृष्णाचा धांवा केला. तेव्हां श्रीकृष्णांनीं दृष्टांत देऊन त्यांस सांगितलें कीं, रेड्यांचा नाश करण्यासाठीं भीमानें आपली गदा वर उचलावी म्हणजे सर्व मायावी रेडे नाहींसे होऊन साक्षात् शंकरांचें दर्शन होईल. भीमानें त्याप्रमाणें केल्यावर सर्व रेडे गुप्त होऊन रेड्याच्या रूपानें असलेले शंकर मात्र तेथें राहिले. परंतु शंकरांनीं आपलें शिर व चारी खूर जमिनींत रोवून टाकिले व दृष्टांत देऊन अर्जुनास सांगितलें कीं " तुम्हीं केलेलें गोत्रजहत्येचें पातक एकेठिकाणीं माझें पूजन करून नाहींसें होणार नाहीं. तर तुम्हीं येथें माझ्या चार पायांची व मधल्या शरीराची पूजा करून नेपाळांत मी पंचमुखानें आहे तेथें जाऊन माझी पूजा केल्यावर तुम्हीं आपल्या पातकापासून मुक्त व्हाल. " येणेंप्रमाणें दृष्टांत झाल्यावर मागील पायांचें गोपेश्वरलिंग झालें, पुढील पायांचें तुंगनाथलिंग झालें व मधील धडाचें बद्रिकेदार असें नांव पडून शिरास नेपाळामध्यें पशुपति असें नांव पडलें. भीमार्जुनांनीं येथील तिन्ही लिंगांची पूजा केली व नेपाळास जाऊन पशुपतीचें पूजन केल्यावर ते आपापल्या पातकापासून मुक्त झाले असें पुराणांत वर्णिलें आहे.

सकाळीं बालार्काचीं कोंवळीं कोंवळीं किरणें येथील पर्वतमाथ्यावर पडून रुप्याचा मुलामा दिल्याप्रमाणें पर्वत चकाकूं लागतो. त्यावेळची त्या पर्वताची ती अपूर्व शोभा पाहून मनाला फार आनंद होतो आणि असें वाटतें कीं आपलें सर्व आयुष्य येथेंच घालवावें, येथून दुसरीकडे कोठेंही जाऊं नये. याच पर्वतावर हिऱ्याप्रमाणें चकाकणारे दगडही सांपडतात. हा पर्वत येवढा उंच आहे कीं याच्या माथ्यावर उभें राहिलें म्हणजे एक पुरुष दीड पुरुष उंचीची काठी हातांत घेऊन ती आपण सूर्यास सहज लावूं शकूं असें वाटतें. या पर्वतावरून एक लहानशी वाट गेलेली दिसते. या वाटेस 'महापंथाची वाट' असें म्हणतात. या वाटेनें जातांना इतकी थंडी वाजते कीं, आणखी पुढें जाऊन जिवंत परत येणें शक्य नाहीं. म्हणून या वाटेनें तेथील पंडये लोक कोणासही जाऊं देत नाहींत. येथेंच रेतउदक व उदरतीर्थ या नांवाचीं दोन कुंडें आहेत. रेतउदक कुंडांत एक मोठा चमत्कार पाहण्यासारखा आहे. रेतउदक कुंड फारसें कांहीं मोठें नाहीं. त्याची लांबी सुमारें एक हातभर असून रुंदीही पण तेवढीच आहे.

त्याचप्रमाणें त्याची खोलीही पण हात दीड हातच आहे. या कुंडावर एक वीत दीड वीत अंतरावर शिवाची एक मूर्ति आहे. तिच्याकडे तोंड करून कुंडाच्या अलीकडील कांठावर बसून " शंभो हरहर " असा घोष केला म्हणजे त्या कुंडांतील शांत पाण्यावर आंतून बुडबुडे येऊं लागतात. बुड-बुडे येऊं लागले म्हणजे शिवाचें दर्शन झालें असें समजतात.

४६. नारायणकोटी.

येथें सात दिवस या कुंडाचें नुसतें पाणी पिऊन उपवास केल्यानें शिव-साक्षात्कार होतो असें म्हणतात. परंतु उपवासाची मर्यादा कोणाच्याही हातून पुरी केली जात नाहीं. म्हणून कोणी एक दिवस तर कोणी दोन दिवस, फार झालें तर तीन दिवस उपवास करून खालीं दुसऱ्या मुक्का-मास म्हणजे गौरीकुंडास जाऊन तेथें पारणें फेडतात. एणेंप्रमाणें आम्हीं पारणें सोडल्यावर नारायणकोटीचें दर्शन घेऊन गुप्तकाशीस गेलों.

४७. गुप्तकाशी.

येथें काशीकुंडांत नारळ पोखरून त्यांत द्रव्य घालून तो सोडून द्याव-याचा असतो. यास गुप्तदान असें म्हणतात. येथें आम्हीं एक दिवस मुक्काम करून पिंपळचट्टीस गेलों.

४८. पिंपळचट्टी.

येथेंही एकच दिवस मुक्काम करून पुढें आम्हीं गरुडगंगेस गेलों.

४९. गरुडगंगा.

येथें गंगेच्या काठांवर एक पुरुष उंचीची गरुडाची मूर्ति आहे. या गरुडमूर्तीच्या दृष्टिपथांत असलेल्या गंगेच्या टांपूत बुचकळी मारून पाठीमागें न पाहतां जे दगड उचलून घ्यावे ते दगड सर्प चावल्या ठिकाणीं उगाळून लाविल्यास विषताबडतोब उतरतें. आपण हरिद्वारांतून निघते वेळीं जी कांठी " गरुड " हे नांव देऊन प्रवासांत बरोबर घेतों, त्या काठीस येथें गंगेंत स्नान घालावें लागतें. नंतर गरुडाची पूजा करून गरुडास व कांठीस १। शेर शिरणीचा नैवेद्य दाखवावा लागतो. असें केलें म्हणजे पुढील सर्व चढउतारांचा प्रवास थकवा न येतां सुख-रूपपणें पार पडतो.

५०. गणेशगंगा.

येथून पुढें आम्हीं गणेशगंगेस गेलों. तेथें स्नान करून पुढील मुक्काम उखीमठ येथें केला.

५१. उखीमठ.

येथें उखेचें पूजन करून त्या दिवशीं आम्हीं तेथेंच विश्रांति घेतली. "उखीमठ" असें या स्थानास नांव पडण्याचें कारण असें कीं, एकदां बाणासुर व त्याची पत्नि सोंगट्या खेळत होतीं. त्यांना उषा या नांवाची एक कन्या होती. आपणही आपल्या आईप्रमाणें पतीबरोबर केव्हां सोंगट्या खेळूं अशी तिच्या मनांत उत्कट इच्छा उत्पन्न होऊन आपल्याला अनुरूप पती मिळावा या हेतूनें शंकराची आराधाना करण्याकरितां ती येथें आली व तपश्चर्या करूं लागली. कांहीं काळानें शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं तिला वर देऊन सांगितलें कीं, "मुली, स्वप्नांत ज्या पुरुषाला तूं पाहशील तोच तुझा पती होईल." वराप्रमाणें श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध हा तिच्या स्वप्नामध्यें आला, व नंतर त्या दोघांचें मोठ्या थाटानें लग्न झालें. असो. या ठिकाणीं उखेनें पतिप्राप्तीकरितां शंकराची आराधना केली म्हणून तिची मूर्ति येथें आहे, व या मूर्तीसही तिचेंच नांव दिलेलें आहे.

५२. तुंगनाथ.

पुढें आम्हीं तुंगनाथास जाण्याकरितां निघालों. जातांना वाटेंत सहा कोस उंचीचा पर्वत ओलांडावा लागतो. हा सर्व चढउतार संपल्यानंतर आम्हीं तुंगनाथास जाऊन पोंचलों. या ठिकाणीं शिवाचें एक स्वयंभू लिंग आहे. येथें आकाशगंगा या नांवाची एक नदी आहे. तींत स्नान करून आम्हीं लिंगाचें पूजन केलें, व पुढील मुक्काम बराच दूर असल्यामुळें, त्या दिवशीं पुढें न जातां तुंगनाथाच्या पायथ्याशीं असलेल्या चट्टींत जाऊन उतरलों.

५३. गोपेश्वर.

दुसरे दिवशीं गोपेश्वरास जाऊन गोपेश्वराचें पूजन करून दर्शन घेतलें.

५४. अलकनंदा.

पुढें वाटेंत अलकनंदा या नांवाची एक नदी लागते. तिचें स्नान करून पुढील मुक्काम आम्हीं सांग्याच्या चट्टींत केला. तेथून पुढें क्षेत्रपाल-चट्टी व नंतर हणमंतगंगा स्नान झाल्यावर आम्हीं, कुमारचट्टीस गेलों. येथें एक दिवस मुक्काम करून नंतर जोशीमठास गेलों.

५५. जोशीमठ.

जोशींमठ येथें नृसिंहाची एक मूर्ति आहे. ती काळ्या पाषाणाची असून स्वयंभू आहे. येथेंही एक दिवस मुक्काम करून आम्हीं विष्णु-प्रयागास गेलों.

५६. विष्णुप्रयाग.

येथें गंगा, मंदाकिनी व अलकनंदा या तीन नद्यांचा संगम झाला आहे. या तिन्ही नद्या एकमेकींच्या समोरून येत असल्यामुळें व त्याचें प्रवाह फार वेगवान् असल्यामुळें, जेथें या तीन नद्या एकत्र मिळतात तेथें एकमेकींची जोराची टक्कर होऊन घराएवढ्या उंचीची एक लाट उत्पन्न होऊन ती दुसऱ्या बाजूनें वाहात गेली आहे. त्या वेगानें धांव-णाऱ्या तिन्ही नद्यांच्या टक्करीचा आवाज ऐकून कान बधिर होतात व भीतीनें हृदय धडधडूं लागतें. स्नान करतेवेळीं धरून बसण्यासाठीं येथें एक लोखंडी साखळदंड बांधलेला आहे. त्या भयंकर खळखळाटांत आतां आपल्याला स्नान केलें पाहिजे ही कल्पना डोळ्यासमोर उभी राहिली म्हणजे मोठी भीति वाटून नको तें स्नान असें होऊन जातें. परंतु आपण आपल्या देशांतून इतक्या लांबवर येऊन स्नान न करितांच परत गेलों तर लोक आपल्यास काय म्हणतील या अपवादाच्या भीतीस्तव मोठ्या नाइलाजानें त्या साखळदंडास धरून हिंमतीनें स्नान करावें लागतें. इतकें सर्व आटोपल्यावर आम्हीं पंडुकेश्वरास गेलों.

५७. पंडुकेश्वर.

येथें आम्हीं एक दिवस वस्ती केली. पूर्वीं पंडूराजा तपश्चर्येसाठीं येथें आला होता. त्याची येथें एक सोन्याची मूर्ति आहे.

५८. लक्ष्मीनारायण.

पुढें आम्हीं तेथून बारा मैलांवर आलेल्या लक्ष्मीनारायणास गेलों. तेथेंही एक दिवस राहून पुढें वाटेंत सुवर्णरेषा व ऋषिगंगा या नद्यांचीं स्नानें करून कल्याणकोटी या नांवाच्या चट्टीस गेलों.

५९. कल्यणाकोटी.

तेथील डोंगराच्या पायथ्यापासून तों तहत माथ्यापर्यंत सुरूचीं झाडें एका हारीनें लागलेलीं दिसतात. तेथें नानाप्रकारचीं फुलझाडेंही आहेत. तीं पाहून जणूं काय येथें मुद्दाम कोणीं तरी बगीच्याच केलेला आहे असें वाटतें. येथील एकंदर शोभा फारच नयनमनोहर आहे. या ठिकाणीं एक दिवस मुक्काम करून आम्हीं निघालों व बद्रिनारायणास जाऊन पोहोंचलों.

६०. बद्रिनारायण.

बद्रिनारायणाची मूर्ति बसलेली असून तिच्या उजवे बाजूस कुबेर, उद्धव व अक्रूर आणि डावे बाजूस नर, नारायण व नारद यांच्या मूर्ती आहेत. नारायणाच्या मूर्तीस जडजवाहिराचे पुष्कळ दागदागिने आहेत. या मूर्तीचें आम्हीं धूळदर्शन घेतल्यावर तेथेंच असलेल्या उष्ण कुंडावर स्नान करण्याकरितां गेलों. स्नान आटोपल्यावर आम्हीं नारायणाची पूजा करण्याकरितां आंत जाऊं लागलों तों तेथील पंड्यांनीं कोणालाही आंत जाण्याची परवानगी नाहीं असें सांगितलें. म्हणून आम्हीं पूजेचें सर्व साहित्य त्या पंड्यांसच दिलें. पूजेस सोन्याचें तुळसीपत्र व पीतांबर द्यावा लागतो. पूजा झाल्यावर आम्हीं बाहेरून नारायणास नमस्कार करून नंतर पोटपूजेच्या तयारीस लागलों. देवळाचे उजवे बाजूस नारायणाचें स्वयंपाकगृह आहे. त्यास छप्पर वगैरे कांहीं नसून तें उघडें आहे. तेथें चुलवणांत ओलींच लांकडें घालतात. परंतु आश्चर्य हें कीं तीं वाळलेल्या लांकडांप्रमाणें सुरेख जळतात. या स्वयंपाकघरांत कमलादेवीची एक मूर्ति आहे. म्हणून त्यास कमलादेवीचें स्वयंपाकगृह असें म्हणतात. या ठिकाणीं गरुड, झंपा, मारकंड, नारद व ब्रह्मशिला अशा पांच शिला आहेत. त्यांपैकीं ब्रह्मशिला ही सर्व शिलांच्या मधोमध असून तिच्यावर येथील

पंडे भोजन व पिंडदान करतात. या शिलेस ब्रह्मकपाट असें म्हणतात. बद्रिनारायणाच्या मूर्तीस श्रीमत्शंकराचार्यांनीं परिसाची उपमा दिली आहे. त्याचा अर्थ असा कीं ज्याप्रमाणें परिस लाविला असतां लोखंडाचें सोनें बनतें त्याप्रमाणें पापी लोकांना बद्रिनारायणाच्या मूर्तीचें दर्शन झालें म्हणजे त्यांचीं सर्व पापें नाहींशीं होऊन ते पुण्यवान् होतात व जन्म-मरणापासून मुक्त होतात.

येथें ब्रह्मशिलेवर आपल्या मृत आप्तेष्टांना एकदां पिंडदान केल्यावर आपल्या हयातीपर्यंत पुन्हां त्यांच्याकरितां पिंडदान करावें लागत नाहीं. येथून दोन एक मैल उंचीवर चढून गेलें म्हणजे आणखी मैल दीड मैल उंचीवर अलकनंदा या नांवाची एक नदी खालीं धाड धाड उडया घेत असतांना दृष्टीस पडते. ही नदी ज्या ठिकाणीं खालीं पडते तेथून सुमारें दोन चार हात अंतरावर वसुदेव देवकी यांच्या मूर्ती आहेत. पूर्वीं वसुदेव-देवकी आपल्या पोटीं परमेश्वरानें अवतार घ्यावा अशी इच्छा मनांत धरून तपश्चर्या करण्याकरितां येथें आलीं होतीं. पुढें मग त्यांच्या तप-श्चर्येनें संतुष्ट झालेल्या भगवान् विष्णूनें श्रीकृष्ण या अवतारानें त्यांच्या पोटीं अवतार घेतला हें वाचकांस विदित आहेच. असो. वसुदेव देवकी यांच्या मूर्ती तेथें जवळच असल्यामुळें या अलकनंदा नदीस तेथें वसुधारा अशी संज्ञा पडली आहे.

६१. वसुधारा.

वसुधारा जेथें खालीं पडते तेथें जवळ जवळ एक फर्लांग रुंदीचा मोठा डोह झाला आहे. या डोहापासून सुमारें १०।१२ फूट अंतरावर मोठी शिला आहे. तिला धर्मशिला असें म्हणतात. येथें एक चमत्कार दृष्टीस पडतो. तो असा कीं, या शिलेवर वसुधारेकडे तोंड करून हात जोडून तिची प्रार्थना करीत उभें राहिलें म्हणजे पापापेक्षां ज्यांचें पुण्य अधिक असेल अशा लोकांवरच वसुधारेचे जलतुषार येऊन त्यांस स्नान घडतें; इतरांस तिचें स्नान मुळींच घडत नाहीं. याविषयीं आम्हांला तेथें प्रत्यक्ष चमत्कार पाहावयास मिळाला. तीन बायका व दोन पुरुष असे आम्हीं पांचजण व आमच्या बरोबर स्नानास आलेल्या दोन मारवाडी

स्त्रिया असे सातजण स्नानाकारतां त्या धर्मशिळेवर जाऊन उभे राहिलों. सकाळीं नऊ वाजतां जे एकदां आम्हीं तेथें उभे राहिलों होतों ते जवळ जवळ संध्याकाळपर्यंत. परंतु स्नान घडण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. तेव्हां आम्हीं एक अशी तोड काढिली कीं प्रत्येकानें वेगवेगळया वेळीं शिळेवर जाऊन उभें रहावें म्हणजे तरी कोणास स्नान घडतें कीं नाहीं हें समजेल. त्याप्रमाणें आम्हीं केल्यावर आमच्याबरोबर आलेल्या दोन मारवाडी स्त्रियांपैकीं एका स्त्रियेखेरीज आम्हां सर्वांस तात्काल स्नान घडलें. ती बिचारी मात्र तशीच वाट पहात राहिली. परंतु शेवटीं तिला स्नान घडलें नाहीं तें नाहींच. अशाप्रकारें प्रत्यक्ष चमत्कार आजमितीस येथें पहावयास सांपडतो. आमचें स्नान झाल्यावर वसुधारेची पूजा करून आम्हीं परतलों. परत जात असतां आम्हांस डाव्या बाजूस एक गुंफा दिसली. यांतही पूर्वीप्रमाणेंच एक बैरागी ध्यानस्थ बसला होता. वयोमानाच्या दृष्टीनें पाहतां तो पूर्वीच्या ऋषीइतकाच वृद्ध दिसला. त्याचेजवळ त्याचें सामानसुमान वगैरे आम्हांस कांहींच दिसलें नाहीं. तेव्हां आम्हांस त्याचें मोठें आश्चर्य वाटलें, व हा खातो काय पितो काय वगैरेचें आम्हांस मोठें गूढ पडलें. तेथील पंड्यांकडून आम्हांस आणखी असेंही समजलें कीं, जेव्हां येथें बर्फ पडून सर्व प्रदेश पूर्ण बर्फाच्छादित होतो त्यावेळीं सुद्धां हा बैरागी कोठेंही न जातां येथेंच आपल्या गुंफेंत असतो ही हकीकत ऐकून तर आम्हीं अगदीं आश्चर्यमूढच झलों. व अशा प्रकारच्या सत्पुरुषाचें दर्शन आम्हांला महद्भाग्यानेंच लाभलें असें समजून त्या ऋषीस नमस्कार करून आम्हीं स्वस्थानास जाण्याकरितां परतलों.

६२. बद्रिनारायणासंबधीं आणखी कांहीं माहिती.

बद्रिनारायण ज्या पर्वतावर आहे त्या पर्वतावर कार्तिक महिना लागला म्हणजे बर्फ पडण्यास सुरवात होते. कार्तिक संक्रांतीस म्हणजे उत्तरायण लागल्यावर नारायणाचें द्वार बंद करितात. कारण त्यावेळीं तेथें बर्फ पडूं लागून राहण्याची सोय नसते. नारायणाच्या देवळांत एक मोठी दगडी पणती केलेली आहे. त्यास नंदादीप असें म्हणतात. द्वार बंद झाल्या-

पासून सहा महिनेपर्यंत येथें येणें अशक्य असल्यामुळें, नंदादीपांत जातांना तूप एकदांच घालून जावें लागतें, म्हणून त्या नंदादीपांत एकदम एक घागरभर तूप ओतून नारायणाची पूजा करून पंडे लोक खालीं जातात. पुढें सहा महिन्यानंतर म्हणजे दक्षिणायन लागल्यावर वैशाखसंक्रांतीस द्वार उघडल्यावर अक्षतृतीयेपासून यात्रेकरूंस नारायणाचें दर्शन घेण्यास परवानगी मिळते. दार उघडण्याचे वेळीं सर्व डोंगरावर बर्फ पडलेला असतो. नारायणाचें देऊळसुद्धां सर्व बर्फाच्छादित होऊन गेलेलें असतें. वाटेंतील बर्फ कुदळीनें खणून मार्ग मोकळा करावा लागतो. नारायणाचें देऊळ अशा तऱ्हेनें बर्फापासून मोकळें केल्यावर बाहेरूनच नारायणाची पूजा करून नंतर मोठ्या भक्तीनें व समारंभानें द्वार उघडतात. द्वार उघडतांक्षणींच या पापी कलियुगांत पाहण्यास दुर्मिळ असा एक मोठा चमत्कार दृष्टीस पडतो. नंदादीप पूर्वीसारखाच ढणढणीत जळत असून नारायणाची पूजा ताज्या उपकरणांनीं केलेली दिसते. गंध कोणी तरी नुकतेंच लाविलें आहे असें दिसतें. बिल्वपत्र, तुळसीपत्र व फुलें तर सर्व ताजींच ! जातांना सहा महिन्यापूर्वी वाहिलेलें सर्व पूजा--साहित्य यावेळेपर्यंत ताजें राहणें केवळ अशक्यच ! मग हा प्रकार कसा झाला असावा याचें गूढ पडतें. बर्फ पडूं लागल्यावर कोणीही जिवंत प्राणी तेथें राहणें शक्य नाहीं. तेव्हां पुराणांतरीं वर्णन केल्याप्रमाणें बर्फ पडल्यावर सहा महिनेपर्यंत सुरवरांची पूजा नारायणास असते हें सत्य मानिल्यावांचून गत्यंतर राहात नाहीं. ज्यांचा असल्या गोष्टींवर बिलकूल विश्वास नाहीं त्यांनीं सुद्धां येथें येऊन प्रत्यक्ष अनुभव घ्यावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

६३. नंदप्रयाग.

बद्रिनारायणाहून निघतेवेळीं आम्हीं तेथील पंड्याकडून सुफळ घेतलें व नंदप्रयागीं गेलों. येथें नंदांनीं तपश्चर्या केली म्हणून यास नंदप्रयाग असें नांव पडलें आहे.

६४. कर्णप्रयाग.

पुढें आम्हीं कर्णप्रयागास गेलों. येथें कर्णाची एक मूर्ति आहे. पूर्वी

पांडवांचा वडील बंधु कर्ण यानें या ठिकाणीं सूर्याची आराधना केली म्हणून या प्रयागास त्याचेंच नांव पडलें आहे. या प्रयागांत स्नान करून आम्हीं रुद्रप्रयागास गेलों.

६५. रुद्रप्रयाग.

येथें एक चट्टी आहे. त्या दिवशीं आम्हीं तेथेंच मुक्काम करून पुढें श्रीनगरास गेलों.

६६ श्रीनगरहून हरिद्वार.

तेथून पुढें सीताकोटी व गोविंदकोटी करून नंतर गंगा व अलकनंदा या दोन नद्यांच्या संगमावर स्नान केलें व नंतर व्यासगंगेवर आलों. व्यासगंगेचें पाणी तांबडें लाल आहे. पुढें विझणघांट ओलांडून मनभंगा व चित्तभंगा या नद्यांचीं स्नानें करून लक्ष्मणझुल्यास मुक्कामास गेलों. वाटेंतील पहाडांत भिल्ल लोकांची वस्ती आहे. येथील पुरुष व स्त्रिया कांबळ्यांचींच वस्त्रें नेसतात व पांघरतात. याठिकाणीं कोणत्याच प्रकारचें धान्य तयार होत नसल्यामुळें व इतर ठिकाणांहूनही धान्य येण्यासारिखें नसल्यामुळें हे भिल्ल लोक राजगिऱ्याच्या व कुट्टूच्या पाल्यावरच आपली उपजीविका करितात. हे लोक फार भक्तिमार्गी आहेत. हृषीकेशाहून नंतर आम्हीं हरिद्वारास परत आलों.

६७. पुन्हां हरिद्वार.

हरिद्वारास परत आल्यावर हरिद्वाराहून निघतेवेळीं बरोबर घेतलेल्या गरुडकाठीस गंगेंत स्नान घालून व तिची पूजा करून तिचें गंगेंत विसर्जन केलें. नंतर यथाशक्ति ब्राह्मणभोजन घालून आम्हीं तो दिवस तेथेंच घालविला. एवढ्या मोठ्या बिकट प्रवासांतून आम्हीं सुखरूपपणें मुक्कामीं परत आलों म्हणून परमेश्वराचें गुणस्तवन करीत आम्हीं झोपीं गेलों.

६८. अयोध्या.

हरिद्वारास तीन दिवस मुक्काम करून आम्हीं अयोध्येस आलों व हनुमानगडांत मुक्काम केला. येथें शरयू या नांवाची एक पुराणप्रसिद्ध

नदी आहे. तिचें स्नान करून आम्हीं राम, दशरथ, कौसल्या, कैकेयी, सुमित्रा, वशिष्ठ व हनुमान यांच्या मूर्ती पाहण्यास गेलों. श्रीरामचंद्र, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ती पाहण्यास तेथील पंड्यांनीं सव्वा रुपाया कर बसविला आहे. या तिन्ही मूर्ती सोन्याच्या आहेत. सर्व मूर्ती पाहून झाल्यावर आम्हीं बिऱ्हाडास परत गेलों. एकंदरींत शहरची रचना उदासवाणी दिसते. येथें माकडें आतोनात आहेत. याठिकाणीं त्रिरात्र मुक्काम करून आम्हीं मथुरेस गेलों.

६९. मथुरा.

मथुरेंत श्रीगोपालकृष्णाचें देऊळ आहे. कृष्णाची मूर्ति फारच नयनमनोहर असून मूर्तीच्या डाव्या व उजव्या बाजूस अष्टनायिका गोपींच्या सुंदर सुंदर मूर्ती आहेत. श्रावण महिन्यांत येथें बहारीचा देखावा पाहण्यास मिळतो. कृष्णाच्या मूर्तीस सुंदर तऱ्हेनें अलंकृत करून झोंपाळ्यावर बसवितात. यावेळीं सर्व देऊळभर नयनमनोहर आरास केलेली असते. गोपगोपी उत्तम उत्तम वस्त्रालंकारांनीं विभूषित होऊन व नानातऱ्हेचीं सोंगें घेऊन कृष्णाच्या मूर्तीपुढें क्रीडा करण्यास येतात. येथें एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं हा उत्सव एकसारखा महिनाभर चालू असतो. त्यावेळीं प्रतिदिवशीं नवीन नवीन असे एक महिनाभर निरनिराळे वस्त्रालंकार वापरण्याची पद्धत आहे. मूर्तीस हिरवे अलंकार व वस्त्रें नेसविलीं तर सर्व देवळाची आरास हिरव्या रंगानेंच परिपूर्ण करावयाची व तेथें क्रीडा करावयास आलेल्या गोपगोपींचे वस्त्रालंकारही त्याच रंगाचे असावयाचे. याप्रमाणें हा उत्सव सारखा एक महिनाभर चालू असतो. त्यावेळची ती रोषणाई, तो थाटमाट, गोपगोपींचीं तीं सुंदर सुंदर व कर्णमधुर गाणीं, त्यांचें तें तालसुरांत चालणारें स्पृहणीय नर्तन, वगैरे गोष्टी पाहून मनास अपरिमित आनंद व उल्हास वाटतो, आणि श्रीकृष्ण गेल्यावर आज हजारों वर्षांनीं देखील जर इतकी नयनमनोहर रोषणाई व मनाल्हादायक गोपगोपींची क्रीडा येथें प्रतिवर्षी पाहावयास सांपडते, तर खुद्द श्रीकृष्णाच्यावेळीं येथें किती आनंद व रमणीयता नांदत असेल याचें चित्र मनामध्यें उभें राहून हृदय आनंदानें उचंबळून येतें !

कृष्णाच्या देवळापुढें सव्वा मण सोन्याची एक पताका लक्ष्मीकांत या नांवाच्या एका श्रीकृष्णभक्तानें उभी केली आहे. तिजबद्दल अशी एक गोष्ट सांगतात कीं, इंग्रज लोकांचा या प्रांतावर अम्मल सुरू झाल्यावर एके दिवशीं एक इंग्रज अधिकारी देऊळ पाहण्यास येथें आला. त्यावेळीं ही सोन्याची पताका त्याच्या नजरेस पडली. त्याबरोबर त्यानें 'ही पताका येथें कोणी उभी केली' असा तेथील लोकांस प्रश्न केला. त्यावेळीं लोकांनीं लक्ष्मीकांताचें नांव सांगितलें. त्याबरोबर लक्ष्मीकांतास बोलावून आणून त्यानें त्यास प्रश्न केला कीं, हें इतकें सोनें तूं कोठून आणिलेंस तें मला सांग. त्यावर लक्ष्मीकांतानें, तें परमेश्वरानें दिलें असें सांगितलें. तें त्या साहेबास निव्वळ खोटें वाटून त्याची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें "तुझ्या परमेश्वराकडून मला आतांच्या आतां दहा हजार रुपये देवीव" असें त्यांस फर्मावलें. त्याबरोबर "चल माझ्याबरोबर" असें म्हणून लक्ष्मीकांतानें त्या साहेबास आपल्याबरोबर नदीकिनाऱ्यावर नेलें, व यमुनेमध्यें बुचकळी मारून दोन्ही हातांत दोन थैल्या धरून त्या साहेबास म्हटलें, "हे ते रुपये." साहेबानें ते रुपये त्याच्या हातांतून घेतले मात्र, तों ताबडतोब त्याचे डोळे जाऊन तो अंध झाला. याप्रमाणें विचित्र अनुभव आल्याबरोबर तो साहेब आपली दृष्टि पुन्हां परत यावी म्हणून गयावया करून लक्ष्मीकांतास म्हणाला, 'तुमची परिक्षा पाहिली ही माझी मोठी चूक झाली. आतां कसेंही करून माझी दृष्टि पुन्हां: परत येईल असें आपण करा. मी आपला फार आभारी होईन.' तें त्याचें दीनवाणें बोलणें ऐकून लक्ष्मी-कांतास त्याची दया येऊन त्यानें त्याची दृष्टी त्यास परत दिली. असा प्रकार घडल्यापासून कोणीही साहेब त्या पताकेविषयीं कांहींही विचारी-नासा झाला. असो. येथें वसुदेव व देवकी यांचीं देवळें आहेत. येथें उग्रसेनाचा एक वाडा आहे. तो मोठा भव्य असून पाहण्यालायक आहे. येथील किल्लाही पाहण्यासारखा आहे. मथुरेची रचना एकंदरींत फार नयनमनोहर आहे.

७०. गोकुळ.

येथून पुढें आम्हीं गोकुळास गेलों. तेथें नंद व यशोदा यांच्या लांकडी भव्य मूर्ती असून त्यांस पुरातन काळचा पेहेराव केलेला आहे. कृष्णाच्या

मूर्तीचें दर्शन घेतांना रांगत जावें लागतें. येथें लहानपणीं कृष्ण रांगला होता म्हणून रांगत जाण्याची चाल पडली आहे. गोकूळ हें एक लहानसें खेडें आहे. येथें दुभत्या गाई पुष्कळ असून दूधदुभतें याची रेलचेल आहे. येथें गोपीचंदनाचा एक डोंगर आहे. यात्रेकरू प्रसाद म्हणून येथील चंदन बरोबर नेतात.

७१. वृंदावन.

गोकुळाहून पुढें आम्हीं वृंदावनास गेलों. तेथें श्रीकृष्णाचें दर्शन घेऊन जेथें श्रीकृष्णानें रासक्रीडा केली होती ती जागा पाहिली. त्या जागेस कुंजवन असें म्हणतात. या ठिकाणीं तीन दिवस मुक्काम केला.

७२. कुरुक्षेत्र.

नंतर दिल्ली व आग्रा येथील इतिहासप्रसिद्ध व सुंदर इमारती पाहून आम्हीं कुरुक्षेत्रास आलों. ज्या ठिकाणीं आमचे महापराक्रमी पूर्वज एकमेकांच्या खांद्याशीं खांदा लावून आपापसांत लढले, व ज्या ठिकाणीं हजारों लोक मशकांप्रमाणें पटापट मृत्युमुखीं पडले, त्या पुराणप्रसिद्ध समरांगणावर आज आपण उभे आहों असें मनांत येतांच मन थोडेसें उदास झालें. या लढाईच्या मैदानावर पांच तीर्थकुंडें आहेत. त्यांस रक्तकुंडें असें म्हणतात. या पांचही तीर्थांत स्नान करून आम्हीं येथें असलेल्या कौरव-पांडवांच्या मूर्तींचें दर्शन घेतलें व तो दिवस तेथेंच घालविला.

७३. पुष्करराज.

नंतर आम्हीं पुष्करराजास आलों. येथें ब्रह्मदेवाचें देऊळ आहे, ब्रह्मदेवाची मूर्ति सुंदर असून कमलासनावर बसली आहे. जगांत दुसरीकडे कोठेंही ब्रह्मदेवाचें देऊळ नाहीं. याचें कारण पुराणांत असें वर्णिलें आहे कीं, पूर्वीं शंकरांनीं एक यज्ञ केला होता. त्यावेळीं पुण्याहवाचनाचे वेळीं पार्वती तेथें नव्हती. त्यावेळीं ब्रह्मदेवानें सांगितलें कीं पार्वती मागाहून आली तरी चालेल. पुढें यज्ञाचें काम चालू झाल्यावर पार्वती तेथें आली. व ब्रह्मदेवाचें कृत्य समजून आल्यावर तिला फार कोप येऊन त्या कोपाच्या भरांत तिनें ब्रह्मदेवास, " आजपासून तुझें जगांत कोठेंही पूजन

होणार नाहीं " असा शाप दिला. परंतु ब्रह्मदेवानें तिची पुष्कळ स्तुति केल्यावर तिनें त्याला पुढीलप्रमाणें उःशाप दिला. " माझें बोलणें कदापिही खोटें होणार नाहीं, म्हणून तुझी जगांत दुसरीकडे कोठेंही पूजा न होतां पुष्करराज येथेंच तेवढी तुझी पूजा होईल. " येथें मोर पुष्कळ आहेत. ते इतके कीं ज्याप्रमाणें आमच्या इकडे मांजरें घरोघर फिरतात त्याप्रमाणें येथें मोर घरोघरीं भटकत असतात. या गांवीं आमचा तीन दिवस मुक्काम होता.

७४. मातृगया.

नंतर आम्हीं शितपुरास मातृगयेस आलों. मातृगयेचें माहात्म्य काय वर्णावें ! अशी एक म्हण आहे कीं, " पित्याचे उपकार फिटती काशी गेल्या, मातेचे उपकार न फिटती कांहीं केल्या. " परंतु या तीर्थाचें स्नान केल्यावर मातेच्या उपकाराचें कांहीं अंशीं परिमार्जन होतें असें म्हणतात. येथें आम्हीं गयेचें स्नान करून नंतर उज्जयनीस गेलों.

७५. उज्जयनी.

येथें महांकाळेश्वराचें आम्हीं दर्शन घेतलें. हें आत्मलिंग आहे असें म्हणतात. यास प्रत्यही चिताभस्माचा लेप असतो. या लिंगाची पूजा फक्त जो दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण असेल त्यानेंच प्रथम करावयाची. इतरांना प्रथम करावयाची मनाई आहे. या दशग्रंथी ब्राह्मणांस सरकारांतून वेतन मिळतें. हें लिंग कमरेइतकें उंच असून भव्य दिसतें. देवळालगतच एक कुंड आहे. त्यांत प्रथम स्नान करून नंतर लिंगाची पूजा करावयाची असा येथील रिवाज आहे. श्रीकृष्णाचे गुरू सांदीपनी यांचें येथें एक देऊळ आहे. क्षिप्रा नदीच्या कांठावर श्रीकृष्ण व सुदामा यांच्या मूर्ती आहेत. त्याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, एकदां गुरुपत्नीनें वनांतून सर्पण आणण्याकरितां श्रीकृष्ण व सुदामा या दोघांस पाठविलें. आज्ञेप्रमाणें वनांत जाऊन सर्पण गोळा करून त्याचे भारे मस्तकावर घेऊन गुरुगृहाकडे जात असतां मस्तकावरील भाऱ्यांच्या ओझ्यानें श्रांत झाल्यामुळें या नदीचे कांठीं भारे खालीं ठेऊन ते दोघे विश्रांति घेण्या-

करितां बसले होते. असो. गयेंत आम्हीं तीन दिवस मुक्काम करून नंतर ओंकारास गेलों.

७६. ओंकार.

येथें नर्मदा वाहते. नर्मदेच्या अलीकडील तीरावर ममलेश्वराचें देऊळ आहे. व पलीकडील तीरावर ओंकारेश्वराचें देऊळ आहे. नावेंतून पैलतीरास गेल्यावर आम्हीं पवित्र नर्मदेचें स्नान करून ओंकारेश्वराची पूजा केली. नंतर अलीकडील तीरावर येऊन आम्हीं गांवांत गेलों. काशी व हरिद्वार या ठिकाणीं ज्याप्रमाणें पंड्ये लोक असतात, त्याप्रमाणें येथेंही आहेत. त्यापैकीं एकाचें घरीं आम्हीं आपला तळ दिला. येथें एक मनोरंजक गोष्ट घडली. ती अशी कीं, ज्यांच्या घरीं आम्हीं उतरलों होतों त्यांचें नांव गोविंदभट असें होतें. गोविंदभटजी, त्यांची पत्नी व सून एवढींच काय तीं तीन माणसें आम्हीं गेल्यावेळीं त्यांच्या घरीं होतीं. गोविंदभटाच्या बायकोस व सुनेस कानानें बरेंच कमी ऐकूं येत असे. दोन बहिरी मंडळी एकत्र भेटली म्हणजे त्यांच्या संभाषणाचा जो कांहीं फार्स होतो तो येथें आम्हांस प्रत्यक्ष पहावयास मिळाला. गोविंदभटजीनीं आम्हांस आपल्या घरीं नेल्यावर आपल्या बायकोस बाहेर बोलावून "यजमान आले आहेत, त्यांची नीट व्यवस्था ठेवा" असें तिला सांगितलें. आपलें व्यंग दुसऱ्याच्या नजरेस पडूं नये असें प्रत्येकास फार वाटत असतें. व त्याप्रमाणें तें दुसऱ्याच्या नजरेस पडूं न देण्याबद्दल तो फार खबरदारीही बाळगत असतो. परंतु जों जों तो आपलें व्यंग लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतो तों तों तें लपून न राहतां अधीकच स्पष्टतऱ्हेनें लोकांच्या नजरेस येऊन चार मंडळींत त्याबद्दल हसें मात्र उत्पन्न होतें. गोविंदभटजींची बायको ही कांहीं या गोष्टीस अपवाद नव्हती. कारण गोविंदभटजींनीं एक सांगितलें असतां तिनें आपल्या सुनेस दुसरेंच सांगितलें नसतें. आणि सूनही पण तितकीच बहिरी असल्यामुळें एकमेकींचें भाषण एकमेकीस न समजतां जो घोंटाळा झाला व जी गम्मत उडाली ती कांहीं मग आम्हांस अनुभवावयास मिळाली नसती. असो. भटजींच्या आज्ञेप्रमाणें सासुबाई सुनबाईकडे जाऊन सांगूं लागल्या, " तुझी बहीण आली आहे म्हणे बहीण,

तिची नीट व्यवस्था ठेवायला तिकडून सांगण झालंय." परंतु सुनबाई पडली स्वभावाची तापट. तिनें खडसून असें उत्तर दिलें कीं यंव. "म्हटलं मीं मनुष्याच्या जन्माला आलें आहे मनुष्याच्या; आणि मीठही पण खात असतें बरं! सोघण्याचीं फडकीं अद्यापर्यंत न धुतां तशींच ठेवण्याइतकी कां मीं मूर्ख आहे? इश्शं! हें काय मेलं. वरचेवर वरचेवर तेंच तेंच काय सांगायचं!" परंतु सासुबाई कसली खमंग! कानामागून आलेल्या सूनबाईस ती कसची दाद देते! ती म्हणते, "अग, ती आपल्या घरीं पाहुणी म्हणून आली आहे ना? आली तशी दोन दिवस राहील आणि मग जाईल. त्यांत एवढें रागावायला कशाला हवं?" दोघींचींहीं रागाचीं व मोठमोठ्यानें चाललेलीं बोलणीं ऐकून आमची व्यवस्था करण्यांत तत्पर असलेले गोविंदभटजी पळतच आंत गेले व बायकोस एकीकडे नेऊन जेव्हां तिला परिस्थिती नीट समजाऊन सांगितली, तेव्हां कोठें सासूबाईच्या डोक्यांत प्रकाश पडला! त्यांनीं लगबगीनें सूनबाईकडे जाऊन हुकूम सोडला, "अग ए! म्हटलं ऐकूं आलं कां तुला? "आपल्या घरीं आज पाहुणे आले आहेत पाहुणे. त्यांची बडदास्त नीट राहिली पाहिजे अं! तिकडून सांगणं झालंय." सासूबाईच्या काल्पनिक शब्दांनीं अगोदरच सूनबाईच्या अंगास मिरच्या झोंबल्या होत्या. व त्यांतून आतां त्यांना असें ऐकूं आलें कीं, चुलीपुढचें सर्व सामान आपण अद्याप कां घेतलें नाहीं असें आपणांस सासूबाई विचारीत आहेत. मग काय विचारतां! सूनबाईच्या अंगाचा जो कांहीं भडाका उडाला आहे तो कांहीं पुसूंच नये! सासूबाईना आतां खाऊं कीं गिळूं असे तिला होऊन गेलें. तिनें मोठ्यानें ओरडून सांगितलें, "मला सर्व कांहीं समजतं आहे बरं! मी कांहीं कुकुबाळ नाहीं! चांऽगलं समजण्याइतकी मी आतां मोठी झाल्यें आहे बरं! वैरा काढून घेतला कां नाहीं, सोधण्याची फडकीं धुतलीं कीं नाहींत हें कां आतां मला तुम्हीं शिकवायला हवं? इश्श! काय मेलं! इतकं म्हातारपण झालं तरी आपली शेखी मिरवायची हौस कांहीं अद्याप पुरी होत नाहीं. इश्श! खरंच मेलं, साठी आणि बुद्धी नाठी असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. असल्या खाष्ट सासूच्या हाताखालीं आमच्यासारख्या सुशील व गरीब सुनांनीं कसं वागायचं कोणास ठाऊक!! देवा

नारायणा, असल्या दुष्ट सासूच्या हातांतून मला सोडीव बाबा आतां ! पण काय ! ! बहिऱ्या सुनेच्या किंवड्या सासूबाई ! जोडी पण कशी छान जुळली होती ! सासूबाईस ऐकूं आलें कीं सुनबाईस आपण लोणी खाल्लें असें म्हटलें. झालें ! सासूबाईच त्या ! त्यांच्या तोंडाचा पट्टा पुन्हां चालू झाला. मग काय विचारतां ! पण तितक्यांत आमचे गोविंदभटजी आंत गेले व दोघींची समजूत घालून काय काय करावयाचें तें त्यांस नीट समजावून सांगितलें, म्हणून थोडक्यांत निभावलें. नाहींतर त्या दोघींच्या भांडणांत बिचाऱ्या गोविंदभटास व पर्यायानें आम्हांसही त्या दिवशीं उपोषित राहण्याची पाळी आली होती. असो. येथें आमचा तीन दिवस मुक्काम होता.

७७. द्वारका.

नंतर आम्हीं मुंबईस जाऊन द्वारकेकडे मोर्चा वळविला. द्वारकेस जातांना क्षीरसमुद्रांतून आगबोटीनें जावें लागतें. द्वारकेंत शिरतांना चार आणे कर द्यावा लागतो. द्वारकेस गेल्यावर आम्हीं एका भिक्षुकाच्या घरीं उतरलों. स्नानें आटोपून आम्हीं द्वारकानाथाचें धूळदर्शन घेण्यास गेलों. येथेंही देवळांत जातांना एक रुपया कर ठेविला आहे. मूर्ति अतिसुंदर असून नानातऱ्हेच्या मोलवान् जडजवाहिरानीं विभूषित आहे. येथिल गोमती या नांवाच्या कुंडांत स्नान करून आम्हीं द्वारकानाथाचें पूजन केलें, व गृहीं परत आलों. येथें भाषा बहुतेक कच्छीच आहे. याठिकाणीं समुद्रांत चक्रांकित देव सांपडतात. त्यांची पूजा केली म्हणजे शाळिग्रामाची पूजा केल्याचें श्रेय मिळतें, असें पुराणांत वर्णिलें आहे. सरासरी सात दिवस आमचा येथें मुक्काम होता. नंतर द्वारका सोडून आम्हीं सोरटीसोमनाथास गेलों.

७८. सोरटीसोमनाथ.

सोरटीसोमनाथ हें एक बंदर आहे. येथें वर्णन करण्याजोगें फारसें कांहीं नाहीं. याठिकाणीं एक दिवस राहून पुढें सुदामपुरीस गेलों.

७९. सुदामपुरी.

सुदामा हा श्रीकृष्णाचा बाळसंवगडी होता हें सर्वांस श्रुत आहेच. पुढें

त्याच्या पत्नीनें विनवणी केल्यावरून तो फाटक्या उपवस्त्रांतून पोहे घेऊन श्रीकृष्णाच्या भेटीस गेला. श्रीकृष्णानें त्याच्या पोह्यावर संतुष्ट होऊन त्यास धनधान्य संपत्ति व ऐषआराम वगैरेनीं युक्त अशी एक नगरी अर्पण केली अशी कथा आहे. तीच ही सुदामपुरी होय. इची सर्व रचना थेट द्वारकेप्रमाणेंच आहे. येथें थोडे दिवस मुक्काम करून आम्हीं मुंबईस आलों.

८०. उडियाजगन्नाथ.

नंतर आम्हीं मुंबईहून उडियाजगन्नाथास गेलों. स्टेशनवर गाडी थांबली मात्र, तों तेथें पंड्यांची एकच गर्दी उसळली. जो तो पंड्या "आमचे घरीं चला," असें म्हणूं लागला. आम्हीं फक्त बायका माणसेंच असल्यामुळें, या पंड्यांच्या गर्दींतून आपण कशी वाट काढावी या विवंचनेंत आम्हीं होतों. इतक्यांत आम्हांस मागील युक्ती सुचली. आमच्यापुढें येऊन गर्दी करणाऱ्या पंड्यांस आम्हीं सांगितलें कीं, आमच्या गांवाहून निघतांना आम्हीं येथील एका पंड्यास पन्नास रुपयांची मनिआर्डर केली आहे. ज्याला ती केली आहे तो पंड्या कोठें आहे ? त्यानें पुढें यावें." आमचें हें बोलणें ऐकतांच जो तो पंड्या नकार दर्शवून आमच्यापासून दुसरीकडे गेला. झालें. याप्रमाणें मोठ्या युक्तीनें आम्हीं त्या पंड्यांपासून आपली सुटका करून घेतल्यावर एक टांगा ठरवून तेथील श्यामसुंदर गोपीनाथ या नांवाच्या एका पंड्याच्या घरीं जाऊन उतरलों. तेथील चंदनतीर्थाचें स्नान करून आम्हीं जगन्नाथाच्या दर्शनास निघालों. जगन्नाथाचें दर्शन घेण्यापूर्वीं देवळाशेजारींच असलेल्या अफाट समुद्राचें पुन्हां स्नान करावें लागतें. समुद्रस्नान करावयास जातेवेळीं, नारळ, गुंज व जानवें वगैरे जिन्नस समुद्रांत अर्पण करण्यासाठीं न्यावे लागतात. समुद्रस्नान झाल्यावर आम्हीं देवाच्या दर्शनास निघालों. परंतु गर्दी अतोनात असल्यामुळें, देवाचें दर्शन घडतें किंवा नाहीं याची आम्हांस मोठी चिंता पडली. परंतु आमच्याबरोबर असलेल्या पंड्यानें आणखी पांचसहा पंड्ये एकत्र करून आमच्यासभोंवती साखळी केली, व धक्काबुक्की करीत करीत त्यांनीं आम्हांस देवळासमोर नेऊन उभें केलें. नंतर आम्हीं देवदर्शनास आंत गेलों. छातीइतक्या उंच दगडी सिंहासनावर डावीकडे बळिभद्र, मध्य-

भागीं सुभद्रा व उजवीकडे जगन्नाथ अशा लांकडी तीन भव्य मूर्ती आहेत. जगन्नाथाच्या भालप्रदेशीं बचकेंत मावेल असा एक मोठा हिरा आहे. जगन्नाथाचें दर्शन घेतल्यावर आम्हीं तेथील स्वयंपाकगृह पाहण्यास गेलों. स्वयंपाकगृहांत जाण्यास मनाई आहे. स्वयंपाकगृहाच्या बाहेरील भिंतीस लहान लहान झरोके ठेविले आहेत. त्यांतून आंत पाहिलें म्हणजे एका बाजूस तांदळाचा ढीग व दुसऱ्या बाजूस डाळीचा ढीग आणि एकीकडे भाजीपाल्याचा ढीग असा देखावा दृष्टीस पडतो. तीन तीन तोंडाची एक एक चूल याप्रमाणें बऱ्याचशा चुली तेथें एकसारख्या पेटलेल्या असतात. प्रत्येक चुलीवर दहा दहा गाडगीं शिजतात. म्हणजे चुलीच्या शेवटच्या दोन तोंडावर प्रत्येकीं तीन तीन व मधल्या तोंडावर चार अशीं दहा गाडगीं एकमेकांवर शिजविण्यास ठेवितात. परंतु चमत्कार असा कीं, तीन तीन चार चार गाडगीं जरी एकमेकांवर शिजत ठेविलीं तरी तीं सर्व पहिल्या गाडग्यापासून तों शेवटच्यापर्यंत एकसमयावच्छेदेंकरून शिजतात. वास्तविक पाहिलें तर चुलीवरील पाहिलें गाडगें अगोदर शिजावयास पाहिजे, व वरील दोन्ही अथवा तिन्ही गाडगीं शिजेपर्यंत खालचें गाडगें करपून जाणें अपरिहार्य आहे. पण तसें कांहीं एक न होतां तीं सर्व गाडगीं एकदमच शिजतात. नंतर हीं शिजलेलीं सर्व गाडगी पंड्ये लोक देवळांत नेऊन नैवेद्याच्या जागीं ठेवितात, व पडदा सोडून सर्वजण बाहेर येऊन आरती करितात. आरती झाल्यावर नैवेद्य बाहेर आणिल्यावेळीं एक चमत्कार दृष्टीस पडतो. तो असा कीं, नैवेद्य दाखविण्याकरितां आंत ठेविलेल्या गाडग्यापैकीं फक्त पांच गाडग्यांतील अन्नावर बचके मारलेले दृष्टीस पडतात. आरतीच्या वेळीं सर्व लोक बाहेर आले असतां वर सांगितलेला प्रकार कसा घडतो याचें मोठें आश्चर्य वाटतें. वरीलप्रमाणें खूण उमटल्यावर देवाचा प्रसाद झाला असें समजण्यांत येऊन तें अन्न ज्या ज्या पंड्यांची पाळी असेल त्यांना त्यांना त्यांच्या घरीं उतारूंच्या संख्येप्रमाणें देण्यांत येतें. आणि अशा तऱ्हेनें पंड्यांच्या घरीं उतरलेल्या सर्व यात्रेकरूंना प्रसाद मिळतो. नैवेद्याच्या गाडग्यांवर उपरिनिर्दिष्ट खूण नसेल तर प्रसाद झाला नाहीं असें समजून तें सर्व अन्न समुद्रकांठीं नेऊन पुरून टाकितात. तें अन्न जर कोणी भक्षण केलें तर

खाणाऱ्यास त्यापासून पोटशूळ उत्पन्न होतो. तें याप्रमाणें अपायकारक असल्यामुळें कोणीही खात नाहींत. येथें दररोज सव्वा खंडी अन्नाचा देवास नैवेद्य होतो. प्रसादास डावा हात लावावयाचा नाहीं असा येथील एक रिवाज आहे. या ठिकाणीं दर ज्येष्ठीपोर्णिमेस स्नानजत्रा भरत असते. त्यावेळीं देव रथावर बसतो. जत्रेला सुमारें दोन तीन लक्ष यात्रेकरू जमतात. ही जत्रा पांच दिवस असते. नंतर देव जवळच असलेल्या जनकपुरीस सासुरवाडीं गेले असें समजून देवाचें द्वार तीन दिवस बंद ठेवितात. जनकपुरींत लक्ष्मीचें एक देवालय आहे, व त्यालगतच इंद्रद्युम्न या नांवाचा एक तलाव आहे. ह्या तलावांत लहानमोठीं अनेक कासवें आहेत. यात्रेकरू राजगिऱ्याच्या लाह्याचे लाडू आंत फेंकून ते तीं कासवें पटापट उड्या मारमारून खात असतांना मजा पाहात उभें राहून घटकाभर मनाची करमणूक करून घेतात. ह्या तलावाचें स्नान करून व देवीचें पूजन अर्चन वगैरे आटोपून यात्रेकरू परत उडियाजगन्नाथास आल्यावर स्वशक्त्यनुसार अटका देतात. म्हणजे देवाच्याकारणीं आपल्या पैशांचा थोडा तरी विनियोग व्हावा व त्यायोगें आपल्यास थोडेसें तरी पुण्य लागावें म्हणून यात्रेकरू आपल्या शक्त्यनुसार देवापुढें पैसे ठेवितात. या अटक्याच्या व्याजांतून देवास नैवेद्य होतो. परंतु येथें अवश्य नमूद करून ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, अटका जो द्यावयाचा तो येथील पंड्यांस न देतां वैकुंठपुरी नांवाच्या एका शिखरांत जाऊन तेथें द्यावा. तेथें सर्व व्यवस्था केली जाते. आपले दक्षिणी लोक जगन्नाथाचा प्रसाद म्हणून गोपीचंदन, कुंकू आणि वाळलेला भात बरोबर नेतात. आणि उत्तरेकडील हिंदू लोक, ताडपत्राच्या छत्र्या, हातांत धरावयाच्या वेताच्या छड्या व लांकडी मण्याच्या केलेल्या माळा वगैरे जिन्नस बरोबर घेऊन जातात. एथें कर्माबाईचें एक देवालय आहे. या कर्माबाईसंबंधानें अशी एक गोष्ट सांगतात कीं, कर्माबाई या नांवाची कोणी एक स्त्री आपल्या पतिसमवेत या गांवीं रहात असे. सृष्टीनियमाप्रमाणें तिला एक मुलगा झाला. परंतु मुलगा जन्मास आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तिजवर वैधव्यदुःखाचा डोंगर कोसळला. तें अपरंपार दुःख सोसण्याचें सामर्थ्य तिजमध्यें नसल्यामुळें, तिला अतीशय शोक झाला. परंतु शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या प्रेमळ सांगण्यांनीं

व पुत्राच्या भावी सुखाकडे नजर देऊन तिनें आपलें दुःख कसेंबसें आंवरलें. पुढें दिवसेंदिवस मुलगा मोठा झाला, तसें तिनें त्याचें लग्न केलें. पुढें कांहीं दिवसांनीं सून गर्भवती होऊन कर्माबाईस नातवाचें मुख दृष्टीस पडलें. त्यावेळेस कर्माबाईच्या आनंदास काय पुसावें! साहजिकच आहे. पतिनिधनानंतर मुलगा सुखरूपपणें लहानाचा मोठा होऊन त्याचें लग्न झाल्यावर आपल्यास नातवाचें मुख दृष्टी पडेल अशी त्यावेळीं तिची कल्पना कशी असणार? परंतु आतां परमेश्वरकृपेनें तसें प्रत्यक्षच घडून आल्यामुळें तिला अतीशय आनंद होऊन तिनें परमेश्वराची श्रद्धायुक्त अंतःकरणानें कृतज्ञतापूर्वक पुष्कळ स्तुति केली असेल यांत नवल नाहीं. परंतु "सुख तिळा येवढें" आणि "दुःख पर्वता येवढें" या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणें कर्माबाईचें दुर्दैव पुन्हां ओढवलें. नातवाची प्राप्ति झाली म्हणून तिला हर्ष होतो न होतो तोंच पुत्रमरणाच्या ताज्या दुःखानें बिचारीस ग्रासलें. ईश्वरेच्छेपुढें कोणाचा उपाय आहे! "ईश्वरेच्छा बलीयसी" असें म्हटलें आहे तें सर्वथैव किती सत्य आहे याचा कर्माबाईस आतां पूर्णपणें अनुभव आला. बिचारी किती म्हणून दुःख करणार! संसाररूपीं दुःखसमुद्रांत एकदां सांपडल्यावर त्यामध्यें नैसर्गिकरितीनें उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखरूपी असंख्य लाटा आपणांवर एकसारख्या आदळत राहणारच. आपण कितीही धडपड केली तरी लाटांचे तडाखे न चुकतां ते अधिकाधिकच बसत जाणार व त्यांच्या तडाख्यांत सांपडलेल्या क्षुद्र जीवास त्या कोठच्या कोठें दूर फेंकून देतील याची कल्पनाही होणें दुरापास्त आहे. मोठमोठे सुर आणि असुर, मोठमोठे पराक्रमी योद्धे, नुसत्या हुंकारानें त्रैलोक्यास कंपायमान करून सोडणारे मोठमोठे तपस्वी, यांची सुद्धां जर या प्रचंड लाटापुढें कांहीं मात्रा चालली नाहीं, तर सर्वतऱ्हेनें अबला असणाऱ्या आमच्या या कर्माबाईचा काय पाड! तरी पण "बुडत्यास काडीचा आधार" या म्हणीप्रमाणें आपल्या नातवाकडे पाहून दुःखानें जळजळणाऱ्या आपल्या अंतःकरणाचें कर्माबाईनें कसें तरी समाधान केलें. परंतु छेः! हतभागी मनुष्य कोठेंही गेला म्हणून त्याच्या पाठीमागें हात धुवून लागलेलें दुर्दैव त्याला थोडेंच मोकळें सोडणार आहे! कर्माबाईच्या दुर्दैवानें पुन्हां उचल खाल्ली.

त्यानें आपला त्रिकालाबाधित यमदंडासारखा भयंकर पाश त्या हतभागी कर्माबाईच्या पंधरा सोळा वर्षांच्या कोंवळ्या नातवावर निर्दयपणें टाकून तिच्या दुःखाची पूर्तता केली. बिचारीच्या डोळ्यांतील अश्रु कोठच्या कोठें पार नाहींसे झाले. तिला रडें म्हणून कसें तें येईना. दुःख जोंवर लांब आहे तोंवर त्याची भीति वाटत असते. त्यांत सांपडून जोंवर त्याचा विपाक झाला नाहीं तोंवर त्यांतून निसटून जाण्याची आशा असते. परंतु एकदां का त्या दुःखाचा अतिरेक झाला म्हणजे त्याबद्दल मग कांहीं वाटेनासें होऊन मनुष्य पूर्ण निराशावादी बनतो. कमी धीराच्या मनुष्यास वेड लागतें व थोडा धीर असलेला मनुष्य पूर्ण निराशावादी होऊन त्यांतच तो एकप्रकारचा आनंद मानूं लागतो, आणि नंतर कितीही संकटें आलीं तरी त्यासंबंधीं तो अगदीं बेफिकीर असतो. परंतु निराशेच्या एकदां बसलेल्या वज्रप्राय तडाख्यानें तो एकसारखा झुरत असतो. कर्माबाईची हुबेहूब हीच अवस्था झाली. मोठमोठीं संकटांवर संकटें येऊन बिचारीच्या सर्व आशा नष्ट झाल्या होत्या. तिला आतां निराशेनें पूर्णपणें वेढिलें. एकप्रकारें वेडच लागल्याप्रमाणें तिला झालें. ती आपल्याशींच बडबडूं लागली. सर्व गोष्टींचा तिला अगदीं वीट येऊन गेला. अशा स्थितींत कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं अकस्मात दोन गोसावी तिच्या दाराशीं येऊन तिजपाशीं घटकाभर विश्रांतिसाठीं जागा मागूं लागले. निराशेनें मनुष्य एकदां बेफिकीर झालें म्हणजे त्याचें मन मग कशांतच रमत नाहीं. कोणतीही गोष्ट म्हणजे आपण करावी असें त्यास मुळींच वाटेनासें होतें. त्याला फायदा व तोटा, सुख आणि दुःख, पाप व पुण्य यासंबंधीं कांहींच वाटत नाहीं. कर्माबाई तर आतां मूर्तिमंत निराशावादीच बनली होती. तिला कोणत्याही आशेची गोडी म्हणून राहिली नव्हती. आपल्या दाराशीं बैराग्यांस पाहतांच तिला कसेंसेंच वाटलें. 'येथें जागा मिळणार नाहीं, तुम्हीं आपले दुसरीकडे कोठें तरी सोय पहा' असें तिनें त्यांस सांगितलें. परंतु बिचारे बैरागी फार दूरच्या प्रवासाहून आले असल्यामुळें अतिशय थकून गेले होते. कोठें तरी लौकर जागा मिळेल तर बरें असें त्यांस झालें होतें. त्यांनीं बाईची पुन्हां विनवणी केली. 'देव तुमारा भला करो' असाही त्यांनीं तीस आशीर्वाद दिला. पण

कर्माबाईचें आतां भलें होण्याचें काय राहिलें होतें ? तथापि औचित्यास अनुसरून तिनें बैराग्यांस उतरण्यास जागा दिली. बोवांनींही लौकरच आपलें बिऱ्हाड थाटलें व पोटापाण्याची व्यवस्था चालविली. भोजन वगैरे आटोपल्यावर दोघेही विश्रांतिसाठीं घटकाभर स्वस्थ बसले. इतकावेळपर्यंत कर्माबाईच्या आंत बाहेर एकसारख्या खेपा चालल्या होत्या. परंतु कशांतही तिचें मन लागत नव्हतें असें दिसत होतें. तिच्या डोळ्यास एकसारखें पाणी येत होतें. बैराग्यांनीं हा प्रकार बराच वेळ अवलोकन केल्यावर त्यांनीं बाईस नम्रपणानें तिच्या दुःखाचें कारण विचारिलें. तेव्हां तिनें आपली सर्व कर्मकहाणी अथपासून इतिपर्यंत त्यांना सांगितली. तेव्हां त्या त्रयस्थ पांथस्थांच्याही डोळ्यांस पाणी आलें. त्यांनीं असा विचार केला कीं कांहीं तरी उपाय योजून बाईस आपल्या दुःखाचा विसर पाडला पाहिजे. मग त्यांनीं बाईस सांगितलें कीं, " बाई, आम्हीं सांगितल्याप्रमाणें जर तुम्हीं वागण्याचें मनांत आणाल तर तुम्हांस आपल्या दुःखाचा खचित विसर पडेल असा कांहीं उपाय आम्हीं सांगूं. " बाईनें त्याप्रमाणें वागण्याचें कबूल केल्यावर त्यांनीं चार पांच महिन्यांच्या मुलाच्या आकाराचें एक लांकडी बाहुलें आणविलें व तें बाईच्या स्वाधीन करून सांगितलें कीं, " लहान मुलासारखी याची शुश्रुषा करा, त्यांत कोणत्याही प्रकारें अंतर पडूं देऊं नका. " असें सांगण्यांत त्या बैराग्यांचा हेतू इतकाच कीं, मुलाप्रमाणें त्या लांकडी बाहुलीची उस्तवारी करण्यांतच रमून जाऊन तिला आपल्या दुःखाचा विसर पडावा. इतकें तीस सांगितल्यावर दुसरे दिवशीं " आम्हीं पुढील वर्षीं येतों " असें सांगून ते दोघेही गोंसावी निघून गेले. इकडे कर्माबाईनें बोवांनीं सांगितल्याप्रमाणें त्या लांकडी बाहुल्यास लहान मूल असें समजून व त्याचें कृष्णा असें नाव ठेवून त्याची जोपासना व कोडकौतुक करण्यास प्रारंभ केला. त्याचें न्हाणें माखणें, त्यास दूध पाजविणें, थंडीवारा लागूं नये म्हणून त्यास उबदार कपडे घालणें, वगैरे जें जें म्हणून खरोखरीच्या लहान मुलांस करितात तें तें सर्व ती त्या लांकडी बाहुल्यास करूं लागली. पुढें कांहीं महिन्यांनीं तिनें त्याचें उष्टावणही केलें. त्याच्याकरितां मुद्दाम एका लहान तांबलींत ती भात करूं लागली. वाचकांस असें आश्चर्य वाटेल कीं धडधडीत लांकडाचें बाहुलें दिसत असतांनासुद्धां

खरोखरीच्या मुलासारखी ती त्याची जोपासना कशी करूं लागली. परंतु त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं. कारण मनुष्य एकदां अतिशय निराश झाला म्हणजे, त्यास तूं अमुक मार्गानें गेलास म्हणजे तुला तुझ्या दुःखाचा विसर पडेल, असें कोणी निश्चयानें सांगितलें तर तो मार्ग मग कसाही असो, त्या मार्गाचें तो एकदम आक्रमण करूं लागतो. कारण मनुष्याचा देहस्वभावच असा आहे कीं, त्यास नेहमीं आनंदच उपभोगावयास पाहिजे असतो. म्हणून कितीही संकटें त्याच्यावर आलीं तरी सुखाची आशा धरून तो तीं संकटें कशीतरी सोशीतच असतो. कर्माबाई याला कांहीं अपवाद नव्हती. अनेक दुस्तर संकटें तिजवर आल्यामुळें, जरी ती निराश झाली होती तरी त्यांतूनही जरी कोणी तिला सुखाचा मार्ग दाखवून दिला असता तरी तो तिला हवाच होता म्हणून वाचकहो, गोसाव्यांनीं तिला दाखविलेला मार्ग तुमच्या आमच्या दृष्टीनें कितीही हास्यस्पद असला तरी सुखाची आशा धरून कर्माबाईनें तो पत्करला यांत आश्चर्य कोणतें ? परंतु खरोखरच आश्चर्य करण्यासारखें अद्याप पुढेंच आहे. कर्माबाईची त्या लांकडी बाहुल्यावर इतकी श्रद्धा बसली कीं तिला तें खरोखरीचेंच लहान मूल आहे असें वाटूं लागलें. अंतःकरणाचा व समजुतीचा असा एक भाव झाला म्हणजे ज्या वस्तूवर आपला भाव बसतो ती वस्तु साक्षात् तशी दिसूं लागते. परमेश्वराची करणी अगाध आहे, हें कांहीं खोटें नाहीं. कर्माबाईचें त्या बाहुल्याच्या ठिकाणीं अतिशय एकाग्र अंतःकरण झाल्यामुळें, असा चमत्कार झाला कीं कांहीं दिवसांनीं ती लाकडी बाहुली खरोखर जेवूं लागली. कर्माबाईच्या तें लक्षांतही आलें नाहीं. तिनें आपलें त्या बाहुलीस भूक लागली म्हणजे जेवूं घालावें आणि तीस पाळण्यांत निजवून आपण आपल्या नित्यक्रमास लागावें. याप्रमाणें लागोपाठ तीन वर्षें लोटलीं. एकेदिवशीं ते पूर्वींचे गोसावी अकस्मात् तिच्या दारांत आले व 'माई दार उघडो' असें म्हणाले. त्यावेळीं कर्माबाई त्या बाहुलीस जेवूं घालीत बसली असल्यामुळें 'मी बाळास जेवूं घालतें आहे, अंमळशानें दार उघडतें, थोडें थांबा' असें तिनें उत्तर दिलें. गोसाव्यांस तें ऐकून फार विस्मय वाटला. कांहीं वेळानें दार उघडल्यावर ते आंत गेले व ती कोणास जेवूं घालीत होती याबद्दल त्यांनीं तिजजवळ पृच्छा केली.

तिनें सरळपणानें सांगितलें कीं, तुम्हीं दिलेल्या बाहुलीसच मीं आतां जेवूं घालीत होत्यें. तिला पाळण्यांत निजविल्यानंतर मीं तुम्हांस दार उघडलें. परंतु कर्माबाईच्या त्या सांगण्यावर त्यांचा विश्वास बसेना. बरोबर आहे. लांकडाचें बाहुलें जेवलेलें कधीं कोणाच्या दृष्टीस पडलें आहे? परंतु ज्या कर्माबाईनें आपल्या हातांनीं त्या बाहुलीस इतके दिवस भरविलें होतें, त्या तिला गोसाव्यांनीं आपल्या सांगण्याविषयीं अविश्वास दाखवावा याबद्दल कसेंसेंच वाटलें. नंतर कांहीं वेळानें तिनें त्या बाहुलीस दूध पाजविण्याकरितां पाळण्यांतून काढून आपल्या मांडीवर घेतलें. व तीस दूध पाजूं लागली. परंतु यावेळीं ती बाहुली दूध घेईना. तेव्हां लहानमुलांस ज्याप्रमाणें धाक दाखवितात त्याप्रमाणें कर्माबाईनें त्या बाहुलीस धाक दाखविल्याबरोबर ती बाहुली दूध पिऊं लागली. हें पाहतांच त्या गोसाव्यांनीं कर्माबाईच्या पायावर डोकें ठेविलें व म्हटलें, " बाई, तूं धन्य आहेस. ज्या परमेश्वराचें दर्शन घडावें म्हणून आम्हीं अहोरात्र तपश्चर्या करितों, परंतु, ज्यानें आम्हांस अद्याप कधीही दर्शन दिलें नाहीं तो पतीतपावन भगवान् प्रत्यक्ष तुझ्या येथें येऊन भोजन करितो, तेव्हां तुझा महिमा काय वर्णावा? दुसऱ्या विषयांत मन गुंतून आपल्या दुःखाचा विसर पडावा म्हणून तुला आम्हीं एक लांकडी बाहुलें दिलें. परंतु त्यावरसुद्धां तुझी अढळ श्रद्धा बसल्याकारणानें प्रत्यक्ष परमात्मा तुझ्या घरीं येऊन वास करूं लागला. तेव्हां तुझें भाग्य किती थोर आहे याचें वर्णन आम्हीं पामरांनीं काय करावें! परमेश्वराच्या ठिकाणीं एक लय झाल्यावर काय उणें आहे? परमात्माच त्याच्यापुढें हात जोडून उभा राहतो. असो. आजपासून तूं आम्हांला आमच्या गुरूच्या ठिकाणीं आहेस." असें म्हणून त्यांनीं तिला साष्टांग नमस्कार घातला. इकडे जगन्नाथाचे देवळांत काय चमत्कार होत असे तो ऐका. ज्या ज्या वेळीं म्हणून कर्माबाई आपल्या बाहुलीस दूध पाजावयास अथवा जेवूं घालण्यास आपल्या मांडीवर घेत असे त्या त्या वेळीं देवळांतून जगन्नाथाची मूर्ति अदृश्य होत असे. हें पाहून पूजाऱ्यांस परम विस्मय वाटे. होतां होतां त्यांस असें समजलें कीं कर्माबाई म्हणून कोणी एक बाई या गांवांत आहे. तिच्या येथें निर्जीव लांकडाची बाहुली जेवीत असते. त्याबरोबर सर्व पूजारी, भाविक लोक, किंब-

हुना तो सर्व गांवच्या गांव तें पाहण्यास कर्माबाईच्या घरीं लोटला, आणि खरोखरीच ती लांकडी बाहुली तिच्या येथें जेवतांना पाहून त्यांस परम आश्चर्य वाटलें. कर्माबाईच्या घरीं लांकडी बाहुली जेवणें व त्याचवेळीं देवालयांतून मूर्ति अदृश्य होणें या दोन्ही गोष्टी एकाचवेळीं घडून येत असल्याचें जेव्हां सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तेव्हां त्यांस देवाची मूर्ति अदृश्य कां होते याचा उलगडा झाला आणि जिच्यामध्यें प्रत्यक्ष परमेश्वरास आपल्या घरीं जेवावयास लावण्याची पात्रता आहे त्या कर्माबाई विषयीं त्यांच्या मनांत भक्तिभाव उत्पन्न होऊन त्या सर्वांनीं तिला साष्टांग नमस्कार घातले. पुढें कर्माबाई निवर्तल्यावर तिच्या नांवाचें एक देऊळ बांधिलें गेलें. तेंच हें हल्लीं " कर्माबाईचें देऊळ " या नांवानें प्रसिद्ध आहे. देवास बाकीचे नैवद्य होण्यापूर्वी कर्माबाईच्या खिचडीचा नैवेद्य नित्य अगोदर होतो.

असो. गोष्ट सांगण्याच्या भरांत आपण प्रवासवर्णनापासून बरेच दूर आलों इकडे आमचें लक्ष गेलें नाहीं. तेव्हां आपण आतां पुढील वर्णनाकडे वळावें हें बरें.

८१. साक्षीगोपाळ.

उडियाजगन्नाथाचें दर्शन घेऊन आम्हीं नंतर साक्षीगोपाळास जाण्यास वळलों. साक्षीगोपाळास गेल्यावर श्रीगोपाळाचें दर्शन घेतलें. गोपाळाची मूर्ति काळ्यापाषाणाची असून अदमासें छातीइतकी उंच आहे. येथें एक दिवस राहून पुढें आम्हीं भुवनेश्वरास गेलों.

८२. भुवनेश्वर.

येथें भुवनेश्वराचें (महादेवाचें) पुरातन लिंग आहे. देऊळ भलें मोठें असून एकाच दगडांत कोरलेलें आहे. येथें बिंदू सरोवर आहे. या सरोवरांत स्नान करून आम्हीं महादेवाची पूजा केली. आणि एक दिवस मुक्काम करून नंतर गंगासागराला जाण्याकरितां कलकत्त्यास आलों.

८३. कलकत्ता.

येथें महाकाळी, पारिसनाथाचें देऊळ, राणीचा बाग, अजब बंगला वगैरे स्थळें पाहण्यासारखीं आहेत. महाकाळीची मूर्ति उग्र असून सिंहावर

बसलेली आहे. देवीच्या देवळांत पांच पंचवीस ब्राह्मण नेहमीं अनुष्ठान करीत बसलेले असतात. महाकाळीचें दर्शन घेतल्यावर आम्हीं पारिसनाथाचें दर्शन घेण्यास गेलों. पारिसनाथाचें देऊळ एकजात कांचेनें बांधिलेलें आहे. सर्व जगांतील कांचेचें कलाकसुरीचें काम जर कोणास पहावयाचें असेल तर ते त्यांस येथेंच पाहावयास मिळेल. नंतर आम्हीं राणीचा बाग पहावयास गेलों. या बागेंत नानाप्रकारचें जगांतील सर्व पशू आहेत. परमेश्वरी विविधविलास कसा आहे व तो किती अतर्क्य आहे याची थोडीशी कल्पना येथें असलेल्या हजारों जातींच्या प्राण्यांना पाहून होते. अजबखान्यांतही हाच प्रकार. येथें सर्व तऱ्हेची माती, सर्व तऱ्हेचे दगड, अखिलदेशांतील नानातऱ्हेचे कपडे, दागिने व लढाऊ सामान वगैरे सर्व जिन्नस प्रदर्शनाकरितां ठेविलेले आहेत. या ठिकाणीं एका भल्या मोठ्या माशाच्या हाडांचा सांपळाही ठेविलेला आहे. अजबखाना, पारिसनाथाचें देऊळ व राणीचा बाग पाहिला म्हणजे जगांतील नानातऱ्हेचें कलाकौशल्य, उत्कृष्ट कुसरीचें कांचकाम व परमेश्वरी विविधवैचित्र्य हें एकसमयावच्छेदेंकरून दृष्टीस पडून फार आल्हाद वाटतो.

८४. गंगासागराची कांहीं माहिती.

कलकत्त्यास चार पांच दिवस मुक्काम करून आम्हीं गंगासागरास जाण्याकरितां निघालों. निघतेवेळीं कलकत्त्याच्या अफाट नदींतूनच बोटींत बसून जावें लागतें. ती बोट समुद्रांत शिरून गंगासागराच्या मार्गास लागते. परंतु गंगासारास बोट पोंचण्याच्या अगोदर गंगासागरची थोडी-बहुत माहिती वाचकांस करून देणें इष्ट आहे. गंगासागर असें या स्थलाचें नांव पडण्याचें कारण पूर्वीं सगर राजानें नव्याण्णव अश्वमेधयज्ञ करून शंभराव्या अश्वमेधाकरितां आपल्या साठहजार पुत्रांच्या संरक्षणाखालीं एक अश्व मोकळा सोडला होता. तो फिरत फिरत जेथें कपिलमहामुनी तपश्चर्येस बसले होते तेथें जाऊन उभा राहिला. तेव्हां सगर राजाच्या पुत्रांस कपिलमुनींनेंच आपल्या घोड्यास मुद्दाम अडकवून ठेविलें आहे असें वाटून त्यांनीं मुनीचा समाधिभंग केला. तेव्हां आपल्या समाधीचा निष्कारण भंग केल्याबद्दल कपिलमहामुनीस क्रोध

येऊन त्यांनीं त्या सर्वांस आपल्या तपःसामर्थ्यानें भस्म करून टाकिलें. पुढें सगर राजानें मुनींची स्तुती करून त्यांस प्रसन्न केलें व आपल्या मृतपुत्रांस पुन्हां सजीव करण्याविषयीं त्यांस विनंति केली. कपिल मुनींनीं सांगितलें कीं, आकाशांतील गंगा तपःसामर्थ्यानें पृथ्वीवर आणून त्या पाण्याचें सिंचन जर तूं या तुझ्या पुत्रांवर करशील तरच ते सर्व पुन्हां सजीव होतील. परंतु तसें करणें सगरराजाच्या हातून सिद्धीस गेलें नाहीं. पुढें त्याचा पणतू भगीरथराजा यानें आपल्या पूर्वजांचा उद्धार केला. भगीरथराजानें ज्या ठिकाणीं आपल्या पूर्वजांचा उद्धार केला तेंच हें ठिकाण होय. या ठिकाणीं गंगा आणिली म्हणून या स्थानास गंगासागर असें नांव पडलें आहे. हल्लीं ही जागा समुद्रानें व्यापिली आहे. परंतु पौष महिन्यांत भोगी, संक्रांत व किंक्रांत या तीनही दिवशीं येथें बिलकूल पाणी नसतें. परंतु चवथे दिवशीं मात्र येथें पाणी येऊन सर्व जलमय होऊन जातें. असें असल्यामुळें यात्रेकरू तिसरे दिवशींच आपलें चंबूगवाळें घेऊन येथून निघून जातात. असो. आम्हीं कलकत्त्याहून निघून दुसरे दिवशीं माध्यान्हकाळीं गंगासागरास जाऊन पोंचलों.

८५. गंगासागर.

आमचें जहाज यात्रेच्या स्थानापासून सुमारें एक मैल अंतरावर समुद्रांत उभें केलें होतें. जहाजांतून यात्रेच्या ठिकाणीं लहान लहान पडावांतूनच जावें लागतें. पडावांतून जात असतां क्षणोक्षणीं समुद्राच्या लाटांनीं पडाव पालथा होईल कीं काय याची एकसारखी भीति वाटत असते. कारण समुद्राच्या अजस्त्र लाटांनीं लहान लहान बोटी, पडाव वगैरे भडाभड पालथे होतात. यात्रेच्या स्थानास जाऊन परत येईपर्यंत यात्रेकरूस आपल्या जीविताची शाश्वति वाटत नाहीं. गंगोत्री जम्नोत्रीसारख्या अवघड यात्रेपेक्षांही ही यात्रा आम्हांस फार भीतिप्रद वाटली. आम्हीं पडावांतून यात्रेच्या स्थानीं पोंचल्यावर आमच्याकरितां एक लहानसें खोपटें आम्हीं तयार केलें. खोपटें म्हणजे काय तर एक तट्या, दोन फाटे फुटलेलीं लांकडें व एक बांबू. फाटे फुटलेलीं लाकडें वाळवंटांत पुरून त्यांवर तो बांबू आडवा टाकून त्यावर तट्या टाकून दिला कीं झालें

झोपडें तयार! अशा प्रकारची झोपडी तयार करून आम्हीं आमचें सामान व्यवस्थितपणें लावून ठेविलें व देवदर्शनास गेलों. येथें कपिलमहामुनींची एक मूर्ति असून जवळच गोड्यापाण्याचें एक लहानसें तळें आहे. यास तळें म्हणण्याऐवजीं एक विहीर असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. समुद्राच्या खाऱ्यापाण्यांतून प्रतिवर्षीं एवढेंच गोडें पाणी येथें असणें म्हणजे एक महदाश्चर्यच होय. या तळ्यांतून उर्फ विहिरींतून पाणी वर काढून घेऊन स्नान करावें लागतें. स्नान वगैरे आटोपून आम्हीं देवदर्शनास गेलों. येथें मूर्तीची पूजाअर्चा वगैरे तीन दिवस यथासांग होते. दर्शन घेऊन आम्हीं परत आमच्या खोपटांत उर्फ झोंपडींत आलों. या ठिकाणीं चोऱ्या फार होतात. आमच्या झोंपडीशेजारीं बरींच वर्षें गंगासागराची यात्रा करणाऱ्या एका गृहस्थाची झोंपडी होती. झोंपडींत कोणी न राहतां आम्हीं सर्वजण बाहेर गेलों आहों असें पाहून आम्हीं परत आल्यावर त्यांनीं आम्हांस सांगितलें कीं, "या ठिकाणीं चोऱ्या फार होतात, चोर पाहतां पाहतां माल लांबवितात, तेव्हां तुम्हीं फार सावधगिरी ठेवा व झोंपडींत तुमच्यापैकीं कोणास तरी ठेऊन नंतर तुम्हीं बाहेर जात जा." आम्हांस त्या गृहस्थाचें म्हणणें समजलें पण उमगलें नसल्यामुळें वाटलें कीं, उंः, यात्रेसारख्या पवित्र ठिकाणीं चोरी कशाला कोण करितो आहे! आम्हीं सावधगिरीनें असावें एवढाच त्या गृहस्थाचा सांगण्याचा मुख्य हेतु असावा असें आम्हांस वाटलें. परंतु दुसऱ्याच दिवशीं आम्हांला चोराचा प्रसाद खरोखरीच भोंवण्याचा प्रसंग आला. प्रवासांत बरोबर कांहीं तरी वरवर खावयास असावें म्हणून आम्हीं सर्वांनीं कोणी लाडू, कोणी पोहे, तर कोणी लाह्यांचें पीठ वगैरे जिन्नस बरोबर घेतले होते. व त्यांची जरूर लागेल तेव्हां ते झटकन् सांपडावे या हेतूनें त्या सर्वांचें एकच गांठोडें केलें होतें. सकाळच्या प्रहरीं त्यांतील थोडें थोडें सर्वांनीं तोंडांत टाकून गाठोडें बांधून व्यवस्थितपणें ठेविलें होतें. परंतु संध्याकाळीं कांहीं तरी खावें म्हणून आम्हीं त्या गाठोड्याजवळ गेलों. तों तेथें गाठोडें नाहीं! आम्हीं सर्वांनीं मारे आपापलीं चिरगुटें तपासण्याचा सपाटा चालविला. पडदणीचें धोतरसुद्धां धुंडाळल्याशिवाय आम्हीं ठेविलें नाहीं. परंतु छट्! गाठोड्याचा कांहीं केल्या पत्ता लागेना. सर्वांच्या पोटांत कालवाकालव सुरू

झाली. लाडवापोह्याचें गाठोडें गेलें! कोणी म्हणूं लागले आणखी पांच सहा दिवस तरी लाह्यांचं पीठ आम्हांस खास पुरलें असतें. दुसरा म्हणूं लागला, फक्त एका लाडवाच्या पिशवीखेरीज जरी सर्व गेलें असतें तरी फारशी कांहीं हरकत नव्हती. निदान आपणां सर्वांना ४।५ दिवस तरी त्यांतील लाडू पुरले असते. असो. याप्रमाणें कोणाला कांहीं कोणाला कांहीं आपापले परी खाण्याचे जिन्नस गेले म्हणून थोडें फार वाईट वाटलें. पण त्याला इलाज नव्हता! " गतं न शोच्यम् " " छिन्नहस्ते मत्स्ये धीवरःवदति धर्मो मे भविष्यति " या कव्युक्तीप्रमाणें आम्हीं आमच्या हळहळणाऱ्या मनाची कशी तरी समजूत करून घेतली. हं! आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिलीच! आजूबाजूच्या समुद्राच्या पाण्यांतून लांडग्यांच्या आकाराचे कांहीं प्राणी येऊन यात्रेकरूंस फार त्रास देतात. परंतु आगट्या पेटवून भांडीं वाजविलीं कीं ते सर्व पळून जातात. याप्रमाणें येथें दोन दिवस घालवून तिसरे दिवशींच सायंकाळचे सुमारास बोटींत बसून आम्हीं परत कलकत्त्यास आलों. याप्रमाणें आमचा उत्तरेकडचा प्रवास संपला. यानंतर आम्हीं रामेश्वराचा मार्ग आक्रमण्यास सुरवात केली.

८६. कलकत्ता, पुणें, देहू, आळंदी.

कलकत्त्याहून आम्हीं थेट पुण्यास आलों, व तेथून देहू, आळंदी करून आम्हीं पंढरीनाथाचें दर्शन घेण्यास गेलों.

८७. पंढरपूर.

पंढरपूर क्षेत्र महाराष्ट्रामध्यें प्रसिद्धच आहे. येथें प्रतिवर्षी असंख्य वारकरी वारी करण्यास येतात. आषाढी एकादशीस तर येथें फारच गर्दी होते. असंख्य वारकऱ्यांच्या अहोरात्र भजनानंदानें सर्व वातावरण दुमदुमून जातें. पंढरीचें माहात्म्यवर्णन महाराष्ट्रांतील सर्व आबालवृद्धांस माहीत आहेच. तेव्हां त्याबद्दल पुन्हां चर्वितचर्वण करीत न बसतां आपण पुढें वळावें हें बरें. पंढरपुरास आमचा मुक्काम आठ दिवस होता. नंतर आम्हीं रामेश्वराच्या मार्गास लागण्याकरितां विजापुरास गेलों.

८८. विजापूर.

येथील इतिहासप्रसिद्ध गोलघुमट, इब्राहिमरोझा, ताजबावडी, मुल्रुख-मैदान तोफ वगैरे पाहण्यांत आम्हीं दोन तीन दिवस घालविले. येथील सर्व प्रेक्षणीय स्थळें पाहून झाल्यावर आम्हीं थेट हुबळीस गेलों.

८९. हुबळी.

आरूडस्वामींचें दर्शन घेऊन तसेंच आम्हीं हरिहरास गेलों.

९०. हरिहर.

हरिहरास तुंगा नदी वाहते. तुंगानदीच्या कांठावर हरिहराचें देऊळ आहे. येथें हरि व हर एकमेकांस भेटले आहेत. पण मूर्ति एकच असून त्यास दोन मस्तकें व चार हात आहेत. एका मस्तकावर किरीट-कुंडलें घालितात, व दुसरें मस्तक जटाविभूषित आहे.

९१. हंपीविरुपाक्ष.

हरिहराचें दर्शन झाल्यावर आम्हीं हंपीविरूपाक्षास गेलों. नदीच्या एका कांठावर विरूपाक्षाचें देऊळ असून दुसऱ्या बाजूस किष्किंधा नगरी आहे. हंपीविरुपाक्षाचें दर्शन घेऊन नांवेत बसून आम्हीं किष्किंधा नगरी पहाण्यास गेलों. एकंदर नगर पाहण्यालायक आहे. येथें वाली व सुग्रीव यांच्यावेळचा एक दगडी रथ आहे. तो सरासरी चार पुरुष उंच असून एकाच दगडांत खोदलेला आहे. येथें सुग्रीवाची सभा आहे. तीहि सर्व दगडीच असून त्यांतील कौशल्याचें काम फार प्रेक्षणीय आहे. रामलक्ष्मणांच्या मूर्तीही येथें आहेत. त्या सुमारें दोनतीन पुरुष उंच असून एकाच शिलेवर कोरलेल्या आहेत. मूर्ती काळ्या पाषाणाच्या आहेत. पुराणप्रसिद्ध पंपासरोवर येथेंच आहे. येथें दोन दिवस मुक्काम करून आम्हीं श्रीशैल्यास जाण्याकरितां निघालों.

९२. श्रीशैल्य.

नंद्याळ स्टेशनवर आमच्यापैकीं कांहीं मंडळी उतरली व बाकीची पुढें रामेश्वरास त्याच गाडीनें निघून गेली. नंतर आम्हीं श्रीशैल्यास जाण्याकरितां सर्व पायींच निघालों. श्रीशैल्यास पोंचण्यास आम्हांस चार दिवस

लागले. जातांना सर्व डोंगर तुडवावा लागतो. एका उंच व प्रशस्त डोंगरावर श्रीशैल्याचें देऊळ आहे. येथें शिवरात्रीस यात्रा भरते. श्रीशैल्याची पूजा येथील लिंगायत लोकच करितात. बारा ज्योतिर्लिंगापैकीं हें एक लिंग आहे. डोंगरावर भिल्लांची वस्ती फार असल्यामुळें चोऱ्या होण्याचा फार संभव असतो, म्हणून यात्रेकरूबरोबर पोलिसांचा बंदोबस्त असतो. श्रीशैल्यापासून जवळच खालीं खोलांत पाताळगंगा वाहते. श्रीशैल्यास पाताळगंगा, काशी किंवा जम्नोत्रीची गंगा, व आकाशगंगा (नारळाचें पाणी) या तिन्ही गंगांच्या पाण्यानें अभिषेक केला तरच त्याची पूजा यथासांग होते असें म्हणतात. आम्हीं या तिन्ही गंगांचें पाणी आणिलें होतेंच. त्यानें लिंगास अभिषेक करून सर्व पूजा यथासांग केली, व तेथून पुढें आणखी दोन एक मैल उंचीवर असलेलें शिखरेश्वराचें देऊळ पाहण्यास गेलों.

९३. शिखरेश्वर.

देवळांत शिवाची एक लहानशी पिंडी आहे. येथून खालीं श्रीशैल्याचें शिखर दृष्टीस पडतें. शिखरेश्वराचें दर्शन घेऊन त्या ठिकाणाहून खालीं असलेल्या श्रीशैल्याच्या शिखराचें दर्शन घेतलें म्हणजे पुनर्जन्म मिळत नाहीं असें म्हणतात. येथें शिखरेश्वराचीं दोन शिखरें आहेत. दोन्ही शिखरांमध्यें सुमारें २५।३० हातांचें अंतर असून प्रत्येक शिखराचा परीध सुमारें १७।१८ हात आहे. प्रत्येक शिवरात्रीस या दोन्ही शिखरास मिळून एकच पागोटें बांधतात. हें पागोटें इतकें लांब असतें कीं दोन्ही शिखरास गुंडाळून सुद्धां थोडेंसें शिल्लक उरतें. व त्यांतील मौज ही कीं हें सुमारें शंभर हात लांब पागोटें एकच मनुष्य फक्त एकाच दिवशीं म्हणजे सकाळीं सूर्योदयापासून तें सूर्यास्तापर्यंत विणतो. म्हणजे शंभर हात लांब पागोटें बारा तासांत विणून तयार होतें. एका मनुष्याच्या हांतून इतक्या थोड्या अवधींत शंभर हात लांब पागोटें विणून तयार होणें, म्हणजे एक आश्चर्याचीच गोष्ट आहे. असो. येथून शिखरेश्वराचा प्रसाद म्हणून लहान लहान दगडी लिंगें व भस्माचे गोळे यात्रेकरू आपल्याबरोबर नेतात. शिखरेश्वराहून खालीं डोंगर उतरत असतांना वाटेंत आम्हांस महानंदेचें देऊळ लागलें.

९४. महानंदा.

महानंदेचें देऊळ पाण्यामध्यें आहे. पाणी फारसें खोल नसल्यामुळें आम्हीं पाण्यांतूनच दर्शनास देवळांत गेलों. देऊळ पाण्यांत असण्याचें कारण असें सांगतात कीं पूर्वीं महानंदा या नांवाची एक नायकीण होती. तिचा असा निश्चय असे कीं एकदां स्पर्श केलेल्या पुरुषाशीं ती पुन्हां केव्हांही रत होत नसे, व जेवढा वेळ त्या पुरुषांशीं तिचा करार असे तेवढाच वेळ ती त्याच्या पूर्णपणें अंकित असे. एकदां तिची परिक्षा पहावी म्हणून शंकर स्वतः कैलासाहून निघाले, व महानंदेपाशीं येऊन तिच्याशीं त्रिरात्रीचा करार केला. कराराप्रमाणें ती शंकराच्या अंकित झाल्यावर शंकरांनीं आत्मलिंग काढून तें तिच्याजवळ दिलें व तें फार जपून ठेवण्याविषयीं सांगितलें. तें खुद्द आपल्या अंतर्महालांत नीट जपून ठेऊन ती शंकराच्या आज्ञेंत तत्पर होऊन राहिली. इकडे शंकरांनीं आत्मलिंग ठेविलेल्या महालास आग लावून दिली व आपण गम्मत पहात बसले. इकडे शंकरांचें आत्मलिंग ठेविलेल्या महालास आग लागली आहे असें महानंदेच्या दृष्टीस पडतांच आपल्या स्वाधीन केलेलें लिंग जळून भस्म होईल या भीतीनें तें बाहेर काढण्याच्या हेतूनें तिनें त्या आगीमध्यें उडी घेतली. त्याबरोबर शंकरांनीं आपली परीक्षा पुरी करून आपल्या सामर्थ्यानें पाणी निर्माण करून ती आग विझविली व महानंदेस वर देऊन आपण गुप्त झाले. महानंदेच्या देवळांसभोंवतालचें पाणी एका हौदांत असल्याप्रमाणें आहे. पाणी वाहतें असून तें येतें कोठून व जातें कोठें हें मुळींच दिसत नाहीं. महानंदेचें दर्शन घेऊन आम्हीं परत गुंडकलला आलों. आमच्या बरोबरची कांहीं मंडळी श्रीशैल्यास न येतां परस्पर तशीच रामेश्वरास निघून गेली असें मागें सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें आपणही रामेश्वरापर्यंतचीं सर्व तीर्थें अगोदर न करितां रामेश्वराहून परत येतांनाच करावीं असें ठरवून आम्हीं थेट रामेश्वराचा रस्ता सुधारला.

९५. रामेश्वरास पोंचण्याचे अगोदर.

रामेश्वरास पोंचावयाच्या पूर्वीं अलीकडील चार पांच स्टेशनापासून रामेश्वरांतील पंड्यांच्या गुमास्त्यांची गडबड सुरू होते. हे गुमास्ते आपल्या

धन्यास यात्रेकरू मिळवून देऊन त्याजकडून पैसे मिळवून आपला गुजराणा करतात. एवंच त्यांचा तो एक धंदाच बनला असल्यामुळें कोणत्याही तऱ्हेनें कां होईना पण आपल्या धन्यांस यात्रेकरू मिळवून देणें हें त्यांचें एक ध्येयच बनलेलें असतें. व या ध्येयाच्या सिद्धीकरितां ते इतक्या अलीकडे आगगाडींत घुसून यात्रेकरूबरोबर ठराव करूं लागतात. पण त्यांच्या त्या गडबडीनें बिचाऱ्या यात्रेकरूस मात्र फार त्रास होतो. आम्हांस तर या गुमास्त्यांनीं एकदोन स्टेशनापर्यंत इतका उच्छेद आणिला कीं शेवटीं ती ब्याद कशी तरी एकदां घालवून द्यावी म्हणून आम्हांस एक युक्ती लढवावी लागली. मागें एकदोन प्रसंगीं आम्हांस अशाच तऱ्हेचा त्रास सोसण्याची वेळ आली होती हें वाचकांस अवगत असेलच. त्यावेळीं आम्हीं जी युक्ती योजिली तिचाच यावेळींही अवलंब करण्याचें आम्हीं ठरविलें. " रामेश्वरांतील एका पंड्याच्या नांवानें आम्हीं शंभर रुपयांची मनीऑर्डर अगाऊच केली आहे, तरी त्यांचा जो कोणी माणूस येथें आला असेल त्याच्याचबरोबर आम्हीं येण्यास तयार आहों " असें जो गुमास्ता आम्हांस त्रास द्यावयास येई त्यास आम्हीं सांगूं लागलों. यामुळें झालें काय कीं, आमच्या पाठीमागची गुमास्त्यांची भगभग अजीबात नाहींशी होऊन रामेश्वरापर्यंत आम्हांस सुखानें प्रवास करितां आला.

९६. रामेश्वर.

रामेश्वरास पोंचल्यावर गंगाधर पीतांबर या नांवाच्या एका पंड्याच्या घरीं आम्हीं उतरलों. जेवणखाण झाल्यावर त्या दिवशीं आम्हीं विश्रांति घेतली. दुसरे दिवशीं सकाळींच आम्हीं देवदर्शनास निघालों.वाटेंत रामकुंड या नांवाचा एक लहानसा तलाव लागतो. हा तलाव चारी बाजूनें फरसबंद केलेला आहे. यांतील पाणी स्फटिकमण्यांसारिखें स्वच्छ असून फार सुरेख आहे. यांत स्नान करून आम्हीं रामेश्वराच्या देवळांत शिरलों. देवळाचा तो प्रचंड आकार व त्याची ती चिरेबंदी पाहिल्याबरोबर त्याच्या आजस्रपणाची व बळकटतेची चांगली कल्पना होते. आज हजारों वर्षें पंचमहाभूतांशीं टक्कर देऊनही त्याच्या बांधकामावर यत्किंचितसुद्धां कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं. आणखीही कित्येक हजारों वर्षें

त्यास धक्का सुद्धां लागणार नाहीं असें त्यास पाहिल्याबरोबर वाटतें. असो. देवळांत गेल्याबरोबर रामेश्वराचें एकदम दर्शन होत नाहीं. सुमारें चारपांच हात रुंदी असलेल्या एका बोळानें बरेंच वांकडें तिकडे जावें लागतें. ह्या बोळां-तून जातांना दुतर्फा एक पुरुष उंचीच्या दगडी बाहुल्या तसबिराप्रमाणें सभा-मंडपापर्यंत असलेल्या दृष्टीस पडतात. जातांना डाव्या बाजूस राम, सीता, लक्ष्मण व मारुति यांचीं देवळें लागतात. सभामंडपांत जाऊन पोंचल्याबरो-बर दगडी भव्य नंदी दृष्टीस पडतो. त्याची उंची जमिनीपासून सुमारें दोन अडीच पुरुष आहे. शिडी लावून त्याची पूजा करावी लागते. नंतर रामेश्वराच्या दर्शनास आम्हीं आंत गेलों. रामेश्वराचे डाव्या बाजूस अस-लेल्या काशीविश्वेश्वराचें दर्शन प्रथम घ्यावें लागतें. याविषयीं पुराणांत अशी गोष्ट सांगितली आहे कीं रावणास मारून राम सीतेसह परत येथें आले. महादेवाची नित्य पूजा केल्याशिवाय कांहींही ग्रहण करावयाचें नाहीं असा श्रीरामचंद्रांचा नेम असे, म्हणून महादेवाचें लिंग आणण्या-करितां त्यांनीं मारुतिरायास आज्ञा केली. परंतु त्यावेळीं तेथें लिंग सांप-डणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं मारुतिरायास कोठूनतरी लिंग आणण्या-करितां आज्ञा केली. तेव्हां मारुतिराय लिंग आणण्याकरितां काशीस गेले. बराच वेळ झाला तरी मारुतिरायांचें लौकर येण्याचें चिन्ह दिसेना. म्हणून सीतेनें तेथील वाळूचेंच एक लिंग करून राचमंद्रांस दिलें. इकडे रामचंद्र पूजेस बसले, तों काशीविश्वेश्वरास घेऊन मारुतिराय तेथें आले. रामचंद्रास दुसऱ्या एका लिंगाची पूजा करितांना पाहून आपले श्रम आतां व्यर्थ गेले असें पाहून त्यांस फार वाईट वाटलें. रामचंद्रांनीं तें ओळखून त्यांस सांगितलें कीं, "बा मारुते, तुला यावयास उशीर झाला म्हणून सीतेनें मला हें सहज करून दिलें. तुझें मन दुखवावें असा त्यांत मुळींच हेतु नाहीं. आतां तूं मोठ्या परिश्रमानें काशीविश्वेश्वराचें लिंग आणिलें आहेस तेव्हां लोक यापुढें प्रथम काशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन नंतर सीतेनें केलेल्या लिंगाचें दर्शन घेतील." राम-चंद्रांनीं असें सांगितल्यावर मारुतिरायांचें समाधान झालें. काशीविश्वेश्व-राचें दर्शन म्हणून प्रथम घ्यावें लागतें. रामेश्वराचें लिंग सरासरी कमरे-इतकें उंच आहे. लिंग वाळूचें असल्यामुळें, त्यावर अभिषेक न होतां

रामेश्वराच्या नांवानें पाण्यानें भरलेल्या पितळेच्या एका घागरीवर अभिषेक होतो. पिंडीची पूजा मात्र फुलें वगैरे घालून करितात. त्या दिवशीं फक्त दर्शनच करून आम्हीं परत बिऱ्हाडीं गेलों. नंतर दुसरे दिवशीं आम्हीं समुद्रस्नानास गेलों. स्नान झाल्यावर बरोबर आणिलेली गंगा रामेश्वरास घालावयास दिली. गंगा घालावयाच्या वेळीं दोन रुपये कर द्यावा लागतो. कर दिला म्हणजे एक पास देतात. तो आंतील पूजाऱ्यांस दाखविला म्हणजे ते विश्वेश्वरास गंगा घालितात. रामेश्वरास गंगास्नान घातल्यावर आम्हीं प्रदक्षिणेस निघालों. प्रदक्षिणा पुरी होईपर्यंत प्रदक्षिणेच्या मार्गा-वर वीस तीर्थें लागतात. काशीविश्वेश्वराजवळ एक विहीर आहे. त्या विहीरीपासून समुद्राच्या स्नानापर्यंत एकंदर एकवीस तीर्थांचीं स्नानें एका दिवसांतच करावीं लागतात. हीं सर्व स्नानें करीत असतांना सगळा वेळ ओलेत्यानें रहावें लागतें म्हणून प्रत्येक यात्रेकरू प्रत्येक तीर्थांतून एक-एक तांब्या अंगावर घेत घेत सर्व तीर्थांचीं स्नानें करून नंतर समुद्र स्नान करितो. येथें प्रत्येक शिवरात्रीच्या सुमारास पांचदिवस वाहन निघतें. प्रत्येक दिवशीं सोन्याचें पाणी दिलेल्या निरनिराळ्या वाहनावर मूर्तीस बसवून मिरवणूक निघते. प्रदक्षिणा करून पालखी सभामंडपांत आल्यावर सभामंडपाच्या मध्यभागीं सेलींगवर एक कळसूत्री बाहुलें आहे, तें भर्दिशीं खालीं येऊन पालखीतील देवावर फुलें टाकून पुन्हां वर जातें. त्यावेळीं तो सीन मोठा पाहाण्सासारखा असतो. पूर्वीं आका-शांतून पुष्पवृष्टी होत असे असें वर्णन आम्हीं वाचतों त्याची हा सीन पाहिल्यावर थोडीशी कल्पना होते. काकडारतीच्या वेळीं एका स्फटिकाच्या लिंगावर दुधाचा अभिषेक होतो. लिंग पाहण्यासारिखें आहे. रामेश्वरास आठ दिवस मुक्काम करून पुढें आम्हीं सेतुबंधास जाण्यास निघालों.

१७. सेतुबंध.

आगगाडी होण्यापूर्वीं रामेश्वराहून सेतुबंधास जाण्याकरितां एक पाऊल वाट असे. हल्लीं तेथें आगगाडी झाल्यामुळें बरीच सोय झाली आहे. सेतुबंधास पोंचण्यापूर्वीं आगगाडींतून वाळवटांत उतरून एक मैल पायीं जावें लागतें. वाटेंत एक मोठें मारुतीचें देवालय आहे. तेथें बरेचसे

साधू नेहमीं बसलेले असतात. मारुतीचें दर्शन घेऊन आम्हीं सेतुबंधास गेलों. पूर्वीं जेथें सेतू बांधला होता त्या ठिकाणापासून जवळच एक विहीर आहे. त्याचें स्नान प्रथम करून नंतर समुद्राचें स्नान करावें लागतें. जेथें पूर्वीं सेतु बांधला होता तेथें रत्नाकर व महोदधी या दोन समुद्रांचा मिलाफ झालेला आहे. हल्लीं रामचंद्रांच्यावेळीं बांधलेला पूल पाहावयास मिळत नाहीं. परंतु त्या जागीं समुद्रांत दूरवर एक लाईनच लाईन गेलेली मात्र दृष्टीस पडते. येथें स्नान करावयाच्या अगोदर एक नारळ, गुंजा, एक जानवें, व एक पैसा समुद्रांत टाकिल्यानंतर मग स्नान करण्याची वहिवाट आहे. स्नान झाल्यावर सुवर्णाचें धनुष्य करून त्याची पूजा केल्यावर तें संकल्प सांगणाऱ्या भटजीस दान देतात. नंतर दोन्ही समुद्राची मिळून एक ओंझळभर वाळू आणून त्याची पूजा करून ती एका कोरलेल्या नारळांत जमिनीवर एकही कण न सांडतां भरावी लागते. कारण जितके कण खालीं सांडतील तितकें पातक लागतें असें म्हणतात. याकरितां ती वाळू मोठ्या काळजीपूर्वक नारळांत भरून प्रयागास आल्यावर त्यांतील वाळू एका ताम्हनांत घालून त्याचें लिंग करितात. व ब्राम्हणाकडून त्यास अभिषेक करवून तें लिंग त्रिवेणींत टाकतात. सेतुबंधास एक दिवस मुक्काम करून आम्हीं पुढें रामनाथपूर स्टेशनावरून दर्भसेनास गेलों.

९८. दर्भसेन.

येथें रामाची मूर्ति दर्भासनावर निजलेली आहे, म्हणून त्यास दर्भसेन असें म्हणतात. समुद्रावर सेतू बांधतांना तो समुद्राच्या पाण्यानें बरेच वेळां पडला म्हणून रामास समुद्राचा राग येऊन त्यास दुसरे दिवशीं ठार मारावें असा निश्चय करून राम येथें दर्भासनावर निजले. त्यावेळीं ती बातमी समुद्रास समजून तो फार भयभीत झाला, व रामाचा आपल्यावरचा राग कमी व्हावा म्हणून त्यानें आपल्या पत्नीस रामाकडे पाठविलें. पतीच्या अनुज्ञेप्रमाणें समुद्रपत्नीनें येऊन रामाची पुष्कळ स्तुति केली व अपराधाची क्षमा मागून चुडेदान मागितलें. रामानें प्रसन्न होऊन समुद्रावरचा आपला राग नाहींसा करून त्याच्या पत्नीस चुडेदान दिलें. सारांश

रामचंद्र येथें दर्भासनावर निजले म्हणून दर्भसेन असे या मूर्तीचें नांव पडलें आहे. मूर्ती काळया पाषाणाची असून सुंदर आहे. तिची लांबी सरासरी दहा पंधरा फूट आहे. दर्भसेनाच्या मूर्तीजवळच थोड्या अंतरावर समुद्रपत्नीची मूर्ति आहे. येथें दीड दिवस मुक्काम करून नंतर बैलगाडीनें आम्हीं नवपाषाणास आलों.

९९. नवपाषाण.

सेतुबंधास जाण्यापूर्वी श्रीरामचंद्रांनीं येथें नवग्रहांची पूजा केली होती म्हणून या स्थानास नवपाषाण असें नांव पडलें आहे. येथें नऊ मोठमोठे दगड आहेत. त्यांस नवपाषाण असें म्हणतात. नवपाषाणाहून नंतर आम्हीं पक्षितीर्थास आलों.

१००. पक्षितीर्थ.

हें तीर्थ गांवापासून एक मैल दीड मैल अंतरावर असणाऱ्या डोंगरावर आहे. डोंगर चढून गेलें म्हणजे उजवे बाजूस एक भलें मोठें शिवालय आहे. शिवालयाजवळच एक मोठी शिला आहे. त्या शिलेंतच दोन खळगे खोदलेले आहेत. येथें एक चमत्कार पाहण्यासारखा आहे. तो असा कीं, बरोबर माध्यान्हसमयीं वर वर्णन केलेल्या दोन खळग्यांपैकीं एका खळग्यांत गव्हाची खीर व दुसऱ्यांत स्वच्छ पाणी घालतात. लौकरच दोन पांढरेशुभ्र पक्षी आकाशांतून फिरत फिरत तेथें येतात व तेथें जमलेल्या यात्रेकरूंकडे एक-वार नजर फेंकून नंतर त्यांतील थोडीशी क्षीर व थोडें पाणी पिऊन उडून जातात. नंतर बाकी राहिलेली खीर प्रसाद म्हणून तयार केलेल्या अन्नांत घालून तें सर्व अन्न यात्रेकरूस वाटतात. हा सर्व प्रकार फार पुरातन काळापासून चालत आला आहे असें सांगतात. ते पक्षी कोठून येतात व कोठें जातात हें कोणासच समजत नाहीं. या पक्ष्यांची उंची सरासरी गुडघ्याइतकी असून वर्ण शुभ्र आहे. हे पक्षी फार प्राचीनकाळचे आहेत असें म्हणतात. ह्या पक्ष्यांस दररोज खिरीचा नैवेद्य दाखविण्याकरितां एका वैष्णव ब्राह्मणाची योजना केली असून त्यास त्याबद्दल वार्षिक एक हजार रुपयांचें उत्पन्न आहे. या शिलेजवळच खालच्या बाजूस एक

विहीर आहे. त्यास पक्षीतीर्थ असें नांव आहे. पक्षितीर्थाचे ठिकाणीं एक दिवस राहून नंतर आम्हीं चिंतांबरास आलों.

१०१. चिंतांबरेश्वर.

येथें शंकराचें लिंग आहे. देऊळ दगडी असून वर सोन्याचीं कौलें आहेत. शिवलिंगास चितांबरेश्वर असें म्हणतात. येथून पुढें आम्हीं माना-मदरी या नांवाच्या स्टेशनवर उतरून मदुरामीनाक्षीस आलों.

१०२. मदुरामीनाक्षी.

येथें देवीचें देऊळ आहे. देवळास सुवर्णशिखरें आहेत. देवळांत देवीच्या मूर्तीशेजारीं शंकराचार्यांची एक मूर्ति आहे. येथें शंकराचा-र्यांनीं तपश्चर्या केली होती असें सांगतात. मदुरामीनाक्षीस दोन दिवस विश्रांति घेऊन नंतर कुंभकोणं या गांवीं आलों.

१०३. कुंभकोणं.

येथें महादेवाचें एक लिंग आहे. त्यास कुंभेश्वर असें म्हणतात. येथेंच दुसरीकडे वामनाची विराटस्वरूप मूर्ति आहे. ती आम्हीं पाहण्यास गेलों. मूर्ति दगडी असून इतकी उंच आहे कीं एक भला मोठा वेळू घेऊन त्याच्या टोकास चिंध्या बांधून तो पेटवून उंच केला म्हणजे मग कोठें त्या मूर्तीचें तोंड दिसतें. इतकी उंच मूर्ति दुसरीकडे कोठेंच पाहण्यास मिळत नाहीं. येथें शारंगपाणीचें एक देऊळ आहे. शारंगपाणीचें दर्शन घेऊन दुसरे दिवशीं आम्हीं शिवकांची गांठली.

१०४. शिवकांची.

याठिकाणीं शिवाचें देऊळ असून सर्व लोक शिवभक्त आहेत. शिव-कांचीहून थोड्याच अंतरावर विष्णुकांची म्हणून एक गांव आहे.

१०५. विष्णुकांची.

येथील सर्व लोक विष्णुभक्त आहेत. येथें असलेल्या विष्णूच्या देवाल-यांत एका दगडी तुळईस सोन्याची एक पाल करून बसविलेली आहे. तिला स्पर्श केला असतां पालीचा सर्व दोष नाहींसा होतो, एवढेंच नव्हें

तर त्या पालीला स्पर्श करून आलेल्या मनुष्यास, अंगावर पाल पडल्या-नंतर जो कोणी स्पर्श करील त्याचाही पालीबद्दलचा सर्व दोष नाहींसा होतो. असें म्हणतात येथें वरदराजाचें एक देऊळ आहे. याठिकाणीं एकच दिवस मुक्काम करून पुढें रेणीगुंठा नांवाच्या स्टेशनवरून गोविंदराज-पट्टणास आलों.

१०६. गोविंदराजपट्टण.

येथें गोविंदराजाचें देऊळ असून गोविंदराजाची मूर्ति उशाशीं एक माप घेऊन निजलेली आहे. याबद्दल अशी हकीकत सांगतात कीं, गोविं-दराज हा व्यकटेशाचा एक कारकून होता. व्यंकोबाच्या लग्नाच्या वेळीं उसनवार घेतलेले पैसे मोजतां मोजतां गोविंदराजाची स्वारी थकली व पैसे मोजण्याचें माप उशाशीं घेऊन निजली. मूर्ति काळयापाषाणाची आहे. येथेंही एकच दिवस मुक्काम करून आम्हीं पद्मावतीपट्टणास गेलों.

१०७. पद्मावतीपट्टण.

येथें पद्मावती या नांवाच्या देवीचें देऊळ आहे. जवळच पद्मावती नामें सरोवर आहे. या ठिकाणाहून नंतर आम्हीं व्यंकोबाच्या गिरीस गेलों.

१०८. व्यंकोबाची गिरी.

गिरीवर जातांना पांच दरवाजे लागतात. गिरीवर एक लहानसें गांवच वसल्याप्रमाणें आहे. येथें व्यंकोबाचें एक मोठें देऊळ आहे. व्यंकोबाची मूर्ति काळया पाषाणाची असून सुमारें एक पुरुषभर उंचीची आहे. मूर्तीच्या उरोभागीं एक पाऊल दिसतें. तें भृगऋषींचें पाऊल आहे. भृगऋषींनीं विष्णूस लाथ मारली होती हें सर्वांस महशूर आहेच. तेव्हां त्या बद्दल येथें अधिक लिहण्याचें कारण नाहीं. व्यंकोबाचा प्रसाद याठिकाणीं दूकानांतून विकत मिळतो. व्यंकोबा नवसास पावतो अशी ख्याति असल्यामुळें, पुष्कळ लोक नवस करण्यास गिरीस येतात, व आपला कार्य-भाग झाल्यावर जें जें नवसाचे वेळीं मागून घेतलें असेल तें तें फेडण्या-साठीं कोणी दागिने, कोणी हिरे, कोणी रुपये वगैरे आपपाल्या शक्त्यनुसार देवापुढें ठेवतात. देवास दिलेले हे सर्व जिन्नस एकत्र ठेवण्यास देवळांत

जातांना उजव्या बाजूस एक जागा केली आहे. त्यास मुड्डप असें म्हणतात. त्यांत ते सर्व जिन्नस साठवून ठेऊन प्रत्येक सहा महिन्यांनीं खजिन्यावर नेमलेले पंच ते काढून घेऊन विकतात आणि व्यंकोबाच्या खजिन्यांत जमा करितात. प्रत्येक सहा महिन्यांत कमींत कमी निदान पन्नास साठ हजार रुपये तरी व्यंकोबाच्या खजिन्यांत जमा होत असतात. देवास जातेवेळीं डाव्या बाजूस दोन मोठ्या घंटा टांगलेल्या दृष्टीस पडतात. त्या व्यंकोबाच्या पूजेच्यावेळीं वाजवितात. वाजवितेवेळीं एका घंटेंतून 'गोविंद, गोविंद' असा आवाज निघतो व दुसऱ्या घंटेंतून 'नारायण' 'नारायण' असा ध्वनी होतो. येथें रक्तचंदनाचे नाना तऱ्हेचे जिन्नस विकत मिळतात. प्रत्येक शुक्रवारीं जडजवाहीर घालून व्यंकोबाची पूजा बांधतात. त्या वेळीं तें ऐश्वर्य मोठें पाहण्यासारिखें असतें. देवळापासून जवळच खालच्या बाजूस आकाशगंगा व पाताळगंगा अशा दोन नद्या वाहतात. जवळच पापनाशी व पांडवतीर्थ या नांवाचीं दोन तीर्थें आहेत. येथें आम्हीं चार दिवस मुक्काम करून येतांना वाटेंत शिवमुग्गी स्टेशनावर उतरून बैलगाडींतून उडुपीस गेलों.

१०९. उडुपी.

उडुपीस जाऊन पोंचण्यास चार दिवस लागतात. येथें वैष्णवस्वामीचा एक मठ आहे. येथें सतत अन्नसंतर्पण चाललेलें असतें. येथें श्रीकृष्णाचें एक देऊळ आहे. मूर्ति काळ्या पाषाणाची असून फार सुंदर आहे. येथून जवळच तीन कोसांवर दुर्गा या नांवाचें एक बेट आहे.

११०. दुर्गाबेट.

येथें दुर्गेची एक अष्टभुजा मूर्ति आहे. दुर्गेचें दर्शन करून आम्हीं थेट म्हैसूर पाहण्यास गेलों.

१११. म्हैसूर.

म्हैसूर शहर पाहण्यासारिखें आहे. येथें मोठमोठे भव्य बंगले असून रस्तेही पुष्कळ रुंद व नेहमीं स्वच्छ असतात. येथें द्रवीड लोकांची वस्ती आहे. म्हैसूर हें संस्थान मोठें असून येथील सरकारास उत्पन्नही दांडगें

आहे. येथील अजबखाना अवश्य पाहण्यासारिखा आहे. त्यांत नानातऱ्हेच्या पशुपक्ष्यांचा संग्रह केलेला आहे. येथें रेशमाची एक गिरणीही आहे. मोठ्या किड्यांनीं अंडीं घातल्यापासून तीं अंडीं फुटून लहान लहान किड्यांचें बाहेर येणें, त्यांची संगोपन करण्याची रीत व ते हळूहळू मोठे होऊन रेशीम घालीपर्यंत व रेशीम घातल्यानंतर त्या कच्च्या रेशमासून पक्के रेशीम करण्याची तऱ्हा वगैरे सर्व गोष्टी प्रेक्षणीय आहेत. येथील सरकारच्या पागेंत पंचरंगी घोडे पहावयास मिळतात. या गांवांत प्राचीनकाळीं महिषासुर या नांवाच्या एका दैत्याचा वध झाला होता म्हणून या शहरास म्हैसूर असें नांव पडलें आहे. शहरापासून दोन तीन मैलांवर एका उंच टेंकडीवर महिषासुरमर्दिनी या नांवाच्या देवीचें एक सुंदर देवालय आहे. टेकडीच्या पायथ्यापासून तों तहत देवीच्या देवळापर्यंत सुमारें नऊ साडेनऊशें पायऱ्या चढून जाव्या लागतात. जातांना निम्या वाटेंत डाव्या बाजूस सुमारें दोन एक पुरुष उंचीचा दगडी भव्य नंदी लागतो. देवीची मूर्ति काळ्यापाषाणाची असून तिचें स्वरूप थोडेसें उग्र आहे. रात्रीचेवेळीं येथें प्रत्यहीं होत असलेली विजेची रोषणाई फारच प्रेक्षणीय असते. म्हैसुरामध्यें दोन तीन दिवस मुक्काम करून आम्हीं थेट मिरजेस आलों.

१२१. शेवटचे दोन शब्द.

वाचक हो ! आमची यात्रा संपली. ज्या हेतूनें प्रेरित होऊन यात्रा करण्याचें मी ठरविलें होतें तो हेतू सर्व यात्रा निर्विघ्नपणें पार पडून सफळ झाला. माझ्या दुःखीकष्टी मनास बरेंच समाधान वाटूं लागलें. खरोखर, दुःखीकष्टी घालेल्या मनुष्यांस तीर्थाटण करण्यापासून जो कांहीं आनंद होतो व एक प्रकारें जी कांहीं शांतता वाटते ती शांतता व तो आनंद त्यास दुसऱ्या कोणत्याही ऐहिक गोष्टींपासून लाभणार नाहीं. प्रवासांत असलें म्हणजे नानातऱ्हेचे देश, सुंदर सुंदर व रमणीय देखावे, नाना तऱ्हेचीं मनुष्यें व त्यांचे ते निरनिराळे रिवाज वगैरे अनेक गोष्टी पाहात असतां मनुष्य आपलें दुःख विसरून जातो. कित्येक वेळीं असेही प्रसंग पाहण्यांत येतात कीं, जगांत आपल्यापेक्षांही शतपटीनें अधिक दुःखी माणसें असून

त्यांचें जीवन सर्वथैव आपल्यापेक्षां कितीतरी पटीनें निकृष्ट असतें. आणि अशा स्थितींतही तीं मनुष्यें त्यांतल्या त्यांत समाधान मानून घेत असतात. अशाप्रकारें एक कीं दोन, हजारों गोष्टी डोळ्यासमोरून गेल्या म्हणजे अशा लोकांपेक्षां आपली स्थिति परमेश्वरानें कितीतरी पटीनें चांगली ठेविली आहे हें मनास पटून झालेल्या दुःखाचा विषाद पुष्कळच कमी होतो, व त्यास कालांतराची जोड मिळाली म्हणजे हळू हळू गतदुःखाविषयीं कांहीं वाटेनासें होऊन, मनुष्य आहे त्यांतच पुष्कळ सुख व व समाधान मानूं लागतो. प्रवासाहून आल्यावर माझ्या मनाला फार समाधान वाटूं लागलें. व गत दुःखांचा हळू हळू विसर पडूं लागला. तीर्थाटण करण्यापासून मला फार आनंद झाला व एकप्रकारें समाधान वाटूं लागलें, आणि माझ्याप्रमाणेंच जगांत दुःखीकष्टी झालेल्यानां झाला तर कांहीं उपयोगच व्हावा अशा सध्देतूनें हें प्रवासवर्णन लिहिण्यास हातीं घेतलें. त्याचा सर्वांस उपयोग होऊन तें त्याच्या आदरास पात्र होवो अशी परमेश्वराच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥